म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क.

# NOTES ON CRIMINAL TRIBES

BY

MAJOR E. J. GUNTHORPE,

DISTRICT SUPERINTENDENT OF POLICE, AKOLA DISTRICT.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
लेखक
सन
संग्रहालय क्रमांक
पुस्तकाचें नांव

Bombay:
PRINTED AT THE
EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.

1884.

सं. वि. ३९३

# प्रस्तावना.

मेहेरबान मेजर गनथार्प साहेब बाहादूर सुपरिन्टेन्डेन्ट पोलीस जिल्हा आकोलें प्रांत वऱ्हाड, यांनीं या पुस्तकांत दिलेली माहिती मोठ्या प्रयासानें व खर्चानें मिळवून तिचें एक पुस्तक इंग्रजी भाषेंत छापून प्रसिद्ध केलें. परंतु त्यापासून सर्वांस व्हावा तसा उपयोग होऊं शकत नसल्यामुळें, साहेब बाहादुरांचे आज्ञेवरून त्या पुस्तकाचें मराठी भाषांतर करून पोलीस खात्यांतील कामगार लोकांचे उपयोगाकरितां नजर केलें आहे. या पुस्तकांत दिलेली माहिती किती उपयोगी व महत्वाची आहे हें पुस्तक वाचल्यानें सहज समजेल; त्याजबदल निराळें लिहिणें नको. मूळ इंग्रजी ग्रंथाची भाषा फार सरळ व सुरस आहे; तशी भाषांतराची नाहीं. परंतु मूळ ग्रंथांतील माहिती देववेल तितक्या सुलभ भाषेंत साग्र दिली आहे.

भाषांतरकार.

मोति १०८
रा. १९३२३

# बावरी (बदला).

बावरी हे जातीचे हिंदु आहेत परंतु ज्या देशांत ते स्थाईक झाले आहेत त्या देशाचे संबंधानें त्यांचीं निरनिराळीं नांवें पडलीं आहेत; जसे बागोरी, बागरी अथवा वागरी, बदला, मोघी, दिल्लीवाले बावरी, मालपुरे, मारवाडी इत्यादि. यांची मूळ भाषा गुजराथी आहे व अद्यापिही हे तीच बोली बोलतात; आणि यांच्या रीतिभाती आणि धर्म संबंधी विधि वगैरेही एकसारखेच आहेत. हे जेव्हां चोरीच्या उद्देशानें देश फिरण्यास जातात, तेव्हां दुसरे लोकांसमोर आपसांत हिंदुस्थानी भाषा बोलतात. चोरी करण्याकरितां नियमित काळीं दक्षिणेंत येणाऱ्या तीन जाति आहेत. मालपुरा बावरी भोपाळांतून येतात; मारवाडी बावरी मारवाड देशांतून येतात आणि दिल्लीवाले बावरी दिल्लीचे आसपासचे प्रदेशांतून येतात. व दक्षिणे कडेस मद्रास इलाक्यांतही पुष्कळ दूर पर्यंत जातात परंतु समुद्र उतरून पार सिलोन बेटांत जात नाहींत. मोघी जातीचे बावरी इंदूरचे आलीकडेस येत नाहींत. या जातीचे लोक जेव्हां दक्षिणेंत येतात तेव्हां कांहीं तरी वेषानें येतात. मालपुरे आणि मारवाडी बावरी हे बैराग्याचे किंवा गोसाव्याचे वेष घेतात परंतु क्वचित् प्रसंगीं ते नोकरी पाहणाऱ्या साधारण परदेशाप्रमाणें किंवा भीक मागणारे मारवाडी ब्राह्मणाप्रमाणेंही असतात. दिल्लीवाले बावरी पूर्वी नेहमी बैराग्याचे वेषानें येत असत परंतु आलीकडेस आघोरी किंवा गोसावी बनून येतात. मोघी लोक बैराग्या शिवाय दुसरा वेष घेत नाहींत.

ते जो वेष धारण करितात त्याची मंत्रतंत्रासह इतकी उत्तम रीतीनें बतावणी करितात कीं ते खरोखर त्या जातीचे नाहींत असें सहसा कोणास ओळखतां येत नाहीं. कदाचित् खरोखर चांगले गोसावी किंवा बैरागीच ओळखूं शकतील तर नकळे. या लोकांनीं चोरी केली असतां शोध कसा लावावा याजबद्दल पुढें कांहीं माहिती दिली आहे. या जातीचा

परंपरागत चोरी शिवाय दुसरा धंदा नाहीं. पूर्वी हे दिवसा ढवळ्या डाके मारीत असत परंतु "ठगी आणि डकाइटी" खात्याकडून आलीकडेस यांचा बराच बंदोबस्त झाला आहे व मोठमोठे डाके घालण्याची चाल बहुतकरून मोडल्या सारखी झाली आहे. हे लोक घर फोडून व डेरे वगैरे फाडून त्यांतून माल मोठ्या कुशलतेनें आणि धिटाईनें चोरून नेतात. परंतु डेरे आणि पालें फाडून दिल्लीवाले बावरीच चोऱ्या करितात दुसरे जातीचे लोक करित नाहींत. मोघी जातीचे बावरी अद्यापिही डाके मारितात. बावरी लोक हे मूळ रजपुत जातीचे असून त्यांचीं गोत्रें वगैरे अद्यापि तशींच कायम आहेत. हे नीट नेटके राहतात. हे दारू फार पितात आणि बोकडाचे व ह्मशीचे मासाची यांस मोठी आवड आहे; गाईचें किंवा बैलाचें मास खात नाहींत. एखादी चोरी चांगले प्रकारें सिद्धीस गेल्यावर हे जेवण करितात व त्या वेळेस खूप दारू पितात. जेव्हां बैराग्याचे किंवा गोसाव्याचे वेषानें असतात त्या वेळेस बावरी लोक देवळांत किंवा मठांत उतरतात अथवा दुसरा कोणता वेष घेतला असेल तर त्या वेषाचे खरोखर लोक ज्या ठिकाणीं उतरतात त्याच जागेंत हेही जाऊन उतरतात. ज्या जागेंत उतरतात त्या जागेस हे आसन ह्मणतात.

हे बाहेर फिरण्यास जातात तेव्हां आपल्या बायका बरोबर नेत नाहींत. हे तीनपासून आठ किंवा कधीं कधीं तीस अथवा चाळीस पर्यंत मनुष्यांची टोळी जमवून बाहेर पडतात. टोळींत एक मुख्य असतो त्यास काडू अशी संज्ञा आहे. काडूचें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे त्यानें घर फोडावें व सर्व कामांत पुढारी असावें. यांचें घरफोडण्याचें जें हत्यार असतें त्यास ग्यान असें ह्मणतात. त्याविषयीं दुसऱ्याचे समोर कांहीं बोलण्याचें असल्यास ग्यानदास ह्मणतात; ह्मणजे तिऱ्हाईत मनुष्यास असें वाटतें कीं हे आपल्या एका सोबत्याबदलच कांहीं मजकूर बोलत आहेत. हें हत्यार लोखंडाचें असून ११॥ किंवा बारा इंच लांब असतें. त्याचे पुढले टोंकास मजबुतीकारितां तीन इंच पोलाद बसविलेलें असतें. व तो भाग चौकोनी असून शेवटास निमुळता केलेला असतो. बाकीचा भर्व भाग गोल असून मुठीचे ठिकाणीं एक आंगचाच वाटोळा गोळा

केलेला असतो. हें हत्यार टोळीपैकीं एका मनुष्याचे स्वाधीन असतें व तो टोळीबरोबर न चालतां सुमारें अर्धा मैल पुढें किंवा मागें राहतो. तें एका धोत्राचे घडींत घालून ती खांद्यावर टाकतात. ह्मणजे जर कोणी सरकारी नोकर येतांना दिसला तर तें लागलीच त्यास न कळत फेंकून देतां यावें. तें टाकून देण्याचा प्रसंग आलाच तर तो सरकारी नोकर निघून गेल्यावर पुन्हा उचलून घेऊन वर सांगितल्याप्रमाणें घडींत ठेऊन देतात. टोळी जेव्हां मुकामावर जाऊन पोहोंचते, तेव्हां हें हत्यार (म्यान) दूर खुणेनें पुरून ठेवतात. टोळीबरोबर जर घोडीं असतील तर कांहीं लोक आपलीं हत्यारें रस्ता चालते वेळेस खोगिरांत दाबतात. काडू जवळ एक मजबुद सुरी असते व घरांत गेल्यावर कोणी त्यास धरण्याचा प्रयत्न करीत असून त्यास तेथून सुटण्यास मार्गच नाहीं असें जेव्हां होतें तेव्हांच तो तिचा उपयोग करितो; एरव्ही करीत नाहीं. या सुरीस ते नेत्री ह्मणतात. काडू घरांत शिरतो तेव्हां त्याचे टोळीपैकीं कांहीं लोक बाहेर उभे असतात; व आपल्या काडूवर कसाही प्रसंग आला तरी आपले जीवाकडे न पाहतां त्याची सुटका करून नेतात. या वेळेस हे खून देखील करण्यास मागें पुढें पाहत नाहींत. दिवसास मात्र बावरी लोकांची बिलकूल भीति नाहीं. बावरी लोकांस कैद करण्याचें काम पडल्यास ते आडवे येत नाहींत; मात्र पाहऱ्यांतून पळून जाण्याच्या होतील तितक्या तजवीजी करतात. त्यांस जेव्हां पिंजऱ्या बाहेर काढावें तेव्हांच बहुतकरून ते पळून जाण्याचा प्रयत्न करितात व अशा वेळेस एकदम पळत सुटून कोणी मागें लागल्यास त्याजला दगड फेकून मारितात.

हे जेव्हां बैराग्याचे किंवा गोसाव्याचे वेषानें असतात तेव्हां आपले नांवास दास किंवा गीर अशीं अक्षरें जोडतात. जसे, एखाद्याचें नांव गिरवर असलें तर त्यास गिरवरगीर, किंवा एखाद्याचें गुमान असलें तर त्यास गुमानदास असें आपसांत ह्मणतात. हे देवीची भक्ति करितात यांचे देवीचें मुख्यस्थान जयपुरापासून पन्नास कोसांवर केराली येथें आहे. या ठिकाणीं फार दूरदूरचे बावरी यात्रेकरितां येतात. शपथ घेण्याचें कधीं काम पडल्यास देवीचीच शपथ घेतात. हे दुसरे देवास

पूजीत नाहींत. हे लोक चोरी करण्याकरितां जाण्याच्या पूर्वी, यांचे जे पूर्वज चोरी करण्याचे कामांत पटाईत होऊन गेले त्यांचीं नांवें घेऊन शकून पाहतात. शकून पाहण्याचें काम बहुत करून काडूचें आहे. शकून पाहण्याकरितां गव्हाचे दाणे लागतात परंतु गहूं न मिळाल्यास ज्वारीवरही काम चालतें. तथापि काडू आपले जवळ गव्हांचे दाणे नेहमी बाळगतो याजमुळें ज्वारीवर शकून पाहण्याचें क्वचित काम पडतें. शकून पाहण्याचे गहूं मुद्दाम तयार केलेले असतात; ते असें कीं गव्हांचे दाणे तुपांत भिजवून ते तळहातावर रगडून त्यांचा कोंडा काढून टाकितात नंतर ते दाणे शकून पाहण्याचे कामी पडतात. शकून पाहण्याची रीत पुढें सांगितल्याप्रमाणें आहे:—काडू स्नान करून जमिनीवर पश्चिमेकडेस तोंड करून बसतो व त्या समोर घोंगडीचे एके कोपऱ्यावर मूठभर गव्हांचे दाणे ठेवलेले असतात. त्यांतून काडू दोन दाणे उजव्या बाजूस व एक दाणा डावे बाजूस ठेवतो. नंतर त्या गव्हांतून एक चिमूटभर गहूं उचलून घेऊन खालीं ठेवतो व त्यांतून चार चार दाणे मोजून, शेवटीं जर एक किंवा तीन दाणे बाकी राहतील तर ते डावे बाजूस जो एक दाणा पूर्वी ठेवला असतो त्याचे खालीं ओळीनें मांडून ठेवतो. अथवा बाकी जर दोन दाणे राहिले तर उजवे हातास जे दोन दाणे प्रथम ठेविले असतात त्याचे खालीं मांडतो. याप्रमाणें दुसरी एक चिमुट भरून घेऊन त्या दाण्यांची पूर्वी प्रमाणेच व्यवस्था करितो. जर पहिल्या खेपेस विषम आणि दुसऱ्या खेपेस सम दाणे शेष राहिले तर सर्वच दाणे गोळा करून पुन्हां नव्यानें सुरू करितो. आणि उजवे बाजूस सतत तीन वेळ दोन दोन दाणे येत अथवा डावे बाजूस एक एक किंवा तीन तीन दाणे येत तों पर्यंत असाच क्रम चालू ठेवितो. जर एकसारखे तीन वेळ सम आले तर कार्यसिद्धी होईल, परंतु विषम आले तर होणार नाहीं असें हे समजतात. हे चांदिण्यारात्रीं घरफोडी करित नाहींत. चांदिण्यारात्रीचे दिवसांत ते घरें हेरून ठेवितात. गोसाव्याचे किंवा वैराग्याचे वेषानें फिरत असतां यांस दुसऱ्यांचे घरांविषयीं लागेल तितकी बातमी सहज मिळवितां येते. बातमी बद्दल दुसऱ्यावर हे लोक भरंसा ठेवित नाहींत. हें काम बहुत-

करून काडू स्वतःच करितो. चांदिण्यारात्रीचे दिवसांत ही टोळी आपला मुकाम हालवित नाहीं; परंतु अंधाऱ्या रात्री येतांच यांचा कूच सुरू होतो. हे आपल्या उतरण्याचे जागेपासून जवळ कधींही घर फोडित नाहींत. या कामासाठीं फार दूर जातात. या लोकांनीं एका रात्रींत १५ कोश जावून घरफोडी करून दिवस निघण्यापूर्वी आपल्या ठिकाणीं परत आल्याविषयीं पुष्कळ उदारणें सांपडतील. या लोकांचे घरफोडी करण्याचे दोन प्रकार आहेत. त्यांतील एक प्रकारास यांचे भाषेत "बागली" असें नांव आहे; व हा प्रकार यांस विशेष आवडतो. जें घर फोडण्याचें असेल त्याचे दरवाज्याजवळ भिंतीस बाहेरून हात घालण्यापुरतें छिद्र करून त्यांतून हात घालून दरवाज्याची कडी काढून दरवाजा उघडतात. याप्रमाणें उघडलेल्या एका कोठडींत कांहीं माल मिळाला नाहीं तर तसेच दुसरेहि दरवाजे मोकळे करून आंत आंत शिरकाव करित जातात. एका काडूनें आह्मांस असें सांगितलें कीं मी या रीतीनें एका रात्रींत अकरा घरें फोडूं शकतों व कित्येक वेळा फोडलींही आहेत. घरांत अमुक ठिकाणीं माल आहे अशा बद्दल जर काडूस नक्की बातमी मिळाली असेल आणि त्या ठिकाणीं बागलीनें (पहिल्या रीतीनें ) जाण्यास मार्ग नसेल तर हे दुसरें रीतीनें काम करितात. ह्मणजे घरांत ज्या ठिकाणीं माल असेल त्या ठिकाणींच नेमके, किंवा जवळच, काडूस आंत जाण्यापुरतें छिद्र पाडतात. काडू आंत शिरते वेळेस डोक्याकडून जातो व बाहेर निघते वेळेस पायांकडून येतो. अशा वेळेस त्यास कोणी धरण्यास आले असतां आपला बच्याव करून घेण्यासाठीं वर सांगितलेली सुरी दातांत धरून ठेविलेली असते. घरांत झोपेंत असलेल्या बायकांचे आंगावरील डागिणे काढण्याचे कामांत हे लोक फारच चालाख आहेत. असे कृत्यास हे आपले भाषेत उभ्यांटो ह्मणतात, एखादे घरांत रात्रीं चोरी करण्याकरितां गेले असतां तेथे ज्यांचे आंगावर डागिणे आहेत अशा बायका निजलेल्या आढळल्यास हे लोक त्यांचे आंगावरील डागिणे काढून घेतल्यावांचून राहत नाहींत. काडू जेव्हां घराची भिंत फोडित असतो तेव्हां त्याचे मागें थोडे अंतरावर एक मनुष्य आसपास नजर ठेविण्याकारितां व कांहीं धोका असल्यास त्याजबद्दल सूचना करण्याक-

रितां उभा असतो. या मनुष्यास "पुटवऱ्या" ह्मणतात. घरांतून दिलेला माल बाहेर घेऊन आपले साथीदारास देणें हेंही या मनुष्याचेंच काम आहे. त्याचे साथीदार दोन तीन इसम हातीं वडगे घेऊन जवळच उभे असतात. काडू घरांत गेल्यावर कोठें काय सामान आहे हें पाहण्याकरितां एक तर आगकाडी ओढतो नाहीं तर मोहोऱ्यांचे किंवा बाजरीचे दाणे आपले बरोबर घेऊन जाऊन ते घरांत हळुच चहुंकडेस फेकतो ह्मणजे त्याच्या आवाजावरून कोठें काय सामान (भांडीं, कुंडीं, पेट्या वगैरे) आहे हें समजून पलीकडेस जाण्यास रस्ता मोकळा आहे किंवा कसें हेंही त्यास समजतें. टोळींतील लोक गुन्हा करण्यास जातात तेव्हां मुकामाचे जागीं एक किंवा दोन मनुष्यें राहतात आणि जे लोक बाहेर गेले असतील त्यांचे बिछान्यावर दगड किंवा लांकडें ठेऊन त्यांजवर धोत्रें पांघरूण घालतात; ह्मणजे त्यावरून दुसऱ्यास असें वाटावें कीं अवंतर लोक तेथेंच असून निजले आहेत. त्या ठिकाणीं कोणी परका मनुष्य आला तर मुकामावर असलेले एक किंवा दोन इसम उठून सांगतात कीं बाकीचे लोक फार थकल्या मुळें गाढ झोपेंत आहेत.

या जातीचे लोक विष प्रयोगकरून चोरी करित नाहींत. व बहुतकरून कपड्याचीही चोरी करित नाहींत. परंतु जर एखादा भारी किंमती दुशाला वगैरे सांपडल्यास तो आपले देशचे जमीदार किंवा दुसऱ्या अधिकाऱ्यास नजर करण्याकरितां घेऊन जातात. तो ते स्वतः आपल्यासाठीं ठेवित नाहींत. ते नगदी किंवा जवाहीर याशिवाय दुसरे मालास हात लावित नाहींत. मालपुरे, मोघी व मारवाडी बावरी हे चोरून आणलेला माल आपले मुकामाचे जागेपासून पुष्कळ अंतरावर पुरून ठेवतात. दिल्लीवाले बावरी सयपाकाचे चुलीखालीं पुरून ठेवतात. यांची टोळी एका मुकामाहून कूच करून दुसरे गांवीं जाते तेव्हां माल बरोबर नेत नाहींत. दुसरे मुकामावर जाऊन पोहोंचल्यावर यांच्या पैकीं एक मनुष्य रात्रीं पहिल्या मुकामाचे गांवीं पाठवितात व तेथें पुरून ठेविलेला माल तो घेऊन येतो आणि पहिल्या प्रमाणेच उतरण्याचे जागेपासून दूर गाडून ठेवतो. व याप्रमाणें प्रत्येक नवीन मुकामास क्रम चालू असतो. लुटींत मिळालेल्या डागडागिण्यांची एकदम तोडमोड

करून किंवा साधल्यास ते गाळून त्यांचें रूपांतर करून टाकतात. बराच माल जमा झाल्यावर तो एक किंवा दोन आसामी बरोबर देऊन त्यास रेल मार्गानें अगर पायरस्त्यानें देशांत घरीं पाठवून देतात. व तो माल घरीं पोचता केल्यावर हे इसम पुन्हा परतून येऊन टोळीस मिळतात. हे लोक आपले देशांतून अक्टोबर महिन्याचे अखेरीस आणि नवेंबर महिन्याच्या आरंभीं चोऱ्या करण्याकरितां बाहेर पडतात व या देशांत येतात. या प्रवासास ते आपले भाषेंत "रामेथ" असें ह्मणतात. ते रेलवेनींही प्रवास करितात. मालपुरे आणि मारवाडी बावरी बहुत करून इटारसी, सोहागपूर किंवा वाडी रेलवेस्टेशनावर गाडींत बसतात. दिल्लीवाले बावरी दिल्लीचे जवळ पासचे रेलवे स्टेशनावर बसतात. हे लोक पावसाळ्याचे आगोठीस आपआपले देशांत जातात; परंतु सर्वच जातात असें नाहीं. जे इसम त्या देशांतले प्रसिद्ध गुन्हेगार आहेत किंवा ज्यांस पकडण्याविषयीं त्या देशांत हुकूम ज्यारी झाले आहेत असे लोक इतर मंडळी बरोबर आपले देशांत परत न जातां इकडेसच राहतात. हिवाळ्यांत ते लोक देशांतून पुन्हा दक्षिणेंत आले ह्मणजे त्यांच्यांत मिळतात.

बावरी लोक गोसाव्याचे किंवा बैराग्याचे वेषानें येतात असें मागें सांगितलेंच आहे. आतां गोसाव्याची किंवा बैराग्याची टोळी भेटल्यास ते खरोखर तसे आहेत किंवा बावरी आहेत हें पाहण्याचें असल्यास, ज्यांस आपले धर्माची चांगली माहिती आहे असा एखादा गोसावी किंवा बैरागी त्यांच्या सकाळच्या पूजेचे वेळेस तेथें बसवून ठेवावा, आणि त्यांचे कृतींत जर कांहीं चूक निघाली तर ते बावरी आहेत असें समजावें. ज्याप्रमाणें देवभोळे गोसावी किंवा बैरागी देवाची पूजा किंवा ध्यान करितात त्याप्रमाणें वेषांत असतांना बावरीलोकांस साधत नाहीं. व त्यांची लबाडी तेव्हांच उघडी पडते.

यांचा सयपाक होत असतां जर त्यांजपैकीं सयपाककरणारा शिवाय दुसरा इसम चौक्यांत जाईल आणि शिजलेल्या पदार्थांपैकीं वाटेल तें घेऊन खाईल तर समजावें कीं ते खरे बैरागी किंवा गोसावी नसून बावरी आहेत. हे ज्या वेळेस दारू पिऊं लागतात त्या वेळेस ज्यास गुजराथी

भाषा समजते असा एखादा मनुष्य त्यांचे पासून थोडे अंतरावर गोष्टी ऐकत उभा करून द्यावा. कारण असे वेळेस ते आपल्या भाषेतच बोलतात. धर्मसंबंधी मंत्रतंत्राबद्दल जर खरे गोसाव्यांनीं किंवा बैराग्यांनीं यांच्याशीं चर्चा चालविली अगर त्यांची कृति पाहिली तर लागलीच यांचें पितळ उघडें पडतें.

एखादे घराची भिंत दरवाज्याचे बाजूनें फुटलेली असून चोर जर दरवाजा उघडून आंत गेला असेल तर अथवा ज्या कोठडींतून माल नेला तींत मोहोऱ्यांचे किंवा बाजरीचे दाणे पडले असतील तर ती चोरी बावरी लोकांनीं केली असें खास समजावें.

---

## टाकणकार अथवा टकारीजातीचें खरें नांव वागरी किंवा मोघी.

दक्षिणेंत नेहेमी राहणाऱ्या किंवा हमेश फेरी करणाऱ्या पारधी लोकांच्या ज्या साहा जाति आहेत त्यां पैकीं ही एक जात आहे. हे हिंदु असून यांचे जातीचें खरें नांव बावरी किंवा वाघरी हें आहे, व हे आपसांत याच नावानें किंवा मोघी या नांवानें एकमेकांस ओळखतात. दक्षिणेंत या जातीचे लोकांस हल्लीं टाकणकार असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. याचें कारण इतकेंच दिसतें कीं उघड या लोकांचा धंदा जांतीं वगैरे टाकण्याचा आहे. तेव्हां टाकणें या क्रियापदापासून टाकणकार हें नांव त्या लोकांचे धंद्याचे संबंधानें पडलें असावें. वर सांगितलेल्या पारधी लोकांच्या ज्या आणखी पांच जाति आहेत त्यांचा विस्तारही बावरी घराण्यापासूनच आहे. हे लोक पुष्कळ वर्षांपूर्वी गुजराथ प्रांतांतून खानदेश, वऱ्हाड, नागपुर प्रांत, दक्षिण व निज्याम सरकारचे राज्याचे कांहीं भाग यांत येऊन राहिले. सांप्रत काळीं हिंदुस्थानांत राहाणारे बावरी किंवा बदला जातीचे लोक जी भाषा बोलतात तीच भाषा याही साहा जातीचे लोक बोलतात. वागरी टाकणकार लोकांचा व इतर पारधी जातीचे लोकांचा परस्पर विवाह होत नाहीं. वर लिहिलेले सर्व

देशांत टाकणकार जातीचे लोक फार आहेत. या लोकांचें उपजीविका करण्याचें उघड साधन ह्मटलें ह्मणजे जातीं टाकण्याचें आहे परंतु हे लोक जबरी चोरी व रात्रीं घरफोडी करण्याचे कामांत वस्ताद असून त्यांचे उपजीविकेचें खरें साधन हेंच आहे. या लोकांचें दक्षिणेंत फार दिवसापासून राहणें असल्यामुळें त्यांचा पेहेराव कुणबी लोकांसारखा झाला आहे. हे लोक जातीं टाकण्याचे निमित्यानें बाहेर फिरून कोणतें घर फोडण्याचें किंवा कोणत्या घरावर डाका घालावयाचा अशाबद्दल बातमी मिळवितात. व या कामासाठीं ते मुद्दाम हेरही ठेवितात. वागरी टाकणकार बहुतकरून गांवाबाहेर झोंपडीं बांधून राहतात. गांवाबाहेर राहिल्यानें त्यांस चोरी करण्याकरितां जाण्यास सोईवार पडतें; दुसऱ्याचे दृष्टीस पडण्याची भीति राहत नाहीं. हे लोक शेती वाडी ही करितात. चोरी करण्याकरितां या लोकांनीं आपआपले प्रदेश विभागून घेतले आहेत. प्रत्येक विभागांत एक मुख्य असतो. त्यास मेहेतर असी संज्ञा आहे. मेहेतर चोरी करण्याचे कामांत शरीक होत नाहीं. जाति संबंधी जे वाद उत्पन्न होतील त्यांचा निवाडा करणें हें त्याचें मुख्य काम होय. त्यास त्याचे हद्दींत झालेले चोरींतील मालाचा हिस्सा मिळतो. या जातींत जे लोक घरचे साधारण सुखी असतात व ज्याजपासीं जमीन किंवा इतर जिंदगी असते असे लोक बहुतकरून मालाविषयीं पाळत ठेवून चोरीच्या सर्व तजवीजी करितात. मागें हे लोक आपले हद्दीबाहेर चोरी करीत नव्हते. ह्मणजे एका मेहेतराचे ताब्यांतील लोक दुसरे मेहेतराचे ताब्यांतील प्रदेशांत चोरी करीत नव्हते. आलीकडेस हा निर्बंध राहिला नाहीं. ज्यास जो वाटेल तो मुलूक मारून खावा. वागरी लोक आपले राहण्याचे ठिकाणाचे आसपास पांच पंचवीस कोशांत चोऱ्या करितात. हे लोक चोऱ्या करण्याकरितां उत्तर देशांत राहणारे बावरी लोकांप्रमाणें दूर देशीं फिरत नाहींत. लग्नांत किंवा दुसरे धर्म संबंधीं कामांत जेव्हां हे लोक एकत्र जमतात त्या वेळेस चोरीविषयीं मनसोबा होतो. त्या वेळेस जो बेत ठरतो तो ताबडतोब अमलांत येतो असें नाहीं. कधीं कधीं कित्येक महिने दरम्यान गुजरतात. हे लोक चोरी करण्यास जाते वेळेस हमेश तलवारी व भाले बहुतकरून बरोबर

नेतात. खेडेगांवांत राहणारे श्रीमान लोकांचे घरावर हे कधीं कधीं डाके घालतात. अशा प्रसंगीं हे आपले टोळींत महार, मांग आणि मुसलमान या जातीचेही लोक घेतात. असा मोठा गुन्हा करण्याचा इरादा असेल तेव्हां ज्या गांवावर डाका नेणें असेल त्या गांवचे जवळच एक झाड ( हें मात्र बहुतकरून निंबाचें असतें. कारण या जातीचें झाड ते लोक पवित्र समजतात.) मुकरर करितात व या झाडाखालीं सर्व लोक नेमलेल्या वेळीं आपआपले गांवांहून येऊन जमतात. यांत कांहीं मनुष्यांपाशीं हत्यारें असतात, कांहीं टेंभे धरतात व बाकींच्या जवळ सोटे असतात. आलिकडेस बंदुकी किंवा तमंचे क्वचित नेतात. गावांत शिरल्यावर ज्या घरावर डाका घालण्याचा असेल तिकडेस नीट जातात आणि घराचा दरवाजा फोडून आंत शिरतात. टोळीपैकीं कांहीं लोक जवळ पुष्कळ दगड घेऊन रस्त्याचे कोपऱ्या कोपऱ्यावर उभे राहतात. या लोकांचें इतकेंच काम असतें कीं जर गांवकरी लोकांपैकीं कोणी घरवाल्याचे मदतीस येतील तर त्यांस येऊं देऊं नये.—घरांतील रोकड किंवा डागडागिणा दाखवून देण्याकरितां वागरी टाकणकार लोक घरांतील मनुष्यांस अतिशय इजा करितात अशा विषयीं प्रसिद्धी आहे. चोरी करण्याकरितां गेलेले मंडळीपैकीं जर एखादा इसम पकडला गेला, जखमी झाला अगर मारला गेला तर टोळींतील दुसरा एक मनुष्य रातोरात त्याचे घरीं जाऊन निंबाचा एक डाहळा त्याचे घरावर किंवा अंगणांत गुपचुप फेकून देतो. म्हणजे त्याचे घरचे मनुष्यांनीं तो डाहळा दुसरे दिवशीं सकाळीं पाहिल्यावर कांहीं धोका झाला आहे असें समजून अगदीं स्तब्ध राहावें. एके ठिकाणीं अशी गोष्ट लिहिलेली आहे कीं टाकणकार जातीचा एक मनुष्य रात्रीं घरफोडी करण्यास गेला असतां मारला गेला. त्याचें प्रेत दुसरे दिवशीं गांवचे कुणबी व महार वगैरे लोकांनीं ओळखलें परंतु मयत मनुष्याचे आईनें किंवा बायकोनें बिलकुल ओळख दिली नाहीं. आणि या दुराग्रहाचें कारण इतकेंच कीं वागरी लोकांनीं ती चोरी केली नाहीं ही गोष्ट स्थापित करावी असें होतें. एखादा मोठा गुन्हा करण्याचा असेल तेव्हां वागरी लोक धोतर अंगाभोंवतीं गुंडाळून त्याचे वरचे दोन पदर पाठीकडेस दोनही खांद्यांचे मधोमध बांधतात

व दुसरे दोन पदर खालीं बांधतात. तोंडास कपडा गुंडाळून डोळे मात्र उघडे ठेवितात. डाका किंवा राहजनी करते वेळेस कांहीं बोलण्याचें काम पडल्यास ते हिंदुस्थानी भाषेंत बोलतात. घर फोडण्याचे कामांत यांचा बाणा आहे. या जातीचे लोकांनीं फोडलेलें घर छिद्रावरून सहज ओळखतां येतें. या लोकांनीं केलेलें छिद्र बाहेरून उंच असून घराचे आंतले बाजूस उतरतें असतें व छिद्राच्या सर्व बाजू बरोबर असतात इतर लोकांप्रमाणें निमुळत्या नसतात. या लोकांचें छिद्र चहूंकडून साफ केलेले असतें व त्याजवर खणण्याचे हत्याराच्या बारीक निशाण्या असतात. या हत्यारास ते आपले भाषेंत कुटरना ह्मणतात. इतर घरफोडी करणारे लोकांप्रमाणें वागरी डोक्याकडून आंत शिरत नाहींत. ते पायांकडून जातात व याच कारणाकरितां हे उतरतें छिद्र करितात. व कदाचित घराचे आंतील जमीन बाहेरचे जमिनीपेक्षां सखल असली तरी तेंही अंतर निघून जातें. चोरींत मिळालेला माल हे लोक फार तजविजीनें छपवितात. चोरीचे मालाचा शोध लावण्याकरितां या लोकांचे घराचा झाडा घेणें अगदी निरर्थक आहे. कारण हे लोक चोरीचा माल कधीं आपले घरांत ठेवीत नाहींत. असा माल बहुतकरून ते आपले घराचे पिछाडीचे भिंतीशीं किंवा गुरें बांधण्याचें खुंट्याजवळ पुरितात. परंतु ज्याजपाशीं असा माल आहे तो जर चोरीचे कामांत प्रख्यात असेल तर तो आपला माल घरापासून फार अंतरावर किंवा एखादे शेतांत पुरून ठेवतो. चोरीचा माल घेणारे त्यांचे भरवशाचे ठरीव सोनार असतात. त्यांच्या शिवाय दुसऱ्यास ते आपला माल कधीं देत नाहींत. हे लोक हंगामाचे दिवसांत धान्याची व कापसाचीही चोरी करितात. आणि माल आपले किंवा जातभावाचे शेतांत उत्पन्न झालेल्या मालांत मिळवून देऊन ना पत्ता करून टाकतात. ते कुत्रे बरोबर घेऊन जंगली डुकरांची शिकार करतात व फासे मांडून ससे धरतात. यामुळें कोठें कोठें या लोकांस पारधीही ह्मणतात. हल्लीं वागरी जातीचे पुष्कळ लोक वऱ्हाडांत, खानदेशांत व निज्याम सरकारचे मुलकांत जागल्याची नोकरी करितात.

**टीप.**—या जातीविषयीं जास्त माहिती शेरींग साहेबांनीं केलेल्या पुस्तकाच्या दुसरे भागांतील २२८ वे पानांत मिळेल.

## लंगोटी पारधी-जातीचें खरें नांव बावरी.

वागरी (टाकणकार) लोक दक्षिणेंत आल्यानंतर पुष्कळ वर्षांनीं बावरी घराण्याची एक शाखा त्यांचे मागून येऊन खानदेशांत व वऱ्हाड प्रांताचे उत्तर प्रदेशांत राहिले. आणि कोणास न जुमानतां ते आपला, डाका, राहजनीं व घरफोडीचा धंदा चालवूं लागले. शेवटीं शेवटीं या लोकांचा व वागरी लोकांचा इतका उपद्रव झाला कीं बिचारे शेतकरी लोकांस ते केवळ काळाप्रमाणें वाटूं लागले. नंतर आपले गांवावर या लोकांची धाड येऊंनये व रयतेस सुख व्हावें या हेतूनें गावोंगांवचे पाटील लोकांनीं यांच्याशीं ठराव करून तुम्ही आमचे गांवास उपद्रव न दिल्यास आह्मी अमुक रकम देत जाऊं अशा बदल लेखी करारनामे केले. व या दोन्ही जातीचे लोक पुष्कळ खेड्यांत जागलीचे कामीं ठेवले गेले. त्या वेळेस वऱ्हाडप्रांत इंग्रज सरकारचे अमलाखालीं नव्हता. हे जे पूर्वीं गांवकरी व चोरटे लोकांचे दरम्यान चमत्कारिक करारनामे झाले ते अद्याप ही कांहीं ठिकाणीं राखून ठेवले आहेत. वर सांगितलेले मागून जे लोक आले त्यांस फासे मांडून शिकार धरण्याचा फार छंद होता याजमुळें त्यांचें नांव पारध्या शब्दापासून पारधी असें पडलें. हें नांव दुसरे पुष्कळ लोकांस आहे. परंतु हे लोक त्या वेळेस लंगोटी नेसत होते व अजून ही नेसतात याजमुळें त्यांच्यांत व इतर पारधी जातीचे लोकांत भेद दाखविण्याकरितां त्यांस लंगोटी पारधी असें नांव दिलें आहे.

या जातीचे पुरूष दिसण्यांत सुरेख असतात. यांचा तोंडवळा इतर लोकांहून अगदीं भिन्न असून मेवाडी किंवा फासपारधी लोकांचे तोंडवळ्यासारखा असतो. फासपारधी लोकांचा धंदा म्हटला म्हणजे फासे मांडून शिकार धरणें हा होय. हे लोक हमेशाचे फिरस्ते असून बहुत करून सर्व जिल्ह्यांत आढळतात आणि गांवोगांवचे आठवडा बाजारांत ही जातात. लंगोटी पारधीलोकांचा पेहराव अगदीं साधा असतो; म्हणजे एक धोतर ढुंगणाभोंवतीं गुंडाळलेलें असतें, एक खांद्यावर व एक पागोटें डोक्याला. अगदी अज्ञान अवस्थेंत असतां मात्र डोक्याचे केश एकदां कातरतात. पुढें केशास कधीं ही कातर किंवा वस्तरा लावीत नाहींत.

जेव्हां हे लोक प्रथम इकडेस आले तेव्हां यांच्या बायका लहंगा घालीत होत्या व अंगांत घट्ट चोळी घालीत असून तिचे कसे राजपुत लोकांच्या बायकांप्रमाणें मागें बांधीत असत; आणि डोक्यावरून एक ओढणी घेत. परंतु इकडच्या लोकांच्या सहवासानें त्यांच्या पेहरावांत थोडा थोडा फरक होत गेला व आतां फक्त लुगडें नेसतात व साधी चोळी अंगांत घालतात.

जशी या जातीचे लोकांत व मेवाडी किंवा फासपारधी लोकांत देवीची भक्ति करितात तशी दुसरे लोक करीत नाहींत. प्रत्येकाचे घरीं एक चांदीची देवी असते. या जातीच्या बायका पायांत चांदीचे तोडे घालीत नाहींत कारण त्यांची देवी त्या धातूची केलेली असते; तसेंच देवीची स्थापना लाल पांघरूणावर केलेली असते या कारणासाठीं त्या लाल लुगडेंही नेसत नाहींत. देवीचें शयन पलंगावर आहे असें ते लोक समजतात याजमुळें ते कधीं बाजेवर निजत नाहींत. आणि देवीचा क्रोध होईल या भीतिस्तव ते जोडा घालून झोपडींत जात नाहींत. दर वर्षी नियमित काळीं देवीस मेंढ्याचा व लहान हेल्याचा बळी देतात व त्या दिवसांत मोठा उत्साह करितात. टाकणकार लोकांप्रमाणें या जातींत दोन किंवा ज्यास्त बायका करण्याची मनाई नाहीं. कुटुंबांतील एक भाऊ मरण पावल्यावर, मयताचा जो सर्वांत वडील भाऊ हयात असेल त्यांनीं त्याचे विधवेशीं लग्न करून तिचें पोषण केलें पाहिजे. लंगोटी पारधी लोक फिरस्ते नाहींत ते गांवचे बाहेर आपलीं पक्कीं घरें बांधून राहतात. गांवचे बाहेर राहण्याचा हेतु इतकाच कीं हे लोक काय करितात अथवा कोठें जातात हें शेजारचे किंवा इतर गांवकरी लोकांस समजूं नये. ते चौकीदारीची नोकरी खुषीनें पतकरतात परंतु ज्या नोकरी करितां घर व गांव सोडावें लागेल अशी नोकरी करीत नाहींत. इंग्रज सरकारचे अमलांत या लोकांचा लुटारूपणा पुष्कळ कमी झाला व पूर्वी ज्याप्रमाणें मोठमोठाले डाके पडत व खून होत त्याप्रकारचे गुन्हे आतां होत नाहींत. तथापि या लोकांचे मनांतील लूट करण्याविषयींची प्रीति अद्याप नाहींशी झाली नाहीं. पोक्त वयाचे लोक अद्यापिही दरोडे घालतात. परंतु नवीन लोक डाके न घालतां घरफोडी करितात. घरफोडी करण्याचे कामांत ते फार हुशार आहेत व

बहुतकरून त्यांस अपयश येत नाहीं. हे लोक जें भिंतींत छिद्र करितात तें टाकणकार लोकांसारखेंच असतें परंतु तितकें सुबक नसतें. ते आलिकडेस एकमेकांवर भरंवसा ठेवण्यास इतके भितात कीं क्वचित प्रसंगीं दोन किंवा तीन इसम एकत्र जमून घर फोडतात. बहुतकरून एकटेच चोरी करण्याकरितां जातात. मोठा डाका घालण्याचा असेल तेव्हां मात्र दुसरे जातीचे लोकांस ते आपल्यांत घेतात व त्यांस मालाचा हिस्साही देतात. बहुत करून चोरी करण्यास जातांना ते हत्यारबंद असतात; व हत्यार चालविण्यास बिलकूल मागें पुढें पाहत नाहींत. तोंड कोणास ओळखतां येऊं नये ह्मणून तें कपड्यानें गुंडाळतात. चोरींत मिळालेला माल ते प्रथम घरीं आणित नाहींत. पहिल्यानें दूर एका ओसाड जागेंत पुरून ठेवितात; व कित्येक महिने माल तेथेंच राहूं देतात. पुढें गांवांत चोरीचा विसर पडत चालला असें पाहून तो माल बाहेर काढून त्याचे हिस्से करून घेतात.

चोरी करण्यास गेलेल्या लोकांपैकीं जर एखादा इसम मारला गेला तर त्याचा पुरा हिस्सा त्याचे बायकोस व जर त्यांस मुलें असतील तर त्यांस मिळतो. व तीं वयांत येऊन आपल्या पोटाचा उद्योग करूं लागे पर्यंत सर्व लोक मिळून त्यांचें पोषण करितात. बागरी (टाकणकार) जातीचे लोकांप्रमाणें हे लोक शेतीवाडी फारसी करित नाहींत. फासे मांडून धरलेल्या शिकारीवर किंवा खेडेगांवांत जागलेपणाची नोकरी करून निर्वाह करितात. खानदेशाच्या उत्तर भागांत व वऱ्हाडांत या जातीचे पुष्कळ लोक या कामावर नोकर आहेत. हे लोक अधिक अधिक दक्षिणेकडेस न जातां आपले पूर्वजांचेच ठिकाणास धरून बसले हें आश्चर्य आहे. टाकणकार लोकांप्रमाणें या जातीचे लोकही अद्यापि गुजराथी भाषा बोलतात. व या दोन्ही जातींची बोलण्याची पद्धत एकसारखीच आहे. यांचे बोलण्यांत बदला लोकांचे पुष्कळ शब्द येतात त्यावरून हे मूळचे बावरी घराण्यांतील आहेत ही गोष्ट निःसंशय सिद्ध होते.

---

# चित्तेवालेपारधी, (यांचें) खरें नांव बावरी.

हे लोक हिंदुजातीचे आहेत. हे चित्त्यास फांस घालून जिवंत धरितात व त्यास माणसाळवून ते राजे रजवाड्यांस विकतात या गोष्टीवरून त्यांचें नांव चित्तेवाले पारधी असें पडलें आहे. कांहीं राजेलोकांनीं चित्ते धरून देण्याचे कामाकरितांच या जातीचे कित्येक लोक आपले पदरीं नोकरीस ठेविले आहेत. चित्तेवाले पारधी, ही जात बावरी ह्मणून जी एक मोठी जात आहे तिची शाखा आहे. हे लोक अद्यापि गुजराथी भाषा बोलत असून यांच्या पुष्कळ रीतिभाती ही बावरी लोकां प्रमाणें आहेत. लंगोटी पारधी व दुसऱ्या कांहीं पारधी लोकांच्या जातीशीं यांचा विवाह होतो. हे लोक दिसण्यांत लंगोटीपारधी लोकांप्रमाणें असून खरोखर ते लंगोटीही नेसतात परंतु त्यांचे राहणींत फरक आहे. हे लोक खरे फिरस्ते असून यांची मुद्रा अधिक कावरी बावरी दिसते. यांच्यांत जो मुख्य असतो त्यास ते नाईक ह्मणतात. हे लोक हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत बाहेर फिरून पावसाळ्याचे आगोठीस निजाम सरकारचे राज्यांत (मोंगलाईंत) जाऊन एखादे ठिकाणीं गुजराणी पुरतीं झोपडीं बांधून राहतात; आणि बरसात संपतांच पुन्हा बाहेर पडतात. बाहेर फिरतांना हे लोक पालें वगैरे बाळगीत नाहींत; झाडाखालीं उतरतात. उपजीविका करण्याचें यांचे उघड साधन ह्मटलें ह्मणजे फासे लाऊन शिकार धरणें हें होय. तथापि फासपारधी किंवा पालपारधी आणि हे एकाच जातीचे आहेत असें समजूंनये. या दोन जाति अगदी निराळ्या आहेत. फासपारधी लोकांची राहणी फार अमंगळ असल्यामुळें लोक त्यांचा तिरस्कार करितात. चित्तेवाले पारधी डोक्याची हजामत न करितां केश तसेच लांब वाढवितात. कधीं कधीं ते गळ्यांत काचेच्या मण्यांच्या माळा घालितात. या जातीचे बायकांचा पेहराव साधारण मराठे लोकांच्या बायकां प्रमाणें असतो परंतु ह्या काचेच्या काळेमण्यांच्या माळा गळ्यांत घालतात. यांचीं मुलें कांहीं नियमित वयाचीं होत तों पर्यंत त्यांचे गळ्यांत नेहमी गारेच्या काळ्या व पिंवळ्या मण्यांच्या माळा असतात. या जातीचे पुरूष व

तशाच बायका दिसण्यांत अगदी घाणेरड्या व अमंगळ असतात. जी नोकरी धरली असतां आपले जातीचे लोकांत नेहेमी राहतां येणार नाहीं अशी कोणतीहि (जागल्याची किंवा दुसरी) नोकरी ते करित नाहींत. ते धान्याच्या व कापसाच्या चोऱ्या करितात व उभें पिकही कापून नेतात. एखाद्या घराचा दरवाजा उघडा असून आंत कोणी नाहीं असें दिसल्यास हे बेलाशक त्या घरांत शिरून जें हातीं पडेल तें घेऊन जातात. डाका, रहाजनी, घरफोडी, जनावरचोरी किंवा खिसे कातरणें वगैरे प्रकारचे गुन्हे हे लोक कधीं करित नाहींत. यांच्या पाशीं लहान चाकांच्या गाड्या असतात. यांनीं एखादा चित्ता धरला असल्यास त्यास त्या गाडीवर बांधतात; नाहींतर सामानसुमान टाकून नेतात. या लोकांचे टोळी बरोबर कधींकधीं पाळलेले चित्तेही असतात. या चित्त्या कडून हरणांची शिकार करवून तें मास सर्व जण वाटून घेतात व त्यांस पुरून कांहीं उरल्यास तें विकून टाकतात. ते फासे मांडून शिकार धरतात तेव्हां फासपारध्या प्रमाणें बैल किंवा गाई बरोबर नेत नाहींत. या लोकांचा जर एकेच ठिकाणीं फार दिवस मुक्काम झाला तर चोरीचा माल छपवून ठेवण्या करितां हे जमीनींत भोंकें पाडतात. प्रत्येक तोंडाशीं अगदी निरुंद असतें परंतु आंत पुष्कळ जमीन पोखरून ढोलार केलेलें असतें व त्यांत ते माल ठेवितात. या भोंकाचें तोंड तजविजीनें झांकून रात्रीस त्या जागेवर टोळी पैकीं एक मनुष्य निजतो. ज्या ठिकाणीं हे लोक उतरून गेले असतील त्या ठिकाणीं जाऊन पाहिल्यास अशा प्रकारचीं कधीं कधीं पुष्कळ छिद्रें सांपडतील. या छिद्रांचा पत्ता लावणें झाल्यास हे ज्या ठिकाणीं उतरले असतील त्या जागेच्या सभोंवतीं काठीनें ठोकून पाहवें व ज्या ठिकाणीं पोकळ आवाज येईल ती जागा खणून पाहावी.

---

## सोनोरिया.

सोनोरिया लोक हे बुंदेलखंडांतील राहणारे असून यांचा उचलेपणाचा आणि खिसे कातरण्याचा धंदा पिढीजाद चालत आलेला आहे. हे लोक आपल्या कसबांत कुशल असून धीट आहेत. दुसऱ्या-

समोर जर आपले हेतु परस्परांस कळविण्याचे असतील तर कोणास न समजतां तसें करतां यावें यासाठीं यांचे कांहीं ठरींव इशारे आहेत आणि ते इतके आहेत कीं यांस कोणतीहि गोष्ट परस्परांस गुप्त रीतीनें कळविण्याची अडचण पडत नाहीं. हे चोऱ्या दिवसा करितात रात्रीं करित नाहींत. सूर्यास्तापासून सूर्योदय होईपर्यंत दरम्यान चोरी न करण्याविषयीं यांच्या धर्मांत शपथ आहे आणि ती हे मोठ्या निष्ठेनें पाळतात. हे बुंदेलखंडांत व भोपाळप्रांतांत राहतात. आणि प्रत्येक वर्षाचे नवेंबर किंवा दिसेंबर महिन्यांत मोठमोठ्या टोळ्या जमवून आपले देशांतून निघतात व पुढें लहान लहान तुकड्या करून सर्व हिंदुस्थानभर पसरतात. यांस जिकडे जाण्याचें आहे तिकडे रेलवे असल्यास हे आगगाडींत बसून जातात नाहींतर पायीं जातात. प्रत्येक टोळींत एक मुख्य असतो त्यास ते मुखत्यार ह्मणतात. हरएक टोळीबरोबर पुष्कळ मुलें असतात; व चोरीच्या कामांत त्यांची फार मदत असते. यांच्या बायकामात्र घर सोडून जात नाहींत. हे अमुकच वस्तु चोरतात व अमुक चोरींत नाहींत असा बिलकूल निर्बंध नाहीं. जें हातीं लागेल तें चोरतात. मौल्यवान हिरे, मोत्यें व उंची रेशमी वस्त्रें सांपडलीं तर तीं चोरतील यांत नवल नाहीं परंतु फाटक्या चिंध्यांचें गाठोडें किंवा जुन्या चाकूचें गंजलेलें पान दिसल्यास तेंही नेल्या वांचून सोडणार नाहींत. हे देशाहून निघण्यापूर्वीं आपआपलीं एकत्र जमण्याचीं गांवें योजून ठेवितात व त्या गांवीं बहुत करून यांचे वळणांतले चोरीचा माल घेणारे कांहीं इसम असतात. हा माल ते होईल तितक्या लवकर विकून टाकून त्याचे दाम करितात. शिमग्याचे सणाकरितां हे लोक बहुतकरून आपआपले घरीं जातात. व घरीं जाण्यास निघण्या पूर्वीं सर्व लोक एकत्र जमून चोरीचें जें उत्पन्न झालें असेल त्याचे वांटे करून घेतात. परंतु हिस्से होण्यापूर्वीं अशी शपथ घ्यावी लागते कीं चोरींत जितका माल मिळाला तितका सर्व वांटे होण्याकरितां हजर केला आहे. या शपथेचा हेतु इतकाच दिसतो कीं कोणी आपल्यास चोरींत मिळालेला माल छपवून ठेऊं नये व सर्वांस सारखे वांटे मिळावे. हे आपले देशाचे मुख्य अधिकाऱ्यास

नजर देण्याकरितां दुशाले किंवा दुसरीं कांहीं भारी किमतीचीं वस्त्रें चोरींत मिळाल्यास तीं मुद्दाम राखून ठेवतात. बाहेर फिरत असतां सोनोरिये लोक पालांत किंवा छपरांत राहत नाहींत. झाडाखालीं उतरतात; किंवा एखादें देऊळ, गांवाबाहेर बरेंच अंतरावर असल्यास तेथें उतरतात. यांस ओळखतां येण्यासारखें या लोकांचे पेहेरावांत विशेष कांहीं नसतें परंतु बहुतकरून या लोकां पैकीं प्रत्येक इसमापाशीं एक बटवा असतो व तो ते नेहमीं खांद्यावर टाकून फिरतात. हा बटवा खारव्याचा असून त्यास आंतले बाजूस खादीचें अस्तर असतें व तोंडाशीं एक लांब दोरी शिवलेली असते. या बटव्यांत पुष्कळ पुडें असतात व तीं तंबाखु, चिलम, चकमक, पानसुपारी, कंगवा, चाकू वगैरे ठेवण्याच्या उपयोगी पडतात.

हे लोक मोठाल्या यात्रेंत आणि आठवडा बाजारांत जातात. यांची चोरी करण्याची जी मुख्य रीत आहे तशी दुसरे कोणतेही जातींत सांपडत नाहीं. यां पैकीं एक इसम संभावितपणाचा आव घालण्याकरितां चांगला पोषाख करितो व बरोबर दोन मुलें व एक जलद धांवणारा दुसरा मनुष्य असे घेऊन यात्रेंत जातो. यात्रेंत गेल्यावर जशी काय त्या सोंग घेतलेल्या संभावित मनुष्याशीं ओळख नाहीं असें दाखविण्याकरितां तीं मुलें व तो दुसरा मनुष्य त्याचे मागें बऱ्याच अंतरावर चालतात. पुढें चालणारा मनुष्य रस्त्याचे दोन्ही बाजूंस असलेलीं दुकानें न्याहाळीत जातो व आपला हेतु सिद्धीस जाण्या माफक असें एखादें दुकान पाहून तिकडे वळून त्या दुकानदाराशीं बोलूं लागतो. तितक्यांत याज बरोबरच्या दोन मुलां पैकीं एक जसा कांहीं एरव्हींच फिरत फिरत आल्यासारखें दाखवून त्याज जवळ पुढें किंवा बाजूस उभा राहतो. दुसरा मुलगा आणि मनुष्य कांहीं अंतरावर उभे राहतात. या गिराइकास दुकानदार आपला माल काढून दाखवितो परंतु याचे कांहीं मनासच येत नाहीं. शेवटीं तो माल तसाच पुढें पसरून पडला आहे इतक्यांत तो मनुष्य कांहीं विचारांत घोटाळून गेला आहे असें दाखवून आपलें डोकें खाजवूं लागतो (हा त्या मुलास हुशार राहण्या बद्दल इषारा आहे;) आणि दुकानदारास बोलण्यांत गुंतवून त्याचें लक्ष

सामानावर नाहीं असें पाहून जवळच्या मुलास आपले कोपरानें स्पर्श किंवा इतर प्रकारानें खुण करितांच तें पोर दुकानदाराची नजर चुकवून जो माल अगदी जवळ पडला असेल तो घेऊन हळुच निघून जातो व तो माल दुसऱ्या पोरापाशीं किंवा मनुष्यापाशीं देतो. ज्याचे स्वाधीन चोरलेल्या जिनसा केल्या असतील तो त्या घेऊन लागलीच मागले पायानें पळून जातो. मग तो सोनोरिया आपल्याला पाहिजे तशी वस्तु दुकानांत नाहीं ह्मणून दिलगिरी दाखवून शांत मनानें त्या दुकानांतून पुढें चालता होतो. दुकानदार आपला पसरलेला माल पुन्हा गोळा करूं लागे पर्यंत, त्यांतील कांहीं जिनसा नाहींशा झाल्या आहेत हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. परंतु तो दुकानांतून जाण्यापूर्वींच जर आपलें नुकसान झालें ही गोष्ट दुकानदारास समजली तर उचल्या त्याजबद्दल हळहळ दाखवितो. याची कांहीं यांत लबाडी असेल असा संशय दुकानदारास येत नाहीं. अशा रीतीनें मोठमोठ्या किमतीच्या शाली दुसरीं वस्त्रें व मोत्यांचे सर वगैरे चोरितात. हाच उपक्रम शहरांतील दुकानांतही चालतो. यांच्या चोरीकरण्याच्या आणखीही पुष्कळ तऱ्हा आहेत. प्रवाशांचा समुदाय स्वयंपाक करितांना जर द्रिष्टीस पडला तर यांचे टोळी पैकीं एक असामी स्वयंपाक करणारे लोकांचे जवळ जाऊन बसतो व तजविजीनें आपल्या दुःखाची काहणी सुरू करून सर्वांचें चित्त वेधून घेतो व त्याचा एक साथीदार जवळच टेहेळत असतो तो एखादा तांब्या किंवा दुसरें जें नेतां येईल तें उचलून घेऊन जातो. यांची चोरी करण्याची दुसरी एक रीति आहे. तिचा उपयोग ते खेड्यापाड्याचे बाजारांत करितात. ती रीत अशी कीं, यांच्या पैकीं कांहीं लोक जमून खुप दारू पिऊन धुंद झाले आहेत असें बळेंच दाखवितात आणि मग आपसांत तंटा करून एकमेकांस अगदी निकरानें मारल्यासारखें करितात व "मेलों मेलों" ह्मणून आरोळ्या मारतात. हा कला ऐकून तिकडे काय चाललें आहे हें पाहण्या विषयीं ज्यांस इछा होते असे दुकानदार लोक आपला माल मोकळा सोडून जातात. मग काय! यांचे जे साथीदार पाळतीवर असतात त्यांच्या तर मनाजोगेंच झालें. ते जो माल सांपडेल तो लांबवितात.

या देशांत बहुतकरून अशी चाल आहे कीं जेव्हां श्रीमान पुरुष किंवा स्त्रिया तळ्यांत अथवा नदींत स्नान करण्यास जातात तेव्हां त्यांचे जवळ असलेला ऐवज व चिजवस्त व कपडे वगैरे आपल्या एखाद्या विश्वासूक नोकराचे हवालीं करून जातात व तो तें सामान घेऊन काठावर बसतो. दोन सोनोरिये पाण्याचे काठाकाठानें एका मागून एक कांहीं अंतरावर चालले असतात. त्यांपैकीं पुढला मनुष्य त्या दागिने संभाळणाऱ्या जवळून जातांना कांहीं पैसे कडोसरीस ठेवण्याचें निमित्त करून जणुकाय अकस्मात पडले असें दाखवून त्यांतून कांहीं पैसे युक्तीनें खालीं टाकतो. व पुढेंही तसेच थोडे थोडे पैसे टाकीत जातो. तो सामान संभाळणारा बहुतकरून प्रत्येक वेळेस उठून ते पडलेले पैसे घेऊन येऊन बसतो. असे प्रकारें तो उचल्या बरेच दूर पैसे टाकित जातो व पैशाच्या लालचीनें हाही जातो इतक्यांत त्या उचल्याचा मागें जो सोबती असतो तो संधि साधून तो बेहिफाजत पडलेला माल घेऊन पळून जातो.

जेथें पुष्कळ लोक जमले असतील अशा ठिकाणीं जाऊन सोनोरीये लोक गर्दीत खिसे कातरतात व मुलांच्या अंगावरील डागिणे काढून घेतात. तळ्याचे किंवा नदीच्या कांठीं कोणाचीं पांघरुणें पडलीं असून त्यांजवर कोणी राखण नसले तर तींही उचलून नेतात. खिसे कातरणाऱ्या दुसऱ्या जातीचे लोकां प्रमाणें सोनोरिया हा कोणाशीं बोलत असल्यास याची नजर एकाकडेसच नसते. हे लोक डाका, रहाजनी व घरफोडीचे गुन्हे कधीं करीत नाहींत. चोरी शिवाय दुसरा कोणताही गुन्हा करणार नाहीं असे बदल हे आपल्या देवीसमोर शपथ वाहतात आणि हे आपली शपथ कधीं मोडीत नाहींत.

---

## बंजारी किंवा लभानी.

ही जात मध्य आणि दक्षिण हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. यांचेजवळ लधाऊ बैल पुष्कळ असतात. त्यांच्यावर गोण्या लादून ते धान्याच्या आणि मिठाच्या खेपा करितात. आलिकडेस रेल्वे झाल्यापासून या

लोकांचा रोजगार अगदीं बुडाला; आणि ते आतां खेतीबाडीवर निर्वाह करूं लागले आहेत. या लोकांच्या चार जाति आहेतः—

१ मथुरिया. हे हिंदु असून क्षत्रिय जातीचे आहेत.

२ लभानी. जात हिंदु, क्षत्रिय.

३ चारण. जात हिंदु, रजपूत.

४ धारी. हे मुसलमान असून बंजारी लोकांचे भाट आहेत.

"धालिया" नांवाची आणखी एक जात आहे. हे लोक बंजारी मांग आहेत. बंजारी लोकांचे प्रत्येक जातींत पुष्कळ तांडे असतात व प्रत्येक तांड्यांत एक नाईक असतो. या देशांत दुसरे जातीचे लोकांपेक्षां चारण जातीचे लोक पुष्कळ आहेत परंतु गुन्हे करण्याविषयीं धारी जातीचे लोकांची सर्वांवर तान आहे. कोणते जातीचे लोक कोणत्या प्रकारचे गुन्हे करतात याजबद्दल पुढें माहिती दिली आहे. मथुरिया व लभानी या जातीचे लोक मुख्यत्वें करून जनावरें व मुलें चोरतात. मथुरिया या जातीचे बंजारी लोक जानवीं घालतात व त्यांच्या बायका बहुतकरून काळीं लुगडीं नेसतात. लग्न झालेल्या स्त्रिया आपले केश चमत्कारिक रीतीनें गुंफून त्यांस माथ्यावर एक गांठ देऊन ती एका मणक्यांत अडकवितात. या सर्व लक्षणांवरून मथुरिया जातीचे लोक ओळखण्यास फारशी अडचण पडत नाहीं. लभान आणि चारण यांचे पेहरावांत भेद इतकाच आहे कीं लभान लोकांच्या बायका लुगडीं नेसतात व चारण लोकांच्या लहंगे घालतात. वऱ्हाड पोलिसपैकीं मिस्तर कंबरलेज साहेब डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट पोलिस यांनीं बंजारी लोकांविषयीं सर्व हकिकतीचा रिपोर्ट सन १८६९ इसवी सालीं छापून प्रसिद्ध केला आहे त्यांत या जातींतील भेद, पोटभेद आणि धर्मसंबंधीं विधि यांजविषयीं सविस्तर माहिती दिलीच आहे ह्मणून आतां फक्त चारण व धारी जातीचे लोकांच्या चोऱ्याकरण्याच्या व दरोडे घालण्याच्या रीति कशा आहेत व ते लोक लुटीचा माल कोणत्या प्रकारें छपवितात याजबद्दल माहिती पुढें लिहिली आहे.

या लोकांचा ज्या वेळेस उत्कर्ष होता त्या दिवसांत हे मोठमोठाले डाके मारीत. चाळीस, पन्नास किंवा कधीं कधीं दिडशें पर्यंत लोकांची

हत्यारबंद टोळी जमवून खेड्यापाड्यांतील घरें लुटण्याकरितां, किंवा कोठें खजिना जात असल्यास त्याची पाळत ठेवून तो लुटण्याकरितां, अथवा कोणी पैसेवाला मुशाफर रस्त्यानें जात असल्यास त्याजवर डाका घालण्याकरितां हे लोक आपला तांडा किंवा उतरण्याच्या जागे पासून पुष्कळ दूरही जात असत. पुढें पुढें या लोकांच्या टोळ्या मोडत गेल्या. कित्येक लोक "ठगी आणि डेकाइटी" खात्यांत बातमीदारीचीं कामें करूं लागले व त्यांनीं पुष्कळ गुन्हे उघडकीस आणून आपले शेकडों जातभाई कैदेंत घातले. अलीकडेस या लोकांच्या रीतीभाती विषयीं पोलिसास कच्ची माहिती मिळाली आहे व आपले जाति संबंधी कोणतीही गोष्ट दुसऱ्यास कळविण्याची नाहीं असा जो पूर्वीं यांचे जातीचा कट होता तो आतां कायम राहिला नाहीं याजमुळें आतां पूर्वीं सारखे मोठमोठे डाके बंद झाले आहेत. हल्लींही ते डाके घालतात परंतु ते अगदीं हलक्या प्रतीचे असून रस्त्यावर किंवा अगदीं एकीकडे एखादें खेडें असल्यास तेथें मात्र डाका घालतात. या शिवाय रहाजनी करणें, जनावरें चोरणें, मेंढ्या व बकऱ्या चोरणें, लहान मुलें चोरून नेणें, मालाच्या गाड्या रात्रीस मुक्कामावर उभ्या असतां किंवा रस्त्यानें चालत असतां त्यांतील धान्याचे थैले मागून फोडून त्यातलें धान्य चोरणें, अथवा कपड्याचे गठ्ठे फोडून त्यांतील कपडा किंवा रेशीम काढून घेणें, यात्रेंत मालाची चोरी करणें, व हंगामाचे दिवसांत धान्य व कापूस चोरणें वगैरे असे हलक्या जातीचेच गुन्हे चारण आणि धारी जातीचे बंजारी करितात. ते बहुतकरून घरफोडी करीत नाहींत परंतु जर त्यांस अशा प्रकारानें चोरी करण्याचा एकदा छंद लागला तर ते फार तजविजीनें आपलें कार्य सिद्धीस नेतात. त्यांस गुन्हा करण्याचे जागेविषयीं व मालाविषयीं बातमी त्यांच्या सलगीचे कलाल लोकांकडून, अथवा त्यांचे जातीचे बंजारी लोक गुराखीपणावर किंवा शेतीचे कामावर असतात त्यांजकडून किंवा गांवचे मारवाड्याकडून मिळते. साधारणतः जेव्हां या लोकांचा चोरी करण्याचा विचार होतो तेव्हां हे टोळी जमवून, जो रस्ता नेहमीं फार वाहतो अशा रस्त्याचे बाजूनें दबा धरून शिकारीची वाट पाहत बसतात. जर त्यांचा विचार मोठा डाका किंवा रहाजनी करण्याचा असेल तर ते

गुन्हा करण्यास जाण्यापूर्वी त्यांच्यांत एक भगत असतो त्यास शकून विचारतात. हलक्या सलक्या गुन्ह्यांत शकून वगैरे कांहीं पाहत नाहींत. पूर्वी ते कांहीं विधि करून "मिटू बुकीया"चा शकून पाहत होते परंतु अलीकडेस त्यांनीं ती चाल सोडून दिली आहे. डाका मारण्यास जाण्या पूर्वी हे लोक एकत्र जमून दारू पिण्याकरितां भट्टीवर जातात अथवा ज्यास्त खबरदारी ठेवणें असेल तर सर्व भट्टीवर जात नाहींत फक्त दारू आणण्याकरितां एक दोन असामी मात्र जातात व बाकीचे लोक दूर बसतात. ज्या जागीं गुन्हा करण्याचा इरादा असेल ती जागा जर फार दूर असेल तर ते मध्यें भूक लागल्यास खाण्याकरितां शिजविलेलें अन्नही बरोबर घेऊन जातात. इंग्रज सरकारचे राज्यांत ते हत्यारें बरोबर नेण्याचे भरीस फारसे पडत नाहींत. ते घरून निघाले म्हणजे रस्त्यानें प्रत्येक इसम अंजन किंवा खैराची एक एक मजबूद काठी तोडून घेतो व तिची साल काढून टाकली म्हणजे ती अगदी पांढरी दिसते. या काठीस ते आपले भाषेत गेदी म्हणतात. ही गेदी काम संपल्यावर कोठें छपून ठवितात किंवा तिचीं तोडमोड करून जाळून टाकतात. रस्त्यावरचा डाका किंवा रहाजनी करण्याची असेल तर ते बहुत करून झाडीचा जंगल किंवा जिच्या जवळ पास टेकड्या आहेत अशी जागा पसंद करितात, कारण तशा जागेतून त्यांस हातीं न सांपडतां सहज पळून जातां येतें. ते बहुतकरून पहिल्यानें दगड फेकितात नंतर एकदम धावून जाऊन ज्या लोकांस लुटण्याचें असेल त्यांचे तोंडावर व डोक्यावर गेदीचा भडिमार करितात. डाका घालित असतां काम पडलेंच तर हिंदुस्थानी भाषा बोलतात परंतु चालेल तेथ पर्यंत एक अक्षरही न बोलतां फक्त चमत्कारिक ध्वनी काढून इशारे करितात. ते धोतर मात्र कसून बांधतात; दुसरा कांहीं कपडा वगैरे अंगावर घेत नाहींत. तोंड दुसऱ्यास दिसूं नये असे बेतानें धाटा बांधतात परंतु त्यांची राहण्याची जागा जर पुष्कळ दूर असेल तर असेंही करित नाहींत. कारण मग त्यांस ओळखले जाण्याची भीति राहत नाहीं. एखादे घरावर जेव्हां डाका घालतात तेव्हां दगड घेऊन रस्त्याचे प्रत्येक कोपऱ्यावर माणसें उभीं करतात (दगड रस्त्यानें जातांनाच वेंचून घेतलेले असतात.) जर कोणी गांवचे लोक

घरवाल्याचे मदतीस येऊं लागतील तर त्यांजवर दगडांचा वर्षाव करून त्यांस परत लावतात. टोळींतील मुख्य मंडळी दीन दीन असा शब्द उच्चारीत घरांत घुसून तांडा थोडा दूर असेल तर घरांत जें कांहीं हातीं लागेल तें सर्व घेऊन जातात. परंतु दरवड्याचे जागेपासून त्यांचा तांडा जर नजीक असेल तर मात्र, रोकड, डागडागीणा व कपडे या शिवाय दुसरा माल नेत नाहींत. गुन्हा केल्या नंतर आड रस्त्यांनीं आपले तांड्यांत जातात. व कोणास सहसा माग काढतां येऊं नये याजकरितां ज्या रुखास वास्तवीक जाण्याचें असेल त्याचे उलट दिशेस सुमार एक कोशभर जाऊन त्या ठिकाणीं चोरलेल्या मालपैकीं कांहीं तरी वस्तु किंवा एखादा कपडा टाकून नंतर चक्कर घेऊन घरीं येतात. पोलिसास खरा माग मिळून चोरांचा पत्ता लागूं नये याजकरितां ह्या युक्त्या करितात. एखादेवेळेस असेंही करितात कीं डाक्यानंतर ज्या तांड्यांतील लोकांशीं यांची अदावत आहे, असा तांडा नजीक उतरला असेल तर त्या तांड्यावर गुन्ह्याचा संशय दवडण्याकरितां मुद्दाम त्या तांड्याकडेस माग दाखवितात. लुटींत मिळालेल्या मालापैकीं जो माल ओळखण्याजोगा असेल तो तांड्यांत न आणतां जंगलांत पुरून ठेवतात. नाल्याचे कराडीस ज्या पाण्याचे प्रवाहानें कपारी पडतात त्या ठिकाणीं बहुतकरून कपडे पुरून ठेवितात. नाल्याचे मध्यभागीं रेतींत तांब्या पितळेचीं भांडीं व लोखंडी सामान पुरून ठेवून त्याजवर एक मोठा दगड ठेवितात. अथवा टेकडीचे बाजूस किंवा पिकें राखण्याकरितां मचान (मळा) बांधतात. अशा जुन्या मचानावरही कधीं कधीं माल छपवून ठेवतात. चोरींत मिळालेला कापूस जर एकदम माल घेणाराकडेस फरोक्त करण्याकरितां न नेला तर तो जंगलांत हिरव्या पानाच्या डाहळ्या खालीं किंवा तांड्यापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या कडब्याच्या गंजींत दाबून ठेवितात. गांवांत व वसान गढ्यांतून ज्या कोरड्या विहिरी असतात त्यांतही कधीं कधीं काप-साचे गठ्ठे, धान्याचे थैले किंवा कपडे टाकून देतात. जर कोणी माल घेणारा टोळीचे अगदीं भरवशाचा असेल तर चोरी करतां क्षणींच माल त्याचे येथें नेऊन स्वाधीन करून देतात. त्यांच्या सलगींतले

कलाल, तांबटकार, मारवाडी व गांवचे पाटील लोक त्यांजपासून चोरीचा माल घेऊन आपण त्याची व्यवस्था करितात. जनावर-चोरीच्या कामीं हे लोक फार प्रवीण आहेत व ते एका सपाट्यांत शंभर किंवा कधीं कधीं त्यांहूनही अधिक जनावरें चोरून नेतात. अशा प्रकारच्या चोऱ्या डोंगराळ प्रदेशांत किंवा ज्या जंगलांत टेकड्या आहेत अशा ठिकाणीं होतात. परंतु जे लोक या कामांत फारच निष्णात आहेत ते मैदानांतूनही अथवा जेथें सवड सांपडेल तेथून जनावरें चोरून नेतात. हे लोक असें करितात कीं रानांत गुराख्यानें जनावरें चारण्याकरितां आणलीं ह्मणजे हे जवळच थोडे अंतरावर छपून बसतात. व गुराखी केव्हां निजेल याची वाट पाहत राहतात. दोन प्रहर दिवसास विश्रांतीकरितां झाडाचे सावलीखालीं अंग टाकून दोन घटका झोंप घेण्याची गुराखी लोकांची चाल आहे. त्याप्रमाणें गुरें मोकळीं सोडून गुराखी झोंपेस गेला आहे असें पाहून हे छपून बसलेले असामी उठतात आणि जीं जनावरें चरत चरत सर्वांहून अधिक दूर गेलीं असतील त्यांस हाकून नेऊन एखाद्या खोऱ्यांत किंवा झाडीमध्यें लपवून ठेवतात. कधीं कधीं अनेक तांड्यांतील लोक या कामासाठीं एकत्र होतात. व आपलीं चोरलेलीं गुरेंही एकाच ठिकाणीं राहूं देतात. ते याप्रमाणें गुरें वळवून नेत असतां जर त्यांस कोणी रस्त्यांत भेटले आणि हीं गुरें कोणाचीं आहेत असा प्रश्न त्यानें केला तर त्यास ते असें उत्तर देतात कीं हीं गुरें पाटलाचीं किंवा इतर गांवकरीलोकांचीं असून चारण्याकरितां आमचे दिमतींत दिलीं आहेत. हा जबाब ऐकल्यावर प्रश्न करणाराचे मनांत कांहीं संशय राहत नाहीं व तो लागलाच पुढें चालता होतो. पुढें कांहीं दिवस लोटल्यानंतर त्या गुरांपैकीं पुष्कळ गुरें दूर नेऊन आठवडा बाजारांत विकतात व कधीं कधीं एक एक दोन दोन अशीं मध्येंच एखादे दिवशींही विकतात. यांचीं जनावरें चोरण्याची दुसरी एक युक्ति आहे; ती अशी कीं रात्रीस सुमारें शंभर बंजारे लोकांची टोळी जमून एखाद्या गांवांस जातात. व गांवचे सभोंवतीं घेरा घालून बसतात. त्यांपैकीं कांहीं लोक गांवांत जाऊन थोड्या थोड्या अंतरावर पांच सात घरें एकदम पेटवून देतात. मग गांवांत आग लागली

ह्मणजे जिकडे तिकडे गलबला होतो व सर्व लोक जागे होऊन बाहेर येतात. अशा प्रसंगीं कुणबी लोकांची अशी चाल आहे कीं ते आपल्या बायकांच्या व मुलांच्या बचावाकडेस इतकें लक्ष न देतां प्रथम गोठ्यांतील गुरें सोडून बाहेर हाकून देतात व नंतर इतर तजविजी पाहतात. याप्रमाणें सर्व गांवकरी लोकांनीं सोडून दिलेलीं गुरें बाहेर आलीं ह्मणजे हे टपून बसलेले लोक तीं तशीच पुढें हाकलून नेतात. इकडे गांवांत आगीमुळें चहूंकडे कल्होळ मचून जातो. बायका व पोरें ऊर पिटून रडतात व माणसें घरांतून सामान काढून आणलें तेव्हां कांहीं रस्त्यांत चिजा पडल्या तर नाहींत, ह्मणून आगीच्या उजडांत धुंडत फिरतात. अशा धांदलींत कित्येक तास पर्यंत गुरांचें कोणास स्मरण होत नाहीं. आणि पुढें जेव्हां होतें तेव्हां त्यांचा मागमुसही उरला नसतो. कारण तितक्या अवकाशांत गुरें दाहा कोशावर हाकून नेलेलीं असतात.

आणखी एक या लोकांची गुरें चोरण्याची युक्ति आहे ती ही. तांडा रस्त्यानें चालत असतां जर मध्यें दोन तीन बईल किंवा गाई मोकाट मिळाल्या तर त्यांस हाकून आपल्या गुरांचे मध्यें घालून घेऊन जातात. याप्रमाणें चोरलेलीं गुरें ते आलीकडेस कसई लोकांस विकतात. पूर्वीं बंजारी कधीं या लोकांस गुरें विकीत नव्हते. गांवांतलीं किंवा कोणी वाटसरांचीं जनावरें रस्त्यांचे बाजूस .बांधलीं असतील तर तींही ते कधीं कधीं रात्रीं चोरून नेतात. मेंढवाड्यांतून बकऱ्या आणि मेंढ्या चोरून नेण्याची त्यांची रीत अशी आहे कीं, अंधारे रात्रीं चार पांच असामी मेंढवाड्या जवळ जाऊन थोडे अंतरावर छपून बसतात. दुसरे एक दोन जण मेंढरांपाशीं जाऊन त्यांचे भोवतीं हात जमीनीवर टेंकून जनावरा प्रमाणें चालतात. हीं कोणी जंगलीं जनावरें आहेत असा त्यांस भास होऊन तीं चमकतात आणि जीव वाचविण्यासाठीं मेंढवाड्याचे बाहेर निघून रानोमाळ पळतात. इतक्यांत संधान पाहून छपून बसलेले असामी पैकीं प्रत्येक एक बकरी किंवा मेंढरूं घेऊन चालता होतो. परंतु ऐखादे वेळेस जर धनगर सावध झाला आणि ज्यांस पाहून मेंढरें भेदरून गेलीं आहेत तीं जंगली जनावरें नसून मनुष्यें आहेत असें जर त्यास समजलें तर तो लागलीच गोफण फेकणें सुरू करितो

आणि असें झाल्यावर बंजारी लोक कांहीं एक मागें पुढें नपाहातां एकदम त्याचे अंगावर धाऊन जातात; त्यास दगड मारतात; आणि त्याजजवळ असलेलें सामान व सर्व मेंढरें जबरदस्तीनें घेऊन जातात. कधीं कधीं मेंढरें चोरण्याकारितां आशा रीतीनें छपून न जातां उघड जातात आणि प्रथम दुरून दगड मारणें सुरू कारितात व मागून येऊन सर्व मेंढरें घेऊन जातात.

दिवसासही हे लोक मेंढ्या किंवा बकऱ्या चोरतात. त्यांची युक्ति अशी. अमुक ठिकाणीं कळप चरत आहे असें पाहून त्याचे जाण्याचे मार्गांत एखादे झुडपाखालीं दगडाचे आड खाड्यांत किंवा नाल्यांत बंजारी छपून बसतो व कोणाचे दृष्टीस पडल्यास त्याचें कपट उघडें पडूं नये इतक्यासाठीं कांहीं वनस्पतींच्या मुळ्या खणीत असल्या सारखें किंवा डीक काढीत असल्यासारखें दाखवितो. कळप त्याचे जवळून जाऊं लागतो तेव्हां एखादी बकरी किंवा एखादें मेंढरूं आपले आटोक्यांत आलें आहे असें पाहून, धनगराची नजर चुकवून, त्यास खालीं पाडून पुढचे दोन पाय ओढून मानेवर आणतो. आणि त्याची जीभ बाहेर ओढून तिचे शेंड्यास एक लांब कांटा टोंचून देतो. असें केल्याचे योगानें जीभ मागें घेतां येत नाहीं. आणि त्याचें ओरडणें सहजच बंद होतें नंतर त्यास आपले बसण्याचे जागीं दडून ठेवून आपण मोठ्या निस्पृहतेनें उठून चालता होतो. हें सर्व कृत्य अगदीं थोडक्या वेळांत आटपतो. धनगरास हा कांहीं एक प्रकार न समजून तो मेंढरें हाकण्याच्या नादांत पुढें जातो. तो बराच लांब गेल्यावर बंजारी त्या जागीं पुन्हा जाऊन तें मेंढरूं उचलून तांड्यांत घेऊन जातो. पुष्कळ प्रसंगीं याप्रमाणें मेंढरूं जिवंत न ठेवितां त्याची धरताक्षणींच मान मुरगाळून त्यास ठार करितात.

हंगामाचे दिवसांत धान्याची चोरी करण्याचा इरादा असल्यास दिवसास एक चांगलेंसे खळें पाहून ठेवितात. व रात्रीं तीन किंवा चार वाजतांचे सुमारास तेथें दबत दबत जातात. तेथील जागल करणारा मनुष्य बहुतकरून त्या वेळेस झोपेंत असतो. टोळींतील एक किंवा दोन मनुष्यांपाशीं काठ्या असतात ते त्या निजलेल्या माणसाजवळ उभे राह-

तात व बाकीचे लोक आपले घोंगडींत व धोत्रांत धान्य भरून गाठोडीं बांधून घेऊन जातात. बंजारी लोक या प्रमाणें चोरी करून जाई पर्यंत जर खळ्यांतील मनुष्यें जागीं न झालीं तर बरें, नाहीं तर ते खळ्यांतील जागल करणारे लोकांवरच हल्ला करितात; त्यांस खूप ठोकतात आणि धान्य तर एवीं तेवीं नेतातच परंतु त्याशिवाय त्या लोकांचे जवळ कांहीं माल सांपडल्यास तोही नेतात. कापूस चोरण्याचीही त्यांची हीच रीत आहे. कित्येक प्रसंगीं बंजारी लोक गुपचुप चोरी करून जात नाहींत; ते प्रथमच दगड मारून एकदम हल्ला करितात. ते रात्रीं उभीं पिकेंही कापून नेतात. शेतांतून झाडांवरून कापूस चोरून नेण्याची त्यांची रीत पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. कापूस वेचण्यास तयार होण्या पूर्वींच ते माल घेणाराशीं कापसाची किंमत वगैरे ठरवून ठेवतात. रात्रीस तांड्यांतील एका म्हाताऱ्या मनुष्यास नगारा वाजविण्यास लाऊन तांड्यांतील कांहीं पोरांस आणि पोरींस खूप आरोळ्या मारण्यास लाऊन देतात. बाकीचे असामी बैलांवर रिकाम्या गोण्या टाकून ज्या शेतांतला कापूस चोरण्याचा असेल त्याचे जवळ येतात. नंतर कांहीं लोक शेतांत जाऊन कापूस वेचूं लागतात, कांहीं गाठोडीं लांबविण्याचे कामीं असतात व कांहीं गोण्यांत भरतात. पांच साहा गोण्या भरून तयार झाल्या म्हणजे त्या बैलांवर घालून माल घेणारा (हे बहुतकरून मारवाडी असतात) कडे घेऊन त्याचे स्वाधीन करितात व तो लागलाच माल छपवून टाकतो. बंजारी लोक कापूस किती जलद वेचतात याची कल्पना सहसा कोणास करतां येणार नाहीं. शेतांत तंबाखू कापून वाळत घालतात ती व नदीचे काठां ताग धुण्याकरितां ठेविला असतो तोही चोरून नेतात. राहजनी किंवा डाका करितांना हमेशा गडबडींत हे लोक कवड्या किंवा चिरगुटाचे तुकडे किंवा गोफण कांहीं तरी विसरून जातात. हे लोक गुन्हा करण्याचे अगोदर दारू पीत असतात. गुन्हा घडल्या जागे पासून जवळच जर पानाचे नुकतेच ओढून टाकलेले तंबाखूचे चुट्टे सांपडल्यास तो गुन्हा या लोकांना केला असें पक्कें समजावें.

बंजारी लोक डाकामारल्या नंतर किंवा रहाजनी केल्यानंतर गुन्ह्याचे

जागेपासून सुमारें एक मैलाचे आंत त्या ठिकाणीं सपाट जमीन असल्यास मैदानांत नाहीं तर खोऱ्यांत सर्व एकत्र जमून लुटींत मिळालेला माल काढून पाहतात व त्यांत ज्या वस्तु कामाच्या नसतील त्या तेथेंच टाकून बाकीचा माल घेऊन पुढें जातात. घरफोडी खेरीज करून दुसरे प्रकारचा गुन्हा हे ज्या ठिकाणीं तांडा असेल त्या जागेचे आसपास करीत नाहीं. घरफोडी मात्र तांड्या पासून अगदीं जवळच्या गांवींही करितात. दूरच्या तांड्याच्या लोकांनीं येऊन जर दुसऱ्या तांड्याजवळ गुन्हा केला तर गुन्हेगार कोण होते हें नजिकच्या तांड्यांतील लोकांस माहीत असतें व त्यांस युक्तीनें खुलविल्यास ते त्यांजबद्दल बातमीही देऊं शकतात. या जातीचे लोक कपासीची चोरी करितात तेव्हां यांचा माग काढणें फारसें कठीण नाहीं. कारण सर्व रस्त्यांनीं कापूस जमिनीवर पडत गेला असून मधून मधून झुडपांस व झाडांच्या खांद्यासही लागलेला असतो त्याजवरून सहज समजूं शकतें. दुसरें हे लोक डोक्यावर ओझें नेण्याचे कामांत फार कच्चे असतात. याजमुळें ओझें त्यांच्यानें फार दूरवर नेववत नाहीं; रस्त्यांनीं विसाव्या करितां व तंबाखू ओढण्या करितां वरचेवर ओझें खालीं उतरून ठेविल्याच्या खुणा द्रिष्टीस पडतात. चोरींत मिळालेले कपडे फाडून त्याचे बरोबर तुकडे करून ते प्रत्येकास एक असे वांटून देण्याची चाल आहे. हे हिशांत आलेले चोरींतील कपड्याचे तुकडे ते आपले पालांत किंवा बैलाचे मुठींत छपवून ठेवितात. चोरीच्या धोत्रांचे कांठ व पागोट्याचे पदर फाडून टाकतात याजमुळें अमुक धोतर किंवा पागोटें चोरीचें आहे किंवा नाहीं हें सहज ओळखतां येतें. धोत्राचे कांठ मुख्यत्वें करून जर ते रेशमाचे असतील तर व पागोट्याचे पदर, त्यांचे बायकांपाशीं जे त्यांचे कुडूक मुडूक ठेवण्याचे झोळणे असतात त्यांत ठेविलेले असतात. चोरीचे डागिणे बैलाच्या पाठीवर लादण्याचे मुठींत सांपडतात इतकेंच नाहीं तर अन्न शिजिवण्याकरितां जीं भांडीं चुलीवर ठेवलेलीं असतात त्यांतही सांपडतात. एखाद्या बायकोपाशीं असलेले डागिणे आपले आंगा भोंवतीं लपविण्याची जर तिला सवड मिळाली नाहीं आणि तितक्यांत जर तांड्यांत कोणी आले तर इचेपाशीं काहीं चोरीचा माल आहे असा

त्यांस संशय येऊंनये ह्मणून ती एका भांड्यांत किंवा मडक्यांत तिच्या जवळ जे डागिणे असतील ते घालते व त्यांत थोडेसें पाणी व एक चिमूटभर पीठ घालून तें चुलीवर ठेवून पळीनें ढवळीत बसते ह्मणजे यावरून लोकांस वाटतें कीं ती सैपाक करीत बसली आहे. गुन्हा करते वेळेस मारामारी होऊन जर यांचे पैकीं कोणी जखमी झाला तर वंजारी लोक कधींहि त्यास दुसऱ्याचे द्रिष्टीस पडूं देत नाहींत. कोणी विचारण्यासच आला तर त्यास सांगतात कीं तो मनुष्य पुष्कळ दिवसां पासून मांदा असून आतां फारच वाईट स्थितींत आहे याजमुळें त्यास बाहेर काढतां येत नाहीं. व जे पाटील त्या लोकांचे सागीदार असतात तेही यागोष्टींची साक्ष देतात. एखादे वेळेस जखमी झालेल्या मनुष्यास दूर पाठवून देतात व त्याजविषयीं कोणी विचारल्यास तो सोयऱ्याचे भेटीस गेला आहे अथवा जनावरें चुकारू गेलीं आहेत त्यांच्या शोधाकरितां गेला आहे असें सांगतात. वंजारी लोक कधींही दुसरा वेष घेत नाहींत.

सर्व महाराष्ट्र देशांत व मुख्यत्वेंकरून मुंबई इलाख्याचे मध्य प्रदेशांत वंजारी लोकांची एक जात आहे. ती जात व वर ज्या जातीविषयीं माहिती दिली आहे ती जात या दोन्ही परस्पर अगदीं भिन्न आहेत. त्यांची भाषा, त्यांच्या रीतीभाती, त्यांचे विचार (कदाचित चोरीविषयीं खेरीज करून,) ही अगदीं भिन्न आहेत. वंजारी स्थाईक वस्ती करून राहिलेले आहेत परंतु बंजारी लोक फिरस्ते आहेत. वंजारी लोक महाराष्ट्र भाषा बोलतात आणि त्यांचा पेहराव व त्यांची रीतीभाती त्याच देशच्या लोकां प्रमाणें आहेत. पूर्वी वंजारी लोक दरवडे घालण्याच्या कामीं व रहाजनी करण्याच्या कामीं फार प्रवीण होते व अशा प्रकारचे गुन्हे करूनच ते आपला निर्वाह करीत होते. परंतु हल्लीं हे लोक शेती वाडी करून आपली उपजीविका करूं लागले आहेत याजमुळें हे अझूनही जरी डाके घालतात तथापि पहिल्या सारखे नाहींत. या जातीचे पुष्कळ लोक गांवची पाटीलकी करितात व त्यांचे पूर्वज्यांनीं लुटींत मिळवून ठेवलेल्या धनावर स्वस्थपणें निर्वाह करित आहेत.

## मुलतानी, जातीचें खरें नांव कैंजर. बंजारी लोकांतही कैंजर या नांवानेंच प्रसिद्ध आहेत.

कैंजर मुलतानी हे मुसलमानजातीचे बंजारी असून ते बंजारी लोकांची भाषा बोलतात व कित्येकांची आडनांवें हिंदुलोकांसारखींच आहेत. दिल्लीस आरंभींच जे बादशाह झाले त्यांचे कारकीर्दींत या लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारला व त्या योगानें यांचा मूळ घराण्याशीं संबंध तुटला. असें दिसतें. हिंदु बंजाऱ्याप्रमाणेंच त्यांच्या तांड्यांत जो मुख्य असतो त्यास नाईक असें ह्मणतात. या जातीचे पुरुषांचा पोषाख खेड्यापाड्याचे मुसलमान लोकांप्रमाणें असतो. ते दाढीची कधीं हज्यामत करित नाहींत; व डोक्यावरील केश लांब राखलेले असतात. या जातीच्या बायका चारण जातीच्या बायकां सारखा पेहराव करितात; मात्र त्यांच्या सारखे पुष्कळसे पितळेचे डागिणे आंगावर घालीत नाहींत. हे लोक बंजारी लोकांमाणेंच फिरस्ते आहेत व धान्याच्या आणि दुसरे मालाच्या खेपा करितात. या जातीचे लोक बडोद्याचे गाईकवाड सरकारचे राज्यांतून व रजपुताना व भोपाळचे पश्चिमप्रदेशांतून येतात व बरसातींत बहुत करून तिकडेसच परत जातात. जेव्हां देशावरावर फिरत असतात तेव्हां बंजारी लोकांप्रमाणें पालें देऊन राहतात. हे दक्षिणे कडेस फारसे दूर जात नाहींत परंतु खानदेश, नागपुर प्रांत, वऱ्हाड व निजाम सरकारचे राज्याचा उत्तर प्रदेश इतक्यांतच असतात. यांचा मुख्य उद्योग ह्मटला ह्मणजे डाके मारणें, रस्ते लुटणें व जनावरें चोरणें हा आहे. हे फार करून अफू लुटतात. आणि अफूची किंवा इतर मालाची खेप ज्या वेळेस मार्गानें चालत असेल तेव्हां अथवा रस्त्यांत मुकामाचे ठिकाणीं, माल नेणारे लोकांवर हल्ला करून लुटून घेऊन जातात. बंजारी लोकांचा तांडा माल भरून चालला असतां त्यांजवरही हल्ला करून हे लोक माल लुटून नेतात. या जातीचे लोक कधीं घरफोडी करित नाहींत.

मुलतानी लोकांची दुसरी एक जात आहे तिचा समावेश वरील जातींत होत नाहीं. त्या जातीचें नांव मुकरी मुलतानी किंवा "लकडी मुलतानी"

हें आहे. हे लोक गुन्हे करणारे नसून मोठें शहराचे किंवा खेड्याचे आसपास झोपडीं बांधून स्थाईक राहतात. या जातीचे लोकांची भाषा व त्यांच्या रीतीभाती कैंजर मुलतानी लोकांप्रमाणेंच आहेत; परंतु ते थोडीं जनावरें बाळगतात आणि जळाऊ व इमारती लाकडांचा व्यापार करितात. आपण चोर नाहीं असें लोकांस वाटावें याकरितां कैंजर मुलतानी जातीचे लोक आपलें नांव बदलून आह्मीं मुकरी मुलतानी आहोंत असें सांगतात. मुकरी मुलतानी जातींत त्यांचे स्वतःचे स्वतंत्र काजी आहेत. तसे कैंजत मुलतानी जातींत नसून त्यांस काम पडतें तेव्हां जवळ पासचे गांवांतून बोलावून आणतात.

चग्रास ह्मणून एक मुसलमान बंजाऱ्यांची तिसरी जात आहे. ते थेट कैंजर मुलतानी लोकांप्रमाणें असून पक्के लुटारू आहेत. या दोन्हीं जातींचे स्त्रियांचा आणि पुरूषांचा पेहेराव एकसारखाच आहे. यांचेहीं जवळ पुष्कळ बैल असतात आणि त्यांजवर ते मिठाच्या आणि धान्याच्या खेपा करितात. या जातीचे लोक वऱ्हाडांत फारसे दिसण्यांत येत नाहींत परंतु नागपूर प्रांतांत फार आहेत ते पावसाळ्यांत आपलीं कुडीं (झोंपडीं) बहुतकरून खानदेश, गुजराथ, माळवा, नागपूर प्रातांचा ईशान्य भाग आणि निजामसरकारचे राज्याचा उत्तर प्रदेश यांत बांधून राहतात. व त्यांतही विशेषेंकरून डोंगराळ प्रदेशांत फार राहतात. या जातीचे लोक रस्तालूट फारशी करीत नाहींत; परंतु घरांवर डाके घालण्याकडेस यांचा विशेष कल आहे. मालाच्या गाड्या रात्रीं मुकामास उतरल्या असतां त्यांतील कापडाचे गठ्ठे व धान्याचीं पोतीं काढून नेतात. आणि हें कृत्य चालू असतांना जर त्यांस गाडीवाल्यानें हटकलें तर ते लागलीच त्याच्याशीं मारामारीवर येतात.

वर लिहिलेल्या तिन्ही जातीचे लोकांचा परस्पर अन्नव्यवहार आहे. ते सर्व एकच (बंजारी) भाषा बोलतात; मात्र त्यांच्यांत लग्न संबंध नाहीं. कैंजर मुलतानी व चग्रास या दोन जातीचे लोक चोऱ्या करण्याकारितां एकत्र जमतात. परंतु मुकरी मुलतानी लोक त्याच्यांत मिळत नसून ते अगदी तुटक राहतात. या तिन्ही जातींतील भेद त्यांच्या बायकांचे पेहरावावरून मात्र समजतो. मुकरी मुलतानी लोकांच्या बायकांचे लहंगे

पायघोळ असून ज्या चोळ्या घालतात त्या रेशमी कापडाचे तुकडे एकत्र जोडून केलेल्या असून त्याच्यावर कलाबतु लावलेला असतो; परंतु दुसऱ्या ज्या दोन गुन्हे करणाऱ्या (कंजर मुलतानी आणि चग्रास) जाति आहेत त्यांच्या बायका बंजारी लोकांच्या बायकांप्रमाणें अखूड लहंगे घालतात व त्यांच्या चोळ्या अगदी साध्या असून त्यांजवर नक्षी वगैरे कांहीं नसते. या तिन्ही जातीचे बायकांच्या चोळ्यांची तऱ्हा बंजारी लोकांच्या बायकांसारखीच असते. चग्रास लोकांत मुली उपजतांच मारून टाकण्याची चाल आहे त्यांस लग्नाकरितां दुसरे मुसलमान लोकांच्या मुली मिळतात.

---

## कोल्हाटी.

अमुक वर्षे झालीं हें आतां खात्रीनें सांगतां येत नाहीं तरी पुष्कळ दिवसांपूर्वी कोल्हाटी नांवाची एक हिंदु जात दक्षिणेंत पसरत गेली. शोधा अंतीं समजतें कीं मध्य हिंदुस्थानांत जी बेरिया जात आहे किंवा बंगाल्यांत डोमरा जात आहे त्याच जातीचे हे लोक आहेत. या जातीचा मूळ देश ह्मटला ह्मणजे गुजराथ प्रांत. व अद्याप पर्यंत ते गुजराथी भाषाच बोलतात. चोरटे लोकांचें सानसीनामक जें पूर्वी मोठें घराणें होतें त्यापासून यांची उत्पत्ति असून त्या घराण्यांत मलानूर व सैन*समल हे जे दोन भाऊ होऊन गेले त्यांपैकीं मलानूर याचे वंशज आहेत. कोल्हाटी लोकांच्या दोन जाति झाल्या आहेत; डुकर कोल्हाटी, आणि खाम किंवा पाल कोल्हाटी. डुकर कोल्हाटी जातीचे लोक चोऱ्या करितात परंतु ते भटकत फिरत नाहींत. खाम कोल्हाटी जातीचे लोक फिरस्ते आहेत परंतु ते चोरी

---

* या दोन भावांचे वंशज (ज्यांजपासून पुढें लुटारू लोकांच्या पुष्कळ जाति झाल्या) यांजमध्यें परस्पर अन्नव्यवहार आहे; त्याचप्रमाणें ते चोरांचे कामासाठीं एकत्र होतात परंतु त्यांच्यांत लग्नें मात्र होत नाहींत. सैनसमल हा दोघांत वडील असून तो बावरी, बदला, कंजर, मांघी, बागरी वगैरे जातीचे लोकांचा मूळ पुरुष आहे. त्याचप्रमाणें धाकटा भाऊ मलानूर हा कोल्हाटी, बेरीया व डोमरा या जातीचे लोकांचा मूळ पुरुष आहे. या लोकांच्या निरनिराळ्या जाति केवळ देशांच्या संबंधानें झाल्या आहेत. मूळचे ते एकच आहेत.

करीत नाहींत. हे लोक फार नीतिभ्रष्ट आहेत. ते आपल्या बायकां कडून कसब करवितात आणि त्यांचे कमाई वर खटल्याचा बहुतेक खर्च चालवितात. तथापि डुकर कोल्हाटी जातीचे बायकांत कांहीं तरी पडदा आहे तितका दुसरे जातींत नाहीं. हे लोक शेती करितात. जागल्याची नोकरी करितात, मजुरीनें बागाइतांतील डुकरें मारितात आणि चोऱ्या करण्याचा तर त्यांचा धंदाच आहे. खामकोल्हाटी जातीचे पुरुष आगदी सुस्त व निरउद्योगी असतात. ते कोष्टी लोकांच्या फण्या व धोटीं या शिवाय दुसरें कांहींच करीत नाहींत. ते आपला निर्वाह मुख्यत्वें करून त्यांचे बायकांनीं कसब करून मिळविलेल्या पैशा-वर करितात. मोठमोठाले यात्रेंतून या लोकांचीं रोशेल गवताचीं झोपडीं असतातच. बायका आंगावर डागिणे घालून आणि चांगलें उंची लुगडे नेसून झोपडीचे दरवाज्याशीं बसतात आणि पुरुष झोपड्यांचे मागें कोठें फिरत असतात.—डुकर कोल्हाटी जातीचे पुरुष चांगले बांधेसुत असून बळकट असतात. ते जंगली डुकराची शिकार करितात व घरीं डुकरें बाळगतात याजमुळें त्यांचें नांव डुकर कोल्हाटी पडलें आहे. ते कांहीं विशेष प्रसंगीं डुकराचा भग देतात. हिंदूंचे जे पुराणांतले देव आहेत त्यांस ते भजत नाहींत. सर्व सृष्टीवर ज्याची सत्ता आहे असा जो कोणी एक अदृश्य परमेश्वर त्यास मात्र भजतात. ते हिंदूंचे सण वारहीं करित नाहींत. आणि पूजा करितात ती महत्संकटाचे किंवा सुखाचें प्रसंगीं मात्र करितात. त्यांच्या पूजेचा प्रकार फार साधा आहे. एक लहान चतुष्कोन जागा पाहून ती सारखी करितात आणि पाण्यानें सार-वून वर ऊद जाळतात आणि नंतर देवाची प्रार्थना करितात. त्यांची असी समज आहे कीं त्यांचे जे वाडवडील मेले आहेत त्यांचे प्राण किंवा आत्मे नेहेमी यांच्या भोवतीं संचार करून त्यांचे संरक्षण करित अस-तात. व त्यांस अंगांत आणणें झाल्यास त्या वेळेस मात्र डुकराचा भग देतात. कोणी पुरुष अंगांत आणण्याचा असेल तर नराचा भग देतात आणि बायको अंगांत आणण्याची असेल तर मादीचा भग देतात. या जातीचे आणखी पोटभेद आहेत आणि प्रत्येक पोटभेदांतील लोकांचे मुरदे गाडण्याच्या निरनिराळ्या ठिकाणीं जागा नेमल्या आहेत. कोणी

मनुष्य कोठेही मेला तरी त्याच्या अस्ती त्या नेमलेल्या जागीं नेऊन पुर- ण्याची त्यांची इच्छा असते. लहान मुलांचीं प्रेतें मात्र गाडतात परंतु वयांत आलेल्या पुरुषांची किंवा स्त्रियांचीं प्रेतें जाळतात. जाळलेल्या प्रेतांच्या अस्ती चितेंतून काढून, जी जागा नेमलेली आहे त्या ठिकाणीं नेऊन यथाविधि पुरतात. परंतु तीं तेथें नेऊन पुरण्यास तेव्हांच सवड नसेल तर तूर्त जवळच कोठें खुणेनें पुरून ठेवतात. तीं हाडें नेमलेल्या जागीं नेण्याचीं असतील तेव्हां उकरून काढून पडशींत भरून गाढवावर टाकून नेतात. मस्तक आणि वरचे भागाचीं हाडें पडशीच्या उजव्या बाजूच्या पुडांत भरतात आणि पाय वगैरे खालच्या भागांचीं हाडें डाव्या पुडांत भरतात. आणि त्या गाढवास घरीं आणतात. घरीं आगोदरच एक डोलारा तयार करून मांडला असतो, त्याचे मध्यभागीं ती पडशी ठेवितात आणि तीन दिवस पर्यंत अगदी लग्नाप्रमाणें समारंभ होतो. यानंतर पुन्हा ती पडशी गाढवावर टाकून त्यास जेव्हां स्मशानाकडेस नेतात त्या वेळेस त्याजपुढें वाजंत्री असतात व पुढें कोल्हाटनी नाचत अस- तात. या थाटानें नेमलेल्या ठिकाणीं येऊन पोहोंचल्यावर गाढवावर- च्या अस्ती काढून त्या पडशी सुद्धां एका वर्तुळ खळग्यांत पुरून त्याजवर एक दगड ठेवितात आणि त्याजला तेल आणि शेंदूर लाऊन देतात. हा सर्व प्रकार केला ह्मणजे मेलेल्या मनुष्याचा आत्मा संतुष्ट झाला असें ते समजतात.

त्यांची लग्न करण्याची पहिलीच रीत अद्याप कायम आहे. त्यांत फरक नाहीं. त्यांचे लग्नांत ब्राह्मणाची जरूर लागत नाहीं किंवा मुहूर्त- ही लागत नाहीं. एके दिवशीं सर्व जातीस जेवण देतात. व त्यावेळेस नवरा आणि नवरी नवा पोशाक करून मंडळींत एकमेकी जवळ बसतात. त्यांच्या जातींतल्या नाचणाऱ्या स्त्रियांचा पुढें नाच होत असतो. लोक खूप दारू पितात आणि इतकें झालें ह्मणजे त्यांचे जातीचे चाली प्रमाणें लग्न झालें असें ते समजतात. या जातींत विवाह झालेल्या स्त्रिया अगदीं पतिव्रता असतात आणि सुधारलेल्या लोकांत जो नित्यशः व्य- भिचार आढळतो तो या लोकांत मुळींच माहित नाहीं. कांहीं स्त्रिया प्रथम पासूनच नाचण्या करितां वगैरे अविवाहीत ठेविलेल्या असतात व

त्या पुढें मुलींचं लग्न करित नाहींत. तरूण स्त्रियांनीं त्यांच्या इच्छेस येईल तेव्हां लग्न करावें. परंतु त्या जसजशा मोठ्या होतील तसतसा त्यांस पैसा अधिक द्यावा लागतो. विधवांस पुन्हा लग्न करण्याची मनाई नाहीं. कोणत्याहि जातीच्या मनुष्यास कोल्हाटी आपले जातींत घेऊं शकतात. रजपूत आणि मुसलमान जातीचे पुष्कळ लोक त्यांच्यांत जाऊन मिळतात. त्याच प्रमाणें यांचे लोकां पैकींही कांहीं वाईट चालीच्या स्त्रिया मुसलमान धर्मांत जातात. या जातीच्या पुरुषावर किंवा बायकोवर कांहीं आळ आली आणि तो किंवा ती जर त्या गोष्टीस नाकबूल असेल तर त्यांत खरें किंवा खोटें निवडण्या करितां पुढें लिहिल्या प्रमाणें दिव्य करण्याची चाल आहे. असे प्रकारची आळ जर कोणी बायकोवर आली असेल आणि ती नाकबूल असेल तर तिचे दोन्ही तळ हातावर पिंपळाचीं सात पानें ठेवावीं. नंतर त्या पानास व हातास ओल्या दोऱ्याचे सात वेढे द्यावे; व त्या पानावर विस्तवांत लाल केलेली कुऱ्हाड ठेवून त्या बाईस ती हातावरील कुऱ्हाड सात पावलें जाऊन एक काऱ्यांचा भारा तेथें ठेवला असतो त्याजवर टाकण्यास सांगावें. याप्रमाणें तिनें केल्यावर जर त्या तप्त कुऱ्हाडीचे योगानें सर्व पानें जळून तिचा हातही भाजला तर ती खरोखर दोषी आहे असें समजावें. जर तसें न झालें तर तिजवर जी आळ घेतली होती ती खोटी होती असें समजावें. ही रीत बायकांची झाली. पुरुषांची रीत वेगळीच आहे. ज्या मनुष्यावर वर प्रमाणें कांहीं अपराधाची आळ असेल परंतु तो त्या गोष्टीस नाकबूल असेल तर त्याजला नदींत नेऊन कंबरे बरोबर खोल पाण्यांत उभा करितात आणि त्याज जवळ एक तिरकामठा व एक तीर देतात. ज्याजवर त्याचा भरंवसा असेल असा एक मनुष्य नदीचे किनाऱ्यावर उभा करितात. आणि सर्व तयारी झाल्यावर पाण्यांतील मनुष्य तीर जोरानें सोडून पाण्यांत बुडी मारतो. किनाऱ्यावर उभा असलेल्या मनुष्यानें धांवत जाऊन तो तीर घेऊन परत येई पर्यंत त्यानें डोकें पाण्यांतून बाहेर काढूंनये. या प्रमाणें जर त्यानें केलें तर तो दोषी नाहीं परंतु न केलें तर मात्र खरोखर दोषी आहे असें समजतात. हे लोक अगदीं नीच जातीचे आहेत परंतु गाय किंवा बैलाचें मास खात नाहींत. यांचे जातींत जंगली मांजर, मुंगूस,

जंगली अथवा पाळलेलें डुकर, कोल्हा वगैरेचे मासाची गणना उत्तम पक्वानांत केली आहे. हे कुत्रे बाळगतात व त्यांजकडून जंगली डुकराची शिकार करवितात व तेही मागून भाले घेऊन पायीं जातात. ते डुकराची शिकार करण्याचे कामीं मोठे हुशार आहेत व यांच्यांत ज्याचे अंगावर डुकरांनीं केलेल्या जखमा नाहींत असा एकही वयांत आलेला मनुष्य सांपडणार नाहीं. गांवकरी लोक या लोकांचे टोळीस दुरून बोलावून नेतात व त्यांचे हातीं त्यांचे शेताचें नुकसान करणारे डुकरांचे कळप मारवितात व त्यांचे मेहनती बद्दल त्यांस कांहीं धान्य वगैरे देऊन परत रवाना करितात. ते ससे व दुसरे लहान प्राणी फाशांत धरतात व त्यापैकीं कांहीं लोक गोळीही चांगली चालवितात आणि उत्तम शिकारी असतात.

डुकर कोल्हाटी जातीचे लोक मोठमोठे गुन्हे करितात याजबद्दल "ठगी आणि डेकाइटी" खात्यांतील अधिकाऱ्यांस फार दिवसांपासून माहिती आहे. ते लोक डाके, रहाजनी, घरफोडी व इतर प्रकारच्या चोऱ्या करितात परंतु ते कधीं जनावरें चोरीत नाहींत. त्यांच्या जातीच्या बायका पाटलांनीं ठेवलेल्या असतात त्या आपल्या सोबतीणींपासून व इतर बायकांपासून बोलण्याचालण्यांत बातमी मिळवून ती आपल्या पुरुषांस कळवितात. लग्नाचे किंवा इतर प्रसंगीं जेव्हां हे लोक एके ठिकाणीं जमतात त्या वेळेस लूट कोठें व कशी करण्याची याजविषयीं विचार होतात. जेव्हां एखादा डाका किंवा रहाजनी करण्याचा बेत ठरला असेल तेव्हां गांवोगांवचे लोकांची एके ठिकाणीं टोळी जमून नंतर ते आपले कुत्रे बरोबर घेऊन डुकराची शिकार करण्याचे मिषानें बाहेर पडतात. अशा वेळेस ते आधींच पुष्कळ दारू पितात व बाहेर निघतेवेळेस निशेंत अगदी चूर असतात. डाका कि[illegible] रहाजनी केली ह्मणजे त्यांत मिळालेली लूट कोठें एखादे ठिक[illegible]ाडून ठेवून रस्त्यांनीं परत येतेवेळेस एखादें डुकर किंवा एखादा सस[illegible] ारून खांद्यावर टाकून घरीं घेऊन येतात. ह्मणजे यावरून लोकांनीं [illegible]सें समजावें कीं हे शिकारीशिवाय दुसऱ्या कांहीं कामाकरितां गेले नव्हते. डुकर कोल्हाटी जातीचे लोक असें ह्मणतात कीं आह्मी पूर्वी डाका किंवा जबरीची चोरी याशिवाय दुसरे

प्रकारचा गुन्हा करीत नव्हते परंतु कैकाडी व बागरी लोकांनीं आह्मांस घरफोडीचे गुन्ह्याविषयीं तालीम दिली. ते आतां या कामांत चांगले तरबेज झाले आहेत. हे लोक जें भिंतींत छिद्र करितात त्याच्या सर्व बाजू सारख्या नसून आंतून निमुळत्या असतात त्यायोगानें छिद्र बाहेरून मोठें व आंतले बाजूस लहान लहान होत गेलेलें असतें. याजवरून तें छिद्र या लोकांचें आहे असें ओळखावें. ज्या घरीं ते चोरी करितात तेथें तोडगा टाकून देतात ह्मणजे त्याचे योगानें चोरीचा माग त्यांचे कडेस न येतां भलतीकडेसच जातो असें ते समजतात.

चोरीचा माल ते बहुतकरून आपले घरापासून दूर पुरून ठेवतात किंवा ज्यांनीं त्यांच्या बायका ठेवलेल्या असतात असे लोकांचे हिपाजतींत ठेवतात. या संबंधानें ज्या लोकांनीं कोल्हाटनी ठेविलेल्या आहेत असे लोकांचा व कोल्हाट्यांचा घरोबा होतो व त्यांचे मार्फत ते चोरीचे मालाची व्यवस्था करितात. आणि हे लोक बहुतकरून गांवचे पाटील किंवा चांगले संभावित असतात याजमुळें अशा कामाबद्दल त्यांजवर कधीं कोणाचा संशयही येत नाहीं. त्यांचा या लोकांना पूर्ण आश्रय असतो व याजमुळें चोरीचा पत्ता लावण्यास फार मुष्कील पडतें. ज्या रात्रीस गुन्हा घडला त्या रात्रीं ते कोठें बाहेर गेले नसून घरींच होते अथवा दुसरेच कोठें होते अशा बदल ते साक्ष देण्यास तयार असतात. याजमुळें कोल्हाटी लोकांना त्यांची मोठी मदत असते.

---

## कैकाडी. या जातीस कोरवी आणि कुलकोरवी असेंही ह्मणतात व मद्रास आणि ह्मैसूर प्रांतांत कोरवरू म्हणतात.

हे लोक गुन्हे करतात अशा विषयीं "ठगी आणि डेकाइटी" खात्याचे अधिकाऱ्यांस चांगली माहिती आहे. हे हिंदु असून यांच्यांत एकंदर बारा जाति आहेत. या प्रत्येक जातीस हे आपले भाषेंत "कुलवास" असें ह्मणतात. बारा पैकीं चार जातीचे लोक मात्र डाके, रहाजन्या व घरफोड्या करून आपला चरितार्थ चालवितात. परंपरागत चालत

आलेला धंदा आहे असें समजून हे लोक मोठमोठे गुन्हे अशा व्यवस्थेनें व बेतानें करितात कीं तशी व्यवस्था व तसा बेत दुसरे कोणतेही जातींत कदाचित् सांपडणार नाहीं. त्या जातींचीं नावें खालीं लिहिलेल्या प्रमाणेः—

१ "गादीपटी कैकाडी" हें नांव गादी ह्मणजे जंगल व पटी ह्मणजे प्रदेश या दोन शब्दांपासून पडलें आहे. आणि त्याजबद्दल दंतकथा अशी सांगतात कीं यांचे वाडवडील नेहमी जंगलांत दाट झाडींत राहत होते.

२ "कोकणी कैकाडी" ही वरील जातीचीच एक शाखा असून यांनीं कोकण देशांत आपला लुटीचा रोजगार चालविला याजमुळें यांस तें नांव पडलें.

३ "परवतगारी कैकाडी" ही गादी पटीचीच दुसरी शाखा असून यांचे नांव परवत व गारी ह्मणजे लोक या दोन शब्दांपासून पडलें आहे; कारण यांचे वाडवडील नेहेमीं डोंगराळ प्रदेशांत राहत होते.

४. "दक्षणी कैकाडी" हे लोक पूर्वीपासून दक्षिणेंत राहिल्यामुळें यांस असें नांव पडलें आहे. या जातीचे लोक इतरांपेक्षां अधिक धिट असतात.

यांचे प्रत्येक टोळींत वरील सर्व जातीचे लोक असतात. या चार जातींचे लोक एकमेकांत मिसळतात. यांचें राहण्याचें स्थाईक ठिकाण नसून ते फिरस्ते आहेत. वर लिहिलेल्या ज्या चार चोऱ्या करणाऱ्या जाति आहेत त्यांजबदल माहिती पुढें दिली असून बाकीच्या आठ जातींचीं नावें व त्यांचे धंदे शेवटीं दिले आहेत. कारण त्या जातींतील लोक फक्त हलक्या सलक्या चोऱ्या करितात. मोठे गुन्हे करित नाहींत याजकरितां त्यांचे रीतीभाती बदल त्यांस ओळखण्यास पाहिजे त्यापेक्षां ज्यास्त माहिती देण्याची जरूरी नाहीं.

गादीपटी, कोकणी, परवतगारी आणि दक्षणी कैकाडी हे सर्व फिरस्ते आहेत असें वर लिहिलेंच आहे. दक्षिण हिंदुस्थानांत नरमदा नदी पर्यंत या लोकांचा फैलाव झाला आहे. मात्र पलीकडेस हे लोक आढळत नाहींत. यांचा वर्ण, यांची आकृति आणि भाषा, यांवरून यांचा मूळ रहवास दक्षिण हिंदुस्थानांत असावा असें वाटतें; आणि चोऱ्या करण्याविषयीं जसे उत्तर हिंदुस्थानांत बावरी लोक आहेत,

तसेच दक्षिणेंत हे लोक आहेत. हे लोक जी भाषा बोलतात ती तामील, तेलंगी आणि कानडी या तीन भाषांची मिसळ आहे परंतु तामील भाषेचे शब्द जास्त आहेत. सर्व जातीचे कैकाडी एकच भाषा बोलतात. ते पालांवाचून दुसरे कशांत राहत नाहींत व तींहि फार घाणेरडीं असतात. हे जेव्हां एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं जातात तेव्हां आपलीं पालें, हांडींमडक्कीं वगैरे सामान गाढवावर घालून नेतात. हे गांवापासून एक किंवा दीड कोसावर उतरतात जवळ उतरत नाहींत. हे बायका व पोरें बरोबरच घेऊन फिरतात. यांचें उपजीविकेचें उघड साधन ह्मटलें ह्मणजे टोपल्या वगैरे करून विकणें हें आहे. या जातीचे पुरुष अगदीं काळे असून त्यांचा तोंडोळा मद्रासी लोकांप्रमाणें असतो. यांचा पोषाख ह्मटला ह्मणजे कायतें एक लहान फडकें कंबरेस गुंडाळलेलें असून एक फाटके पागोट्याची चिंधी डोक्यास असते. परंतु जर कोणी इतरा पेक्षां सुखी असेल तर तो एक धोतर आगांवर घेतो व खादीची बंडी अंगांत घालतो. यांच्या बायका तेलंग्यांच्या बायकां प्रमाणें लुगडीं नेसतात आणि दोन्ही हातांत पितळेच्या बांगड्या घालतात. पुरुष आणि बायका दोन्ही दिसण्यांत आजागळ असून फारच घाणेरड्या असतात. यांची जात नीच आहे. हे जंगली डुकरें कोल्हे वगैरे सर्व खातात. यांचे जातींत परस्पर धर्म संबंधी कांहीं भेद नाहींत. गादीपटी आणि दक्षणी या दोन जातींचीं आपसांत लग्नें होतात दुसऱ्याशीं होत नाहींत. या लोकांचीं चोऱ्या करण्या करितां जाण्याचीं ठरीव ठिकाणें आहेत. तेथें ते दरवर्षास जातात याजमुळें कारण पडल्यास त्यांच्या परस्पर भेटीही होऊं शकतात. पावसाळ्यांत हे लोक निजामसरकारचे राज्यांत किंवा सरहद्दीवर जाऊन राहतात. तेथें यांचीं घरें नाहींत हे पावसाळ्या पुरतींच मात्र झोपडीं बांधून राहतात. आणि हिवाळ्यांत व उन्हाळ्यांत मिळवून आणलेल्या लुटीवर गुजराण करितात. हे पावसाळ्यांत फारशा चोऱ्या करित नाहींत. दिवाळी झाली म्हणजे लागलीच हे आपलीं ठाणीं मोडून देशावरावर निघतात निघण्यापूर्वींच प्रत्येक टोळी आपआपले प्रदेश वाटून घेते. आणि त्या नेमलेल्या प्रदेशांत पोहोंचल्यानंतर मोठी टोळी मोडून तिच्या लहान

लहान तुकड्या चार पासून पंधरा इसमाची एक अशा होतात व त्या गांवोगांव पसरतात. परंतु ते एकमेकांस सोडून फार दूर जात नाहींत. टोळींत एक मुख्य असतो त्यास नाईक अशी संज्ञा आहे. या नायकाचा सर्व लोक फार मान ठेवितात व त्याजवर कांहीं प्रसंग आल्यास तो टाळण्यासाठीं सर्व लोक मनापासून झटतात. कधीं कधीं असेंही होतें कीं प्रसंग आल्यास नाइकानें केलेल्या गुन्ह्याबद्दल दुसराच कोणी कबूल जबाब देतो आणि त्यास वाचवून आपणच त्याचे बदल जेहेलखान्यांत जातो. टोळींत नाईक सांगेल ती पूर्व दिशा. त्याचें वचन मोडण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. टोळींतील नाईक मांदा झाल्यास तो बरा होई पर्यंत कोणी चोरी करीत नाहींत. परंतु जर त्याचें दुखणें फार दिवस लांबेल तर त्याचे सम्मतीनें नाइकीचें काम करण्यास दुसरा कोणी बदली नेमतात आणि त्यास नाइकी बदल पूरा हिसा मिळतो. त्याच प्रमाणें आजारी असलेल्या नायकासही त्याचा पूरा वाटा देतात. तसेच टोळींतील नाईक जर कैदेंत गेला तर तो सुटून येई पर्यंत दुसरा कोणी हुषार मनुष्य नाईक नेमतात. टोळींतील नाईक मेल्यामुळें जर ती जागा कायमची रिकामी झाली तर मग टोळींतील दुसरा एक मनुष्य जो वयानें सर्वांत मोठा असून ज्याची चोरीचे कामांत विशेष हुशारी असेल असे मनुष्यास नाईक नेमतात. परंतु जर टोळी पैकीं कोणीच नाइकीचे कामाची जबाबदारी घेण्यास कबूल नसेल तर ती टोळी फुटून जाते व तींतील लोक आपआपले इच्छे प्रमाणे दुसऱ्या टोळ्यांत जाऊन मिळतात. टोळी पैकीं कोणी मनुष्यावर कांहीं प्रसंग आल्यास होईल त्या रीतीनें त्याची त्या संकटांतून सुटका करणें हे नाइकाचें काम आहे. या साठीं जर कांहीं पैशाची मदत लागल्यास ती हिस्सेरसीनें टोळींतील सर्व लोकांस द्यावी लागते. ही जी वर्गणी जमवितात याज बदल बोज्या ज्याजप्रीत्यर्थ ती जमवली असेल त्याजवर असून त्याची त्या संकटांतून सुटका झाल्यावर त्यानें सर्वांच्या रकमेची फेड करून दिली पाहिजे. या जातींतील प्रत्येक पुरुषास दोनदोन किंवा तिनतीन टोपण नांवें असतात. वेळोवेळीं त्यांचे नांवांत फेर बदल होतो व त्यांस नवीन नांवें देतात. यांच्यांत पुरुष तशाच बायकाही दारू पितात आणि कोठें चोरीची

चांगलीशी शिकार साधली ह्मणजे एक जातीचें मोठें जेवण करितात व त्या प्रसंगास सर्वच खूप दारू पितात; आणि आखेर भांडणें व मारामाऱ्या झाल्या खेरीज तें आटपत नाहीं. हे लोक कांहींसे देवभोळे असतात. मनुष्यांत व इतर प्राण्यांत शुभाशुभ चिन्हें असतात असें ते मानतात. प्राचीन काळचे ठग व दरोडेखोर ज्या चिन्हांवर भरंवसा ठेवित होते त्याच प्रकारचीं चिन्हें हे लोक पाहतात. लुटींत मिळालेल्या मालाचे वाटणी विषयीं यांचे नियम रास्त असून त्या नियमांस अनुसरूनच ते वांटण्या करून घेतात. टोळींतील कोणी आसामी कैदेंत गेला तर बाकीचे लोक त्याचे कुटुंबाचा समाचार घेतात व प्रत्येक चोरींतील त्याचे हिशाचा वाटा त्याचे बायकोस देतात. जे लोक वृद्धापकाळामुळें किंवा दुखण्यामुळें चोरीचें काम करूं शकत नसतील अशा लोकाचें पोषण टोळींतील लोक करितात; त्याचप्रमाणें ज्यांचीं आईबापें मरून गेलीं आहेत अशीं मुलें वयांत येऊन काम धंदा करूं लागत तोंपर्यंत त्यांचें संगोपन करणें टोळीकडेसच असतें. हे चोरी करण्याचे कामांत फार पटाईत आहेत. ते एका जिल्ह्याचे सरहद्दीवर आपलें ठाणें देतात व तेथून शेजारचे जिल्ह्यांत फार दूरवर जातात आणि काम झालें ह्मणजे लागलीच त्या जिल्ह्याचे सरहद्दीबाहेर आपले मुकामावर येऊन दाखल होतात. एका रात्रींत पांच किंवा सात कोश जाऊन चोरी करून येणें ह्मणजे त्यांस कांहींच वाटत नाहीं. ते प्रत्येक पोलीस स्टेशनाचे सरहद्दीची बरोबर माहिती करून घेतात आणि त्याचप्रमाणें एका स्टेशनचे हद्दींत मुक्काम करून दुसरे स्टेशनचे हद्दींत जाऊन चोऱ्या करून येतात. चोरी केल्या नंतर लागलीच दुसरे दिवशीं मुकाम उच्चलून चोरी जर पूर्वेस केली असेल तर आठ दहा कोश पश्चिमेकडेस जातात. या लोकांची घरफोडी करण्याची रीत खालीं लिहिल्या प्रमाणें आहे. या लोकांच्या बायका व मुलें घरोघर जातीं टाकण्याचे निमित्यानें फिरतात आणि घरोघर जाऊन खात्रीची बातमी मिळवून आणून ती नाइकाचे कानावर घालतात व ती त्यास पसंत पडल्यास तीन पासून सात निवडक मनुष्यें बरोबर घेऊन तो त्या ठिकाणीं चोरी करण्याकरितां जातो. टोळींतील सर्वच लोक चोरी

करण्याकरितां जात नाहींत. काहीं मुक्कामाचे जागीं राहतात. चोरी करण्यास जाण्याचा ज्यांस नाइकाचा हुकूम झाला असेल ते हातांत बळकट काठ्या घेऊन निघतात व ज्या ठिकाणीं जावयाचें ती जागा फार दूर असेल तर मध्यें भूक लागल्यास खाण्याकरितां बरोबर भाक-रीही बांधून नेतात. ज्या ठिकाणीं चोरी करण्याची असेल तेथें रात्रीचे दहा वाजतांचे सुमारास जाऊन पोहोंचतां येईल अशा बेतानें ते आपले मुक्कामाचे ठिकाणाहून निघतात. तेथें गेल्यावर नाईक भिंतींत छिद्र करून देतो कारण हें काम त्याचें आहे. या लोकांनीं केलेलें छिद्र बाहेरील जमिनी बरोबर असतें. यांचें जें खणण्याचें हत्यार असतें त्यास ते आपले बोलींत "सिलाकोलु" किंवा "पन्सीकोलु" असें ह्मणतात. हें हत्यार लोखंडाचें असून त्याचे पुढील टोकास पोलाद बसविलेलें असतें व तें ८ पासून १७ ईंच पर्यंत लांब असतें. या हत्यारास ते फार पूज्य मान-तात आणि वर्षांतून एकदा याची पूजा करितात. नाईक जेव्हां भिंत खोदीत असतो तेव्हां त्याजजवळ एक अगदी भरवशाचा मनुष्य पाठीशीं उभा असतो व दुसरे लोक कांहीं धोका असल्यास सूचना करण्याकरितां चहूंकडेस दूर उभे राहतात. यांचे जातीचे नियमाप्रमाणें नाईकच घरांत शिरतो व आंतून माल बाहेरच्या मनुष्यांजवळ देतो. सर्व काम आटपल्यानंतर नाईक बाहेर आल्यावर सर्व लोक त्याजपाशीं येऊन जम-तात आणि माल घेऊन चालते होतात. त्या चोरीबद्दल, कदाचित् आपणावर संशय येईल असें जर यांस वाटेल किंवा यांचे टोळीवर गुप्त रीतीनें कोणाची नजर आहे हें जर माहित असेल तर ते माल दूर गाडून ठेवितात. परंतु तसें नसल्यास माल एकदम आपले मुक्कामाचे जागींच घेऊन जाऊन छपवून टाकतात. ते चोरी करित असतां जर कोणी त्यांस धरण्याचा यत्न केला किंवा चोरीकरून परत जातअसतां त्यांस आटकाविलें तर लागलीच बाणीवर येतात व हातांत असलेल्या काठ्यांचा आडविणारे इसमावर भडिमार करितात. ते काठ्यावांचून दुसरें कांहीं हत्यार जवळ ठेवित नाहींत. या वर लिहिलेल्या प्रकारामुळेंच या लोकांनीं केलेल्या घरफोडीचे गुन्ह्यास डाक्याचें स्वरूप येतें. ज्या वेळेस प्रत्यक्ष डाका घालण्याचाच या लोकांचा विचार होतो तेव्हां ते डाका घालण्याचे

ठिकाणीं बरोबर शिडी घेऊन जातात. ही शिडी ते घरून निघाल्यापासून नेमलेल्या ठिकाणीं जाऊन पोहोंचेपर्यंत करितात. ही शिडी आपण नेहमीं घरगुती कामाकरितां करितों तशी नसून एक लांब लांकूड घेऊन त्यास लांकडाचे तुकडे मधोमध पाय ठेवण्यापुरतीं टोंकें बाजूनें ठेवून बांधतात व डाका घातल्यानंतर ही शिडी बरोबर घेऊन जात नाहींत. ही बरोबर घेऊन जाण्याचा हेतु इतकाच कीं, दरवडा घालण्याचे ठिकाणीं एखादी उंच भिंत वगैरे चढून जाण्याचा प्रसंग आल्यास अडचण पडूंनये. गुन्हा घडल्याचे ठिकाणीं या प्रकारची शिडी राहिली असल्यास तो गुन्हा कैकाडी लोकांनीं केला असें खास समजावें. हे लोक कोंबड्या फार चोरतात. कोंबड्या चोरण्याची यांची युक्ति अशी आहे कीं कोठें कोंबड्या दिसल्यास त्यांचे पुढें आपले जवळचे दाणे टाकित टाकित त्यांस लालुच दाखवून बरेच अंतरावर घेऊन जातात व जवळपास कोणी नाहींसें पाहून एक एकच कोंबडी तजविजीनें झटकन धरून तिची मान मुरगाळून तीस बगलेंत असलेले झोळींत घालतात. याप्रमाणें ते थोडे अवकाशांत पुष्कळ कोंबड्या चोरतात यांच्या व मुख्यतेंकरून गादीपटी जातीच्या स्त्रिया व पुरुष लोकांस चमत्कारिक रीतीनें फसवून त्यांपासून पैसे काढतात. एक युक्ति अशी आहे कीं पितळेचा एक लहान तुकडा घेऊन तो प्रथम घासून घासून अगदी चक्क करितात व नंतर त्यास चिंचेचे सालीचे विस्तवांत तावून काढतात. त्यास कांहीं वेळपर्यंत याप्रमाणें तावलें म्हणजे त्याजवर सोनेरी रंगाची झळक येते. किंबहुना तें सोनेंच आहे असें दिसूं लागतें व कित्येक वेळां सोनारही त्यास पाहून फसतात. अशा प्रकारानें कांहीं पितळेचे तुकडे तयार करून तें सोनें चोरीचे मालापैकीं आहे असें दाखवून गुप्त रीतीनें विकण्यास घेऊन जातात. अर्थात या लोकांचा भाव फार कमी असतो व त्यामुळें खेड्यापाड्याचे बेपारी लोकांस लालुच सुटून ते पुष्कळ सोनें खरेदी करितात. लोकांपासून पैसा उपटण्याची दुसरी एक युक्ति आहे; ती अशी कीं, ज्या गांवास हे मुक्कामास उतरले असतील तेथील एखाद्या भोळसर रहिवाशाशीं बोलणें लावून जर चोरीचा माल घेण्याची त्याची खुशी दिसली तर त्याच्याशीं ठराव

करून नगदी रुपये घेऊन मुकामाचे ठिकाणीं एकटाच ये असें त्यास सांगतात. तो आल्यानंतर त्यास आपल्या बायकांच्या आंगावरील चिजा गोळाकरून दाखवितात आणि हेच चोरीचे डागिने आहेत असें सांगून नंतर सवदा ठरवून पैसा मोजून घेतात. त्यास तसेंच बसवून ठेवून एक दोन वेळां तंबाखू ओढतात. थोडेसें बोलणें चालणें झाल्यावर तो सौदागर जाऊं लागतो. तो उठला ह्मणजे त्यास पुन्हः रुपये मागतात. रुपये अगोदरच दिले आहेत असें तो सांगतो परंतु तें न ऐकतां त्याच्याशीं तंटा करून जबरदस्तीनें आपला माल हिसकावून घेतात. व त्यास पोलिसांत फिर्यादी करण्यास सांगतात. कारण फिर्यादी करण्यास त्यास तोंड नाहीं हें यांस पक्कें माहित असतें. त्याचा पैसा जाऊनही त्यास स्तब्ध राहणें भाग पडतें. जो चोरीचा माल मुकामाचे जागेपासून दूर नेऊन पुरून ठेवलेला असतो तो रात्र होतांच घरीं घेऊन येतात व दिवस निघण्याचे अगोदर पुन्हा जंगलांत नेऊन गाडतात. गाढवें बांधण्याच्या ज्या मेखा असतात त्यांचे आसपास किंवा गोण्या व हांतरण्याच्या गोदड्या वगैरे ज्या जागीं रचून ठेवितात त्या जागेखालीं सरासरी दोन फुट खोल माल पुरून ठेवतात. ते उकीरड्यांत किंवा केरकचरा टाकण्याचे दुसरे एखादे जागेंतही चोरीचा माल पुरतात. ज्या ठिकाणीं माल पुरतात त्या ठिकाणावरील जमीन ठोकून ठोकून ते खुप कठिण करून टाकतात. ह्मणजे कदाचित् कांहीं संशयावरून ती जागा जर कोणी खोदून पाहूं लागेल तर त्या जागेचे कठिणपणावरून त्या ठिकाणीं कांहीं माल असण्याचा त्यास प्रथमच संभव दिसूंनये. यांच्या बायका लुगड्याचे निऱ्यांत कडोसरीस व खाकेंत माल लपवितात. तसेंच लहानसाहान चीजा तोंडांतही बेमालूम ठेवण्याची या लोकांची बायकापोरांसुद्धां चाल आहे. जर कोणी पोलिस खात्यांतील अंमलदार या लोकांच्या उतरण्याचे जागीं गेला तर लागलीच बायका व पोरें घागरी घेऊन पाणी आणण्याचे निमित्यानें बाहेर जातात व चोरीचा सर्व माल घागरींत भरून घेऊन जाऊन तो कोठें तरी सुरक्षीत ठिकाणीं पुरून ठेवल्यानंतर घागरी पाण्यानें भरून परत येतात. यांच्या लोकांत ही चाल अगदीं साधारण असून आबालवृद्धांस माहीत

आहे. त्याच प्रमाणें हे ज्या ठिकाणीं उकड बसतात त्याच जागीं दुसऱ्यास न समजतां माल पुरून ठेवण्याचीही यांची फार खुबी आहे. जनावरावर लादण्याचे मुठींत व त्यांचे स्वतःचे राहाण्याचे पालांत हे लोक चोरलेले कपडे छपवितात. या लोकांच्या दुसऱ्या ज्या आठ जाति आहेत त्यांचा तपशील येणें प्रमाणेः—

१. "बोटी कैकाडी." हे लोक फिरस्ते असून उपजीविका करण्याची या लोकांचीं उघड साधनें ह्मटलीं ह्मणजे, टोपल्या करणें, सिंदीच्या व ताडाच्या पानोळ्यांचीं लहान मुलां करितां खेळणीं करणें, जडी बुटी वगैरे विकणें, गरीब गुरीब लोकांस नांव, नक्षत्र पाहून ग्रहांची फळें सांगणें हीं असून हे लोक चोर व उचलेही असतात.

२. "कोटी कैकाडी." हे माकडांचे तमाशे दाखवीत फिरतात व यावरूनच त्यांचे नांव कोटी (ह्मणजे तेलंगी भाषेंत माकड) कैकाडी असें नांव पडलें आहे. माकडांचे तमाशे दाखविण्याचा केवळ ज्यांचा व्यवसाय आहे ते लोक निराळे असून मुसलमान जातीचे आहेत. कोटी कैकाडी जातीचे लोकही चोर व उचले असतात.

३ "पंढरपुरी कैकाडी." या जातीचे लोक ज्या ठिकाणीं मोठमोठीं सडकेचीं वगैरे कामें चाललीं असतील अशा ठिकाणीं नेहमीं दृष्टीस पडतात. हे लोक सडकेचे मक्ते घेतात व मुरूम आणि वाळू गाढवांवर व तट्टांवर वाहतात. कैकाडी लोकांच्या इतर सर्व जातींपेक्षां या जातीचे लोक अधिक प्रामाणिक आहेत परंतु त्यांतील कांहीं लोक कधीं कधीं घर फोडून चोरी करितात.

४ "कुंची कैकाडी." या जातीचे लोकांस उचले कैकाडीही ह्मणतात. हे लोक विणकरी लोकांच्या उपयोगाकरितां कुंच्या करितात. व हरणाची वगैरे शिकार करण्याकरितां फासे करितात. हे लोक लहान सहान चोऱ्या करितात आणि खिसे कातरतात.

५. "पांव कैकाडी." या जातीचे लोक साप (बहुतकरून हिरवे रंगाचे) दाखवीत फिरतात.

६. "तेलंगाना कैकाडी." हे लोक टोपलीं वगैरे करितात. हे फिरस्ते असून चोऱ्याही करितात.

७. "तंबाखू धुडू केकाडी." हे लोक इतर लोकांप्रमाणें फिरस्ते नाहींत. खेड्यापाड्यांत बरेच दिवस राहून गाण्यावर व भीकमागण्यावर आपला उदरनिर्वाह करितात. हे लोक लहानसाहान चोऱ्याही करितात.

८. "ऊर केकाडी." हे लोकही केवळ फिरस्ते नाहींत. हे खेड्यापाड्यांत झोंपडीं बांधून पुष्कळ दिवस राहतात व टोपल्या विणून व जाळीं टाकून आपलें पोट भरितात. याच जातीची दुसरी एक जात आहे तिचें नांव "कुट केकाडी." या जातीच्या बायका कसब करितात. हे लोक मुलें चोरून विकतात. हे शहरांत व खेडेगावांतही राहतात मात्र केकाडी लोकांच्या इतर जाती पेक्षां यांची जात फार हलकी मानली आहे.

---

## विषप्रयोग करून चोऱ्या करणारे लोकांविषयीं.

चोऱ्या करण्याचा हा एक नवीन प्रकार अलीकडेस निघाला असून यांचा चहुंकडेस फैलाव होत चालला आहे. प्रवाशी लोक आपला मार्ग क्रमीत असतां त्याजकडून हर प्रयत्नानें आमली किंवा विषयुक्त पदार्थांचें सेवन करवून ते बेशुद्ध किंवा गतप्राण झाले ह्मणजे त्यांजपाशीं जें कांहीं असेल नसेल तें बुचाडून घेण्याचा प्रकार हिंदुस्थानांत फार प्राचीनकाळापासून होता व अद्यापही कोठें कोठें आहे परंतु आपणास गाडींत बसवून नेणाऱ्या भाडेकऱ्यासच विषप्रयोगानें मारून टाकून त्याची गाडी व बैल लांबविण्याचा जो प्रकार अलीकडेस ऐकण्यांत येतो तो मात्र फार थोडे दिवसांपासून निघाला आहे. हें काम अमुकच जातीचे लोक करितात असें नाहीं. ज्यांस त्याचा छंद लागला आहे असे हिंदू व मुसलमानही करितात. परंतु इतर प्रकारच्या गुन्ह्या प्रमाणें या गुन्ह्याची कोणत्याही प्रकारें पायदारी न बांधली जाऊन त्याचा विस्तारही फारसा नाहीं, ही आनंदाची गोष्ट समजली पाहिजे. या प्रकारचे गुन्हे करणारे लोक आपलें गुह्य दुसऱ्यांस सांगण्यास फार भितात याजमुळें असे लोकांच्या कधीं टोळ्या जमू शकत नाहींत. ज्यास वाटेल तो आपलें काम एकटाच स्वतंत्रतेनें करि[illegible] व आपली मसलत

दुसऱ्यास कळविण्याचे भानगडींत पडत नाहीं. परंतु फार क्वचित प्रसंगीं दोन किंवा तीन इसम एकत्र होऊन असें कृत्य करितात.

कदाचित् आपण पकडले जाऊं या भीतींनें हे लोक एकाच प्रदेशांत फार दिवस न राहतां नेहेमी देशावरावर भ्रमण करित असतात. शेपन्नास कोशांत असे प्रकारानें दोन चार खून केले ह्मणजे निकडून लागलीच पुष्कळ दूर निघून जातात. व पूर्वी घडलेल्या गोष्टीचा लोकांस अगदी विसर पडे पर्यंत ते त्या मुलकांत पुन्हा येत नाहींत. विषप्रयोग करितांना ते बहुतकरून सोमलाचा उपयोग करितात व कधीं कधीं धोत्र्याच्या बियाही घालतात. असो. गाडीवाल्याचें अशा प्रकारें काम काढल्या नंतर ते गाडी व बैल बरेच दूर घेऊन जाऊन एखाद्या चांगल्याशा बाजारांत दलालाचे मार्फत विकून टाकून त्याचे दाम करितात. हे आपण स्वतः कधींहि बाजारांत जात नाहींत. हे लोक आपले व्यवसायाचें काम असें बेतानें करितात कीं त्यांत कित्येक गोष्टी अगदीं नेहेमीचे प्रचारांतील असल्यामुळें यांचे पोटांत कांहीं दगा आहे अशा बद्दल दुसऱ्यास संशय उत्पन्न होत नाहीं.

विषप्रयोग करणारा मनुष्य चांगला पोषाख अंगांत घालून आपण धान्य किंवा कापुस खरेदी करण्या करितां फिरत आहों असें दाखवून एखादे गावांत अनओळखी मनुष्या प्रमाणें धर्मशाळेंत जाऊन उतरतो. नंतर त्या गांवांपासून बरीच दूर जी एखादी धान्याची किंवा कापसाची पेठ असेल तेथें फार जरूरीचे कामा करितां जाण्याचें आहे असें दाखवून भाड्यानें गाडी करण्याचे शोधास लागतो. हा मजकुर गांवकरी लोकांस समजतांच पुष्कळ भाडेकरी लोक येण्यास कबूल होतात परंतु त्यां पैकीं ज्याची गाडी चांगली असून जोडीही उत्तम असेल अशाशीं थेटचें भाडें ठरवून कांहीं पैसा आगाऊ चुकवून देऊन बाकीचा पैसा मुक्कामावर पोंहोचल्यावर देण्याचा करार होतो. ज्याची गाडी असेल त्यानेंच बरोबर यावें अशाविषयीं पहिल्यानें बोलणें लावतो. परंतु कांहीं अडचणी मुळें त्याचें येणें होत नसल्यास, गाडीबैलांची जोखीम आहे याजकरितां चांगला विश्वासु मनुष्य कोणी असल्यास त्यास बरोबर गाडी हाकण्यास देण्याविषयीं सांगतो. या व्यापाऱ्याचे मनांत पुढें काय

कपट करण्याचें असतें याची कल्पना गाडीवाल्यास मुळींच नसते; त्यांतून गाडी बैलाबद्दल त्याचें इतकें कळकळीचें बोलणें ऐकून तर त्याच्या मनांत संशयही येत नाहीं. वाटेनें भाडेकरी व त्याचा यजमान स्नेहभावानें वागतात व जाती संबंधी कांहीं प्रतिबंध नसल्यास त्यांचें जेवण खाण एकाच ठिकाणीं होतें. परंतु हें जर चालत नसेल तर हा बाह्य प्रीति दाखविणारा यजमान आपले भाडेकऱ्यास आपले पदरची मिठाई वगैरे आणून देतो. व ही रीत हिंदुस्थानांत सर्वत्र साधारण असल्यामुळें याबद्दल कोणास संशय येत नाहीं. शेवटीं भाडेकऱ्याचे गांवापासून बरेंच दुर गेल्यावर एके दिवशीं संधी पाहून त्याचे खाण्याचे अन्नांत किंवा मिठाईंत विष घालतो.

हें विष लागू झाल्याचीं चिन्हें दिसूं लागतांच तो विषप्रयोग करणारा त्या बिच्याऱ्या गाडीवाल्यास एकाएकी दुखण्यानें गाठलें ह्मणून मोठी हळहळ दाखवून त्यास स्वस्थ गाडींत निजण्यास सांगून आपणच स्वतः गाडी हांकण्यास बसतो. पुढें चालतां चालतां आसपास कोणी नाहीं असें एकांत ठिकाण पाहून तितक्या अवकाशांत जर तो भाडेकरी मरण पावला असेल तर त्याचें प्रेत गळ्यास दोरी बांधून गाडींतून ओढून तें रस्त्याचे बाजूस किंवा नजिकच्या शेतांत टाकून देऊन आपण गाडी बैलासुधां पुढें चालता होतो. परंतु तितक्या अवकाशांत जर दिलेल्या विषापासून व्हावा तसा परिणाम झाला नसल्यास, त्या बिच्याऱ्या मरणोन्मुख गाडीवाल्यास औषध ह्मणून आणखीं थोडें विष पाण्यांत घोळून पाजतो आणि यांत कांहीं दगा असेल अशा बद्दल त्याचे अंतःकरणांत किंचितही संशय न येतां तो तें विषमिश्रित पाणी निःशंकमनानें पिऊन थोडकेच वेळांत प्राणास मुकतो. परंतु तसें न साधल्यास त्याचे गळ्यास दोरीचा फांस देऊन अथवा त्यास गाडीचे खालीं टाकून त्याचें मस्तक दगडांनीं ठेचून त्याचा प्राण घेतो. तथापि या शेवटच्या दोन उपायांचा क्वचित् प्रसंगीं उपयोग करितो. याप्रमाणें जहराचे योगानें ह्मणा किंवा फासाचे योगानें ह्मणा तो गाडीवान मरण पावतांच कित्येक लोक त्याचें प्रेत लागलेंच बाहेर फेकून देतात, व कित्येक तें गाडींत तसेंच राखून ठेवून त्याजवर धोतर वगैरे घालतात ह्मणजे गाडींत कोणाची

द्रिष्टी गेल्यास कोणी तरी आंत निजलेला आहे असें त्यास वाटतें. हें प्रेत गाडींत असेल तों पर्यंत ते गांवापासून दूर दूर राहतात (परंतु या कर्मांत जे अतिशयै धीट झाले आहेत ते इतकीही पर्वा करित नाहींत. खुशाल प्रेता सुद्धां गावांत जाऊन राहतात). नंतर तें प्रेत कुजण्यास सुरवात झाली ह्मणजे त्याची पूर्वीं सांगितल्या प्रमाणें व्यवस्था करितात. याप्रमाणें प्रेत राखून ठेवण्याचें कारण ते असें सांगतात कीं प्रेत एकदां सडूं लागलें ह्मणजे इतकें त्वरित सडून जातें कीं तें सांपडल्यावर ओळखण्या करितां पुढें ज्यास्त वेळ ठेवतां येत नाहीं. कधीं कधीं मुरद्याचीं पांघरूणें त्याचे आंगावरच राहूं देतात. परंतु हें तरी ओळखीचें साधन कशास पाहिजे असा विचार करून कधीं कधीं त्याचे आंगावर पांघरूण किंवा डागिणा राहूं देत नाहींत. हे कपडे लागलेच जाळून त्याची राख करून टाकतात.

या दुष्ट लोकांची आपण विष घालून मारलेल्या मनुष्याचे प्रेताची व्यवस्था करण्याची दुसरी एक रीति आहे ती अशी कीं प्रेत रस्त्याचे बाजूनें एखादे झाडाखालीं निजल्या सारखें ठेवून त्याजवर एक धोतर पांघरूण घालतात व बाकीचे कपडे जसेचे तसेच आंगावर राहूंदेतात. ह्मणजे त्यायोगानें तें प्रेत पाहणारांची अशी समज होते कीं हा कोणी वाटसरू रस्त्यानें चालला असतां अतीशय श्रमानें किंवा त्यास कांहीं व्यथा असल्यामुळें मरण पावला आहे. या शिवाय दुसरें कांहीं कारण असेल ही गोष्ट कोणाचे स्मर्मींही न येऊन त्याजबदल बिलकूल बोभाट होत नाहीं. गांवचे अधिकाऱ्या कडून असेच अर्थाचे मजकुराचा रिपोर्ट पोलिसांत जातो. कोणी पोलीस अमलदार त्या ठिकाणीं येऊन पंच जमवून रीतिप्रमाणें पंचनामा करितो, परंतु प्रेताचे स्थितिवरून मरण्याचे कारणाबदल कांहीं संशय न दिसल्यामुळें "हा आपमौतीनें मेला" असा सर्वांचा अभिप्राय पडून मुरद्यास दफन देण्यास हुकूम होतो. ज्या जिल्ह्यांतील गाडी बैल भाड्यानें केले असतील त्याच जिल्ह्याचे हद्दींत गाडीवाल्याचा खून बहुत करून करीत नाहींत. थोड्या वर्षांपूर्वीं अशा प्रकारें विषप्रयोग करणारा एक प्रसिद्ध गुन्हेगार अकस्मात् धरला गेला व याप्रमाणें थोडे थोडके नाहींत, आठरा खून आपले हातानें केल्या-

चे त्यानें कबूल केलें. आणि प्रत्येक खुनाची कशी हकीकत सांगण्याची त्यास मोठी उत्सुकता वाटे. हा दुष्ट गुन्हेगार मुसलमान जातीचा होता व त्याचे दंडास एक चांदीची भारलेली पेटी असून तींत तो दुसऱ्यास घालण्या करितां जहर बाळगीत असे.

---

## पुण्याचे भामटे.

भामटे लोक हिंदु जातीचे असून उत्तर हिंदुस्थानांत जसे सोनोरिये लोक आहेत त्याच प्रकारचे हे दक्षिणेंत आहेत. हे लोक मूळ तेलंगणांतून येऊन सोलापूर, पुणें व सातारा या प्रांतांत स्थाइक झाले. या जातीचे कांहीं लोक खानदेशांतही कोठें कोठें आहेत. वरील तीन जिल्ह्यांत तर या लोकांनीं कित्येक गांवचीं गांवेच वसविलीं आहेत ह्मणजे कांहीं गांवांतून या लोकां शिवाय दुसरे जातीचा मनुष्य मिळावयाचाच नाहीं. हे लोक सुखी असून जमिनी व गुरें ढोरें बाळगून असतात. यांच्यांत जे लोक आपले कसबांत फारच प्रवीण आहेत ते चांगलें श्रीमंत असून त्यांच्यापाशीं पन्नास किंवा साठ हजारांच्या जमिनी आहेत व ते मोठाल्या वाड्यांत राहतात. भामटे लोक चोरी करून व लोकांचे खिशे कापून आपली उपजीविका करितात. आलिकडेस हे लोक आगगाडींतून फार चोऱ्या करूं लागले आहेत. चोरीची शिकार साधण्याकरितां हे लोक फार दूरचा प्रवास करितात ह्मणजे उत्तरेस पंजाबा पर्यंत व दक्षिणेस मद्रास इलाख्या पर्यंत जातात. तसें ह्मटलें तर हे जिकडे जिकडे रेलवे आहे ते सर्व मुलूख आगगाडीनें फिरून खूप लूट जमा करून परत घरीं येतात. या जातीचे पुरुष तशाच बायकाही चोरी करण्याचे कामीं पटाईत आहेत. आगगाडींत शिवाय करून बाकी कधींही हे लोक सोनोरिया लोकांप्रमाणें सूर्य अस्तापासून तों सूर्योदया पावेतों चोरी करीत नाहींत.

हे लोक कधींकधीं मोठाले शहरांत किंवा यात्रांतूनही चोऱ्या करण्याकरितां येतात. परंतु हे बहुत करून आगगाडी सोडून फार दूर जात नाहींत. या जातीचे पुरुष आगगाडींत तिसरे क्लासचे डब्यांत

बसनात आणि रात्रीस गाडींत लोकांना झोंपा लागल्या ह्मणजे संधी साधून ज्या गाठोड्यांत अगर सामानाचे थैलींत डागडागिणा वगैरे आहे असें वाटेल तें गाठोडें अगर ती थैलीच लांबवितात नाहीं तर ती कापून त्यांतील माल काढून घेऊन पुढलें स्टेशन येतांच उतरून पळतात. यांच्या बायकाही याचप्रमाणें बायकांच्या डब्यांत कृति करितात व याशिवाय त्यांचें दुसरें एक साधन असें आहे कीं त्या डब्यांत झोंपेस गेलेल्या बायकांचे आंगावरीलही डागिणे काढून घेतात. यांच्या बायका मौल्यवान लाहान साहान वस्तु आपले आंगा भोंवती इतक्या कुशलतेनें लपवून ठेवितात कीं त्यांचा झाडा जर बायकांकडून च घेवविला तर त्या सांपडतील एरव्ही सांपडणारच नाहींत. या जातीचे पुरुष व बायका मराठ्या प्रमाणें पोषाख करितात परंतु त्या कास घालित नाहींत. यांची टोळी जेव्हां बाहेर पडते तेव्हां तींतील कांहीं इसमांचा पोषाख फारच चांगला असतो. त्यांचीं पागोटीं भारी किंमतीचीं असून आंगावर डागडागिणे व दुशाले असतात त्याजवरून हे ग्रहस्थ घरचे श्रीमंत असून कोठें मुशाफरीस जातआहेत असा यांस पाहणारे लोकांस भास होतो. कांहीं लोक तर श्रीमान ब्राह्मणांची सोंगें घेऊन बाहेर पडतात. पुरुषांचे खिशांत काचेचे तुकडे व तोंडांत एक तेज धारेची सुरी असते. ही सुरी विळ्यासारखी वाकडी असून तिचे मुठीस सून गुंडाळलेलें असतें. या दोन्ही हत्यारांचा मुख्य उपयोग खिशे कापण्याकडेस आणि गाठोडीं व सामानाच्या थैल्या कापण्याकडेस होतो. वर सांगितलेल्या सुरीस ते आपले भाषेंत 'उगलिक' म्हणतात आणि ती आपले तोंडांत खालची दाढ आणि गाल याजमध्यें जी पोकळ जागा आहे त्याठिकाणीं लपवून ठेवितात. आणि तोंडांतील ही जागा निबर होऊन त्या भागास सुरी ठेवल्यापासून कांहीं इजा होऊंनये म्हणून अगोदर बरेच दिवस पर्यंत रात्रंदिवस तोंडांत मिठाचे खडे धरून ती जागा मुद्दाम कठिण करितात. भामटे लोक घरफोडी, राहजनी व डाके वगैरे करित नाहींत. हे लोक शहरांत व खेडे गांवांत येतात तेव्हां कितीही हलक्या किमतीची वस्तु यांचे नजरेस पडो, ते ती उचलल्या वांचून कधींही राहणार नाहींत. गर्दींत हे लोक मुलांच्या आंगावरील डागिणे

काढून घेतात व मनुष्यांचे खिसे कातरतात. आगगाडींत निजलेल्या उतारू लोकांवर "क्लोरोफार्म" चा प्रयोग करून ते बेशुद्ध झाल्यावर त्यांचें सामान या लोकांनीं चोरल्याच्या गोष्टी ऐकिवांत आहेत. ते सर्व तेलंगी भाषा बोलतात. व त्यांचें मुख्य दैवत "एलमा" देवी आहे. खिसे कातरणारे लोकांची दुसरी एक जात आहे. या जातीचें नांव पाथरकार. हे लोक वऱ्हाड, खानदेश व नागपुर प्रांतांत राहतात. या लोकांचा उपजीविका करण्याचा उघड धंदा जातीं टांकणें हा होय. मराठे पाथरकार व हे लोक एकच नाहींत. ते अगदीं भिन्न आहेत. पूर्वीं हिकडे भामटे लोक आले असतील त्यांचे हे वंशज असावेत. या पाथरकार जातीचे लोकही तेलंगीच भाषा बोलतात. या लोकांच्या चोरी करण्याच्या रीति आणि नियम भामटे लोकांप्रमाणेंच असून त्यांचा तोंडोळाही भामटे लोकांप्रमाणेंच आहे. भामटे लोकांप्रमाणें पाथरकार लोकही खिसे कापण्याकरितां एक वाकडी सुरी बाळगतात आणि तिचें नांव "उडमुक"च आहे. तेलंगी पाथरकार लोक चोरीच्या आणि खिसे कातरण्याच्या कामांत फारच प्रवीण आहेत. ते मोठमोठाल्या यात्रेंत आणि आठवडा बाजारांत नेहेमीं फेऱ्या करितात. या जातीचे पुरुष तशाच स्त्रियाही खिसे कापतात; जें हातीं लागेल तें चोरतात आणि लहान मुलांचे आंगावरील डागिणे काढून घेतात. यांनां अद्याप आगगाडीच्या डब्यांतून चोऱ्या करण्याची चटक लागली नाहीं. या जातीचे लोकांचा पेहराव गरीब कुणब्याप्रमाणें असतो. भामटे लोकांप्रमाणें यांचें कुळदैवत "एलमा" देवीच आहे. या लोकांची कोठें भेट झाल्यास तुह्मी कोण आहां असें जर कोणी विचारिलें तर आह्मी बेलदार किंवा कामाठी आहों असें उत्तर बहुत करून देतात.

---

## नकली नाणें करणारे फकीर.

या जातीचे फकीर (मुसलमान) लोकांचा मुख्य धंदा नकली रुपये वगैरे करून ते चालविणें हा आहे. यांचीं मूळ ठिकाणें मोंगलाईंत गुल्बुर्गा व त्याचे आसपासचा प्रदेश आणि सोलापूर जिल्हा हीं होत.

या लोकांचा पीर आणि मुरशद गुलबुर्ग्या नजिक सातलदुधनी येथें राहतो. हे लोक गळ्यांत मण्यांच्या माळा घालतात व आपले नांवाचे शेवटीं "शा" हें अक्षर जोडतात. जसें, उनिरशा, कादरशा वगैरे. या लोकांचा पेहराव साधारण फकीर लोकांप्रमाणें असतो व ते त्यांच्यासारखी हिंदुस्थानी भाषा बोलतात परंतु ती बोलतानां त्यांचा स्वर कानडी भाषा बोलल्यासारखा निघतो. ते भीक मागण्यास निघाले म्हणजे स्त्रियांस "माई" व पुरुषांस "दाता" असे हेल काढून लांब स्वरानें ह्मणतात. या फकिरांच्या दोनपासून सहा इसमांची एक अशा लहान लहान टोळ्या जमवून सर्व देशभर फिरतात. ते अल्पवयाचीं मुलें मुद्दाम बरोबर घेऊन जातात. हे लोक दक्षिणेंत, तसेच वऱ्हाडांत व नागपूर प्रांतांत फार फिरतात. ते आपले घरून हिंवाळ्याचे आरंभीं बाहेर पडतात. व पावसाळ्याचे आगोठीस पुन्हः घरीं परतून येतात. मुशाफरींत हे लोक बहुतकरून फकिरांच्या तकियांत किंवा फकिरांचे घरीं उतरतात. हे आपल्या बायका बरोबर नेत नाहींत. हे आपलें सामान आपणच खांद्यावर घेऊन चालतात; दुसऱ्यापाशीं देत नाहींत. तुह्मी कोण जातीचे फकीर आहां असें जर त्यांस कोणी विचारिलें तर आह्मी मदारी फकीर आहों असें ते सांगतात. कदाचित् यांची लबाडी उघडी पडून कांहीं इसमांस कैद केलें तर ते बिलकूल न घाबरतां आह्मी गरीब लोक भीक मागून पोट भरतों; आह्मी कांहीं केलें नाहीं वगैरे एकसारखी बडबड करित असतात.

खोटे रुपये चालविण्याची तऱ्हा बहुत करून सर्वांची एकसारखीच आहे. ते पुरुषांशीं कांहीं एक संबंध न ठेवितां होईल तेथ पर्यंत बायकांस नाडतात. या जातीचा फकीर किंवा त्याज बरोबरील एखादा मुलगा हा सांगत फिरतो कीं आमच्या पाशीं खुर्दा आहे; कोणास गरज असल्यास रुपयाचे सतरा किंवा अठरा आणे देखील देऊं आह्मी या वस्तींत नवे आलों आहों याजमुळें बाजारांत खुर्द्याचा भाव काय आहे हें आह्मांस माहीत नाहीं. असें तो ह्मणतोच आहे तों कोणी गिराईक भेटतेंच. भाव ठरल्या प्रमाणें फकीर खुर्दा मोजून देतो आणि आपला रुपाया मागतो हा रुपाया हातीं पडतांच फार चलाखीनें दुसऱ्यास

कळूं न देतां तो रुपया जवळ ठेवून जवळचा खोटा रुपया हातीं घेऊन गिराइकास ह्मणतो कीं हा रुपया चांगला नाहीं दुसरा असेल तर आणा. गिराइकास याचे लबाडी बदल कांहीं संशय न येऊन त्यानें जर दुसरा रुपया आणून दिला तर त्याची याच प्रमाणें व्यवस्था करून तिसरा मागतो व या प्रमाणें गिराइकाचे हाताशीं असलेले रुपये सर्व संपे पर्यंत क्रम चालवून शेवटीं आपला खुर्दाही गुंडाळून घेऊन जातो. या जातीचे एका फकिरानें एका दिवसांत लभाणी लोकांचे एका तांड्यांत अकरा रुपये चालविल्याचें ऐकिवांत आहे. हे लोक फिरण्यास निघाले ह्मणजे पुष्कळ खोटे रुपये बाहेर फैलावितात. व याच कामासाठीं हे मोठाल्या यात्रेंत जातात; परंतु हे फारसे हातीं पडत नाहींत ही मात्र आश्चर्याची गोष्ट समजली पाहिजे.

नकली रुपये किंवा दुसरें नाणें करण्याकरितां जीं हत्यारें लागतात तीं अगदीं साधीं असून तीं तयार करण्यास बिलकुल कांहीं खटाटोप लागत नाहीं. एक मातीची मूस, लोखंडाची पळी, सांडस व एक चाकू इतक्या वस्तु असल्या ह्मणजे झालें. मूस ज्या मातीची करितात तीस "सिंधी पेट मटी" असें ते ह्मणतात. ही माती कुटून अगदीं बारीक करितात व ती पाण्यांत भिजवून तिचा पाहिजे तितका घट गोळा करून नंतर त्यांत एक रुपया बसवून चहूंकडून खूप दाबितात व ठसा चांगला उमटावा ह्मणून लांकडाच्या एका चापट तुकड्यानें त्याला खालवर ठोकतात. नंतर त्या साच्यांत असलेल्या रुपयाचे बाजूनें चहूंफेर एक चीर पाडून ऐके ठिकाणीं धातूचा रस आंत ओतण्या करितां लहानसें निमुळतें छिद्र पाडतात. हा ठसा तयार झाल्यावर तो बरोबर बसवितां यावा या साठीं वर सांगितलेल्या चिरेवर एक आडवी खूण करितात. हा सर्व प्रकार झाल्यावर त्या मातीच्या गोळ्यावर एकावर एक अशीं पुष्कळ चिंध्यांचीं वेष्टनें गुंडाळून फिरून त्यावर एक मातीचा लेप देतात आणि हा सबंध गोळा विस्तवांत टाकून बेताचा भाजला गेला असें पाहून बाहेर काढतात नंतर त्याजवरील मातीचा लेप व चिंध्या काढून टाकून आंतील साच्याचीं दोन सकलें वेगळीं करून त्यांतील रुपया काढून घेतला ह्मणजे साचा तयार झाला असें समजावें. मग वाटेल तेव्हां त्या मुसीचे

दोन्ही भाग एकत्र बसवून त्यांत छिद्रा वाटे जस्ताचा रस ओततात. नंतर आंत तयार झालेला रुपया काढून एक लहानशी सुरी घेऊन तो हातानें साफ केला ह्मणजे चालविण्या जोगा होतो. खोटे रुपये पाडण्याचें काम जंगलांत एकांत ठिकाणीं किंवा ओसाड जागेंत करितात. बाहेर फिरत असतां प्रत्येक टोळींतील दोन किंवा तीन मनुष्यें लंगोट्या नेसतात व त्यांत ते खोटे रुपये ठेवतात. हे रुपये ठेवण्या करितां लंगोटीच्या पुढच्या भागाच्या आंतल्या बाजूस एक लहान पिशवी शिवलेली असते. व ही पिशवी पुढच्या बाजूस जोंवर लंगोटीचा सोगा सोडतात त्याचे आड राहते. ते ही लंगोटी फार आवळून नेसतात.

लंगोटी नेसलेल्या एखाद्या मनुष्याचा झाडा घेतला तर तो आपली लंगोटी मागून सोडून पुढच्या भागास लोंबत ठेवितो ह्मणजे पुढच्या सोग्याचे योगानें आंतली बाजू झांकली गेल्यामुळे वर सांगितलेले पिशवीवर कोणाची नजर जात नाहीं. बाहेर फिरत असतां या लोकांजवळ एक चामड्याची थैली असते व तींत ते आपलीं नकली नाणें करण्याचीं हत्यारें वगैरे ठेवितात. या शिवाय त्यांत बारीक कोरडी माती व जस्ताच्या गोळ्याही असतात. हे कोठें मुक्कामास उतरले ह्मणजे जवळच कोठेंतरी खुणेनें आपलीं सर्व हत्यारें पुरून ठेवतात. हे लोक भीक मागतांना लांब हेल काढून अतिशय आर्जव करितात व यांच्या बोलण्यांत तेलंगी स्वर फार येतात त्यावरून या जातीचे फकीर ओळखण्यास फारसी अडचण पडत नाहीं. हे एका मुक्कामाहून दुसरे ठिकाणीं जाण्यास निघतात तेव्हां मात्र यांचे जवळ हत्यारें वगैरे सर्व सामान असतें. इतर वेळेस हें सामान ते आपले जवळ ठेवित नाहींत.

---

## कंजर अथवा सानसी.

कंजर जातीचे लोक फिरस्ते असून लुटारू आहेत अशाबद्दल सर्वांस माहिती आहेच. हे जातीचे हिंदु असून सैनसमलचे वंशांत जें एक सानसी नामक दरोडखोरांचें घराणें होऊन गेलें त्याचीच एक शाखा आहे. यांचा मुख्य उद्योग म्हटला म्हणजे दरोडे घालणें हा आहे. कंजर जातीच्या मारवाडी कंजर व दक्षिणी कंजर या दोन शाखा आहेत.

यांतील लोकच बहुतकरून अशा प्रकारचे गुन्हे वऱ्हाड, नागपूर प्रांत व निजाम सरकारचें राज्य व साधारणतः सर्व दक्षिण यांत करितात. मारवाडी कंजर दक्षिणेकडेस फिरत फिरत मद्रास इलाख्यापर्यंतही जातात. कंजर लोक त्यांच्या बायकांचे पेहरावावरून व उतरण्याचे जागेवरून ओळखतां येतात. या दोन्ही जातीचे लोक आपण भाट आहों असें दाखवितात; आणि ज्यांस यांचे जातीसंबंधीं कांहीं एक माहिती नाहीं असे लोकांपुढें कंजर आहों असें कधींही कबूल करित नाहींत. असें दिसतें कीं हे लोक मूळचे जाट लोकांचे भाट होते परंतु पुढें पुढें यांचा विस्तार फार वाढला आणि एकाच जातीचे यजमानांनीं दिलेले भिक्षेवर उपजीविका होईना यास्तव ते लुटारूपणाचीं कामें करूं लागले व यांचा फैलाव प्रथम राजपुतान्यांत होऊन नंतर दक्षिणेंत झाला. या जातीच्या दोन शाखा आहेत असें वर सांगितलेंच आहे. त्यांपैकीं एकीस दक्षिणी कंजर व दुसरीस मारवाडी, उंचे लहंगा किंवा बैलवाला कंजर या नांवांनीं ते परस्परांस ओळखतात. पहिल्या शाखेचे लोक दक्षिणेंतच आपलीं घरें करून राहिले आहेत व बाहेर जात नाहींत. दुसरी शाखा मारवाड देशांतून आलेली आहे असें तिचे नांवावरूनच दिसतें. या जातींतल्या बायकांचे लहंगे फार आंखूड असतात व दक्षिणी कंजर जातीच्या बायकांचे लहंगे पायघोळ असतात याजमुळें त्यांजमध्यें भेद दाखविण्याकरितां यांस "उंचे लहंगावाला" असें कधीं कधीं म्हणतात. व ते बैल आणि गाई चोरतात याजमुळें त्यांस बैल पारधी असेंही नांव पडलें आहे. दक्षिणी कंजर हे घोडीं व गाढवें चोरतात. या दोन्ही जातींचें वर्णन पुढें निरनिराळें दिलें आहे त्याजवरून त्यांच्यांत परस्पर काय भेद आहेत आणि त्यांस कसें ओळखावें हें समजेल.

कुंचेवाले कंजर म्हणून एक तिसरी फिरस्ती जात आहे. ते पालें देऊन राहतात व सर्व देशभर फिरतात. या जातीचा मुख्य धंदा चोरी करणें हा नव्हे याजकरितां हे आणि वरील लोक एकच आहेत असें समजूं नये. हे लोक आपली उपजीविका नदींतील एक प्रकारच्या गवताच्या मुळांचे कुंचे विकून करितात. या कुंच्यांचा खप विणकरी लोकांत फार होतो कारण मागावर सूत लावलें असतां तें साफ कर-

ण्यास आणि त्यांत गुंतागुंत पडल्यास ती काढण्याचे कामीं या कुंच्यांचा फार उपयोग होतो. हे लोक कुंचे करून विकतात याजवरूनच त्यांचें नांव कुंचेवाले असें पडलें आहे. ते घोड्यांच्या आघाड्या पिछाड्या व शिंकीं वगैरेही सामान तयार करून गांवोगांव फिरून विकतात. या जातींतील बायका अतिशय बिभित्स गाणीं ह्मणतात व त्याचप्रमाणें हावभावही करितात. आणि सहज जरी बोलत असल्या तरी क्षणोक्षणीं त्यांच्या तोंडीं अपशब्द येतात. यावरून कोणत्याहि जातीची बायको अतिशय भांडकुदळ असून नेहमीं हलकट शब्द तिचे तोंडीं असले तर तिला "कंजरीण" असें ह्मणण्याची चाल पडली आहे. या लोकांची मुद्रा फार कावरी बावरी दिसते. यांच्या बायका पायघोळ लुगडीं नेसतात. पुढें गुन्हे न करणारे फिरस्ते लोकांच्या जातीविषयीं माहिती छापण्याचा विचार आहे त्यांत या जातीबद्दलही माहिती दिली जाईल.

---

## दक्षिणी कंजर.

हे लोक आतां दक्षिणचेच रहवाशी झाल्यामुळें यांचा तोंडवळा दक्षिणी लोकांप्रमाणेंच झाला आहे. यांचा वर्ण काळा असून हे सुरेख असतात. या जातीचे पुरुष डोक्यावर लांब केस राखतात. यांच्या बायका दक्षिणेंत राहणाऱ्या रजपुत लोकांच्या बायकां प्रमाणें लांब लहंगे घालतात. हे लहंगे काळे किंवा तांबडे रंगाचे असून लुगड्याचे तुकडे फाडून त्याचे केलेले असतात. त्या आंगांत काचोळ्या घालतात आणि त्यांस वर मानेजवळ एक व खालीं काचोळीचे शेवटास एक अशा दोन गांठी देतात. या काचोळीवर एक बिन बाह्याचें कुडतें घालतात व त्याचे घेरास दुसऱ्या रंगाचे छिटाची मगजी लावलेली असते. त्या आपले केश एके जागीं गोळा करून बुचडा बांधतात अथवा वेणी घालून पाठीवर सोडतात. त्या डावे नाकांत एक सोन्याची बेसर (फूल) घालतात. त्यांच्यांत नथ, तोंडे किंवा वाळे कधींच घालीत नाहींत. इतर गुन्हेकरणारे लोकांच्या जातीप्रमाणें यांच्यांतही पुरुष आणि बायका दारू पितात. हे लोक उर्दु आणि मराठी या दोन्ही भाषा चांगल्या बोलतात, परंतु बोल-

त्यांना चमत्कारिक सूर काढतात. यांची स्वतःची भाषा ह्मटली ह्मणजे गुजराथी असून तींत पुष्कळ मारवाडी शब्द मिसळलेले आहेत. उत्तर हिंदुस्थानांत राहणारे बावरी लोकांची व यांची भाषा जरी अगदीं सारखी नाहीं तरी ते आपसांत बोलले असतां एकमेकांचा मतलब समजतात.

दक्षिणी कंजर हे आपली खरी जात न सांगतां कोल्हाटी बेलदार किंवा भाट आहोंत असें सांगतात. हे लोक अलिकडे टोप्या, हातमोजे, व पायमोजे तयार करून विकतात व त्याजवरच उपजीविका करितों असें दाखवितात. आणि म्हणूनच ते आपणांस टोपीवाले भाटही ह्मणतात नेहमीं फिरस्ते असल्यामुळें ते पालें देऊन राहतात. त्यांचे पालाभोंवतीं पुष्कळ गाढवें असतात त्यावरून व यांचे बायकांचे पेहरावावरून या जातीचे लोकांस सहज ओळखतां येतें. हे बहुतकरून गांवचे बाहेर राहतात. या लोकांचा मुख्य उद्योग ह्मटला ह्मणजे डाका मारणें, रस्ता लूट करणें, वाटसरू मुकामाचे जागीं रात्रीं निजून राहिले असतां त्यांचें सामान चोरणें, गाढवें व घोडीं चोरणें वगैरे हा आहे. ते स्वतः कधीं घरफोडी करीत नाहींत परंतु बदला आणि मांग लोकांकडून हें काम करवून त्यांस मेहनतीबद्दल मालाचा हिस्सा देतात. रेलवे लईनीवर मधेंच कोठें कोठें इंजिनांत पाणीं घेण्याच्या जागा केल्या आहेत अशा ठिकाणीं मालाचे गाडीचें इंजीन पाणी घेण्याकरितां उभें राहिलें असतां हे लोक अलिकडेस वागिनींतून कापडाचे गठ्ठे व धान्याचे थैले चोरूं लागले आहेत. ते लोक गाढवांची चोरी मोठ्या शिताफीनें करतात व ज्या जिल्ह्यांतून या लोकांची टोळी जाते त्यांतील पुष्कळ गाढवें हे चोरून नेतात. यांचीं गाढवें चोरण्याची एक रीत अशी आहे कीं गांवचीं गाढवें ज्या जागीं चरत असतील तेथेंच आपलींही गाढवें चरण्यास सोडतात; आणि संध्याकाळीं सर्व गाढवें जशीं कांहीं त्यांचींच आहेत अशा रीतीनें एकदम हाकून उघड मुकामाचे जागेकडेस घेऊन जातात. याप्रमाणें नेत असतां आपले गाढवांत वळवून चालविलेल्या गाढवां पैकीं एखादे गाढवाचा मालक येऊन त्यानें जर आपलें गाढव ओळखून त्याजबद्दल यांस हटकलें तर ते सांगतात कीं आमचे गाढवांत दुसरे कोणाचें गाढव मोकाट आलें आहे हें आमच्या पूर्वी लक्षांत आलें नाहीं. आणि यांत आपलीं असतील तितकीं

गाढवें एकीकडे करून घेऊन जावीं अशाविषयीं ते त्यास हातपाय जोडून सांगतात. परंतु कोणी न हटकतां जर ते आपले मुकामाचे ठिकाणीं पोहोंचले तर अशा प्रकारानें चोरून आणलेलीं लोकांचीं गाढवें ते रातोरात टोळीपैकीं एका मनुष्याबरोबर पुष्कळ दूर पाठवितात. व आपणही सर्व खटल्यासुद्धां दुसरे दिवशीं सकाळीं कूच करितात. दुसरी रीति अशी आहे कीं जवळपास कोणी मनुष्य नाहीं असें पाहून ते गांवचीं मोकाट गाढवें एखाद्या नाल्याकडेस हाकीत नेतात आणि तेथें त्यांचे चारी पाय बांधून त्यांस एखाद्या खाड्यांत टाकून देऊन घरीं येतात. आणि रात्र झाली ह्मणजे पुन्हा त्या ठिकाणीं जाऊन पाहतात तीं जर मालकानें सोडून न नेतां तेथेंच पडलीं असतील तर त्यांस मोकळें करून दुसरे गावीं हाकून नेऊन नापत्ता करितात. घोडीं बाहेर मेखांस बांधलेलीं असतात तीं तर नेतातच परंतु तबेल्यांतूनही घेऊन जातात; आणि एकदम दूर पाठवून देतात. एकदां असें झालें कीं कंजर जातीच्या एका पोरानें एक घोडें चोरून तो त्याजवर बसून सुमारें अडतीस कोश बऱ्हाणपुरास गेला व तेथें त्याचे दाम करून दुसरे दिवशीं आगगाडींत बसून मुकामाचे जागीं आला. यात्रे करितां गाड्यांतून माल भरून रस्त्यानें जात असतां कंजर लोक मागल्या मागेंच गठ्ठे कापून त्यांतील माल चोरून नेतात. हे बकऱ्या आणि मेंढरें चोरण्याचे कामींही फार प्रवीण आहेत व असे प्रकारची चोरी रात्रीस करितात. हे कोंबड्याही चोरतात. दिवसास कोंबड्या कोंडण्याची जागा पाहून ठेवून, रात्रीस जवळ एक ओलें धोतर घेऊन आंधारांत तेथें जातात आणि दरवाजा मोकळा करून आंतील कोंबड्यांवर ते धोतर टाकून देतात. या योगानें त्या कांहीं शब्द न करितां तशाच स्तब्ध राहतात. नंतर एक एका कोंबडीची मोठ्या युक्तीनें मान मुरगाळून टाकतात. यांच्या पुष्कळ बायका एकत्र जमून गाण्या नाचण्या करितां गांवांत जातात व तेथें चोरीच्या संबंधानें बातमी मिळवून ती आपले पुरुषांस सांगतात. चोरीचे मालाची स्वल्प रीतीनें व्यवस्था करतां यावी याजकरितां ते गांवच्या एखाद्या मनुष्याशीं परंतु होईल तेथ पर्यंत पाटलाशीं दोस्ती पाडतात. आणि चोरींत मिळालेला सर्व माल एकदम त्याजपाशीं आणून देतात व तो फरोक्त करून त्याचे रुपये करितो. त्यांची

उतरण्याची जागा जर चोरीचे ठिकाणापासून दाहा किंवा पंधरा कोशाचे आंत असेल तर ते चोरीचे मालपैकीं एक जिन्नसही आपले जवळ ठेवीत नाहींत. त्यांचे मुक्कामाची जागा चोरीचे ठिकाणा पासून पंधरा कोशांवर असेल तर मात्र चोरीपैकीं कांहीं कपडे घरीं घेऊन येतात. आणि ते फाडून त्यांचीं आपल्याला पांघरूणें करितात कांहीं अडचणीमुळें जर चोरीचे मालाची वर प्रमाणें तजविज न करतां आली तर लागलीच तो दूर गाडून ठेवतात व पुढें संधी मिळतांच तो पाटलाचे किंवा दुसऱ्या गांवकऱ्याचे स्वाधीन करितात. जेव्हां कोणीं गांवकऱ्याचा अथवा पाटलाचा दक्षिणी कंजर जातीच्या मनुष्याशीं विशेष निकटसंबंध दिसून येईल तेव्हां हें पक्कें समजावें कीं तो इसम चोरीचा माल घेणारा आहे.

---

## मारवाडी कंजर ह्यांस भाट आणि उंचे लहंगेवाले अथवा बैलवाले असेंही म्हणतात.

हे लोक मारवाडांतून आले असून ते सर्व दक्षिणभर फिरतात व मद्रास इलाख्यांतही बरेच दूर जातात. या जातीचे पुरुष उंच बांध्याचे असून मोठे बळकट असतात. यांचा वर्ण गोरा असून तोंडवळा मारवाडी लोकांसारखा असतो. यांच्या बायका स्वरूपानें देखण्या परंतु फार अमंगळ असतात. या लोकांची कितिही लहान टोळी असली तरी तिजबरोबर तीन चार बायका असायाच्याच. दक्षिणी कंजर जी भाषा बोलतात तीच भाषा हेही बोलतात परंतु यांचे उच्चार मारवाड्यांसारखे येतात. यांनां मारवाडी भाषा फार चांगली बोलतां येते; तसी उरदू येत नाहीं आणि मराठी तर मुळींच समजत नाहीं. ते आपले जातीचें खरें नांव न सांगतां कोणी विचारल्यास आम्ही भाट, नट अथवा बैलपारधी आहोंत असें सांगतात.

दक्षिणी कंजर लोकांप्रमाणें हेही लोक फिरस्ते आहेत. हे पालें देऊन राहतात व बहुतकरून गांवापासून फार दूर व दोन गांवचे शिवेवर उतरतात. यांजबरोबर बैल व गाई पुष्कळ असतात. यांच्या बायकांचे लहंगे आंखूड म्हणजे पायांच्या पोटऱ्यांपर्यंत असतात आणि मारवाडी

बायकांप्रमाणें त्यांचे घेर फार मोठे असतात. या गोष्टींवरून उतरलेले लोक याच जातीचे आहेत हें ओळखतां येतें. लहंग्याचें कापड बहुतकरून अस्मानी रंगाचें असून त्याजवर दुसऱ्या रंगांचे पट्टे लाविलेले असतात व खालीं घेरास गोट लाविलेला असतो. त्यांच्या बायका चोळ्या घालित नाहींत; फक्त एक लांब कफनी अंगांत घालतात व तीस बाह्या असतात. हे मारवाडी लोकांप्रमाणें चढाऊ जोडे पायांत घालतात. डोक्यावरील दोन्ही बाजूचे पुढले केशांची वेणी घालतात. व बाकी सर्व केशांचा मागले अंगांस बुचडा बांधतात अथवा वेणीही घालतात. भांगाचे दोहो बाजूंस ज्या वेण्या घालतात त्यांत कवड्या किंवा गुंड्यासारखे पितळेचे वाटोळे नग घालतात. बायका अंगावर सोन्याचे दागिणे घालीत नाहींत त्यांच्या धर्मांत सोनें अंगावर घालण्याची मनाई आहे. त्यांचे डागिणे तांबें, पितळ, रुपें किंवा जस्ताचे असतात. नथ बहुतकरून चांदीची केलेली असते. त्या हातांत पितळेचीं कडीं घालतात; काचेच्या बांगड्या घालीत नाहींत. त्यांच्या कानांतल्या बाळ्या लांब तारेच्या केलेल्या असून त्यांत एक मणी लोलकासारखा अडकवलेला असतो. त्या गळ्यांत निरनिराळ्या रंगाच्या माळा घालतात. पायांत पितळ, जस्त किंवा कधीं कधीं चांदीचे पैजण घालतात. या जातींतल्या बायकांत एक गोष्ट विशेष आहे ती अशी कीं त्यांस तपकीर ओढण्याचें जबरदस्त व्यसन असून त्या खुप तपकीर ओढतात. पुरुषही गळ्यांत मण्यांच्या माळा आणि घोड्याचे केसांचे गोफ करून घालतात.

दक्षिणी कंजराप्रमाणेंच यांच्याही टोळींत जो मुख्य असतो त्यास जमादार ह्मणतात. हे लोक डाका, रहाजनी व सर्व प्रकारच्या इतर चोऱ्या करितात व जनावरेंही चोरतात परंतु बैल आणि गाई या शिवाय दुसरीं जनावरें चोरीत नाहींत. गाढवें चोरणें यांच्यांत फार बे आब्रूचें काम समजतात याजमुळें तीं हे कधीं चोरीत नाहींत. "ठगी आणि डेकाइटी" खात्याची या लोकांचे मनांत अतिशय भीति बसल्यामुळें ते आतां मोठाले डाके मारण्याच्या फारसे भरीस पडत नाहींत; परंतु रस्तालूट करितात. जनावरें चोरण्याविषयीं यांचा बाणा आहे; बैल, गाई व बकऱ्या वगैरे चोरण्याची संधी सांपडल्यास ती कधीं दवडीत

नाहींत. ते घरफोडी मुळींच करित नाहींत. यांच्या बायका एकत्र जमून गाण्या [illegible] रितां गांवांत जातात व तेथें जी बातमी मिळेल ती आपल्या पुरुषांस सांगतात. चोरींत कांहीं जड सामान आल्यास तें दूर पुरून ठेवितात व दुसऱ्या मौल्यवान लहानसान वस्तु त्याच्या बरोबर एक हात लांब रुंदीच्या खाटा असतात त्यांचे खूर पोखरून त्यांत भरून ठेवितात. मौल्यवान माल छपविण्याची ही यांची युक्ति फार चांगली आहे व ज्यास यांचे जातीबदल कांहींच माहिती नाहीं त्यास माल तेथें असेल अशी कधीं कल्पना ही येणार नाहीं. बायकांचे लहंग्याला पुढचे आंगास लांब खिशे असतात त्यांतही त्या चोरीचा माल ठेवितात.

---

## गोपाळ.

गोपाळ लोक हे हिंदुजातीचे आहेत. हे लोक वऱ्हाडांत प्रथमतः नेमाड व इंदुराकडून येऊन नंतर निजाम सरकारचे राज्याचे दक्षिण प्रदेशांत पसरत गेले असें दिसतें. हे लोक नेमाडांत कोठून आले याजबद्दल खात्रीनें सांगतां येत नाहीं; बहुतकरून चोरांच्या सर्व जातींचा आगर जो गुजराथ प्रांत तिकडून आले असतील असें वाटतें. गोपाळ लोकांच्या निरनिराळ्या पांच जाति आहेत; त्यांचा आपसांत विवाह संबंध नाहीं. प्रत्येक जातींत साडेबारा पोटभेद आहेत. पुरुषांचे पेहरावावरून व त्यांचे उपजीविकेचे साधनावरून ते कोणत्या जातीचे आहेत हें सहज समजून येतें. सर्व जातीचे गोपाळ जनावरें चोरतात मात्र मुख्यत्वें करून ह्मशी, मेंढरें व बकऱ्या हीं फार चोरतात. ते घरफोडी करितात व कधीं कधीं, परंतु क्वचित प्रसंगीं, डाकाही घालतात. त्यांच्या पांच जाति आहेत त्या ह्याः—

१. "वीर गोपाळ." या जातीचे लोक नेमाड, खानदेश जिल्ह्याचा व निजाम सरकारचे राज्याचा उत्तर प्रदेश व वऱ्हाड इतक्या ठिकाणीं आढळतात. या जातीचे लोक केवळ फिरस्ते नाहींत. ते एखाद्या गांवांत सिंदीचे पानोळ्यांचीं घरें करून एक दोन किंवा तीन वर्षें पर्यंत

अथवा जितके दिवस त्या गांवचे पाटलाशीं व यांच्याशीं स्नेहभाव राहील तितके दिवस राहून नंतर पुढें दुसरे गांवीं जातात. ते सिंदीच्या पानाचे बोरे करून विकतात आणि त्यांचे उत्पन्नावर गुजराण करितात. त्यांचा पेहराव कुणब्या प्रमाणें असतो मात्र ते धोतर न नेसतां गुढघ्या पर्यंत पांढरे चोळणे घालतात. यांच्या बायका लुगडीं नेसतात व मराठे जातीच्या बायकांप्रमाणें अंगांत चोळ्या घालतात. यांच्यांत जो मुख्य असतो त्यास पाटील ह्मणतात.

२. "पांगुळ गोपाळ" वीर गोपाळ जातीचे लोक ज्या देशांत राहतात तिकडेच या जातीचेही लोक राहतात. या जातीचे पुष्कळ लोक इंदुरास राहिले आहेत. हे लोकही सिंदीच्या पानाच्या चटया करून त्यांजवर आपली उपजीविका करितात. या दोन (वीर गोपाळ व पांगुळ गोपाळ) जातीचे लोक वऱ्हाडांत राहिले आहेत. हे लोक बोरिये करितात यावरून त्यांस "बोरिएकार" असें नांव या मुलकांत पडलें आहे. या लोकांचे उपजीविकेचें उघड साधन ह्मटलें ह्मणजे बोरे करण्याचें आहे असें वर सांगितलेंच आहे परंतु त्याशिवाय हे लोक झाडावर बसून भीकही मागतात. ह्मणजे एका झाडाचे बुंधापाशीं जमिनीवर धोतर पसरून आपण वर उंच एका खांदीवर जाऊन बसतो आणि तेथून मोठ्यानीं ओरडून देवाचे नांवानें भीक मागतो. या जातींतील पुरुषांचा पोशाख साधारण कुणब्यासारखा असतो. ते चोळणे घालित नाहींत धोत्रें नेसतात. वीर गोपाळ जातीचे लोकांत व यांच्यांत पेहरावाचा इतकाच भेद आहे. यांच्या बायका लुगडीं नेसतात व अंगांत चोळ्या घालतात. यांचे जातींत जो मुख्य असतो त्यास पाटील अशी संज्ञा आहे. या सर्व जातीचा जो एक मुख्य पाटील आहे तो वऱ्हाणपुराजवळ एके गांवीं राहतो. जेव्हां कांहीं जातीसंबंधी भानगडीचा वाद असेल तेव्हां मात्र त्यास बोलावून नेतात.

३ "पहेलवान गोपाळ." हे लोक वऱ्हाडचे दक्षिणेस जो मुलूक आहे त्या मुलकांत असतात. या जातीचे पुरुष घट्ट चड्डया घालतात. यांचे डोक्यास पागोटें व अंगावर धोतर असतें. ते कसरत करितात आणि एक लांब वासा घेऊन त्याजवरही निरनिराळे प्रकारचे खेळ करून

दाखवितात. कसरतीचा खेळ करतानां हे लोक ढोलक्या वाजवितात. हे लोक फिरस्ते आहेत. ते सिंदीच्या पानाचे बोरे करितात. परंतु निजाम सरकारचें राज्य सोडून हे फारसे बाहेर जात नाहींत. ते पालांत राहतात. आणि आपलीं पालें व इतर सामान चालते वेळेस म्हशींवर लादून नेतात.

४ "गुजराथी गोपाळ." हे लोक गुजराथेंतील राहणारे आहेत असें त्यांचे नांवावरूनच समजतें. या जातीचे पुरुष पांढऱ्या किंवा भगव्या रंगाच्या घट्ट चड्डया घालतात. डोक्यास तांबडें किंवा पांढरें मोठें पागोटें असतें व खांद्यावर एक धोतर घेतात. हे गळ्यांत लहान व मोठ्या पांढऱ्या मण्यांच्या माळा घालतात व कानांत पितळेच्या तारेंतही मणी ओऊन त्याच्या बाळ्या करून घालतात. ही चाल गोपाळ लोकांचे दुसरे जातींत नाहीं. यांच्या बायका केव्हां केव्हां लहंगे घालतात व कधीं लुगडींही नेसतात. गोपाळ लोकांचे सर्व जातींत ही जात फार नीच मानली आहे असें दिसतें; कारण या जातीचे लोक दुसरे सर्व जातीचे लोकांचे हातचें पाणी पितात व जेवतात परंतु ते लोक या जातीचे हातचें पाणी पीत नाहींत किंवा जेवित नाहींत. यांचें उपजीविकेचें उघड साधन म्हटलें म्हणजे दोरावर व जमिनीवर कसरतीचे खेळ करणें हें होय.

यांची मूळ भाषा गुजराथी आहे तथापि ते मराठी व हिंदुस्थानीही चांगलें बोलतात. परंतु त्यांचा स्वर बदला, बावरी, वागरी किंवा टाकणकार लोकांसारखा येतो ही गोष्ट आश्चर्याची आहे. पुष्कळ शब्द तर अगदीं एकच आहेत. या जातीचे लोक खरोखर फिरस्ते असून यांचीं राहण्याचीं नियमित ठिकाणें नाहींत. हे सर्व मध्य हिंदुस्थानांत व दक्षिणेंत फिरतात व मळीण भगव्या कपड्यांचे पालांत राहतात घरें बांधून राहत नाहींत.

५ "काम गोपाल." हे लोक बहुतकरून निजाम सरकारचे राज्याचे उत्तर प्रदेशांत राहतात व तो मुलूख सोडून सहसा बाहेर जात नाहींत. हे फिरस्ते आहेत. एक मळकट पिंवळ्या रंगाची घट्ट चड्डी, डोक्यास पांढरें किंवा तांबडें पागोटें व अंगावर एक धोतर इतकाच कायतो

या लोकांचा पोषाख. मात्र गोपाळ जातीचे दुसरे लोकांत व यांच्यांत विशेष फरक मिळून इतकाच कीं यांच्याजवळ काळे पट्ट्यांचे पडमाचे बटवे असतात. या लोकांचीं उपजीविकेचीं उघड साधनें ह्मटलीं म्हणजे कसरतीचे तमाशे करणें व टोपल्या विणणें हीं होत.

वर सांगितल्याप्रमाणें गोपाळ लोकांच्या जातींतील लोक व बोरियेकर हे चोरी करून उपजीविका करितात. व शिक्षेस न जुमानितां जनावरें चोरितात. व विशेषतः ह्मशींवर यांची दृष्टी फार असते. मेंढ्या व बकरें एकटें मिळाल्यास त्यांसही हाकून नेण्यास ते कमी करीत नाहींत. वीर व पांगुळ गोपाळ या लोकांत जसा चोरी करण्याचा बंदोबस्त आहे तसा त्यांचे पैकीं इतर कोणचेही जातींत नाहीं. या लोकांत सर्व व्यवस्था फार हुशारीनें केलेली असते. चोरी करण्यास सोपें पडावें ह्मणून या लोकांनीं होळकर सरकार व निजाम सरकार यांच्या सरहद्दीवरील प्रदेशांत साधारणतः सारख्या अंतरावर आपल्या वसाहती केल्या आहेत ह्मणजे जे होळकर सरकारच्या राज्याच्या दक्षिणेस सात पुड्याच्या पायथ्यांशीं आणि त्याच धोरणानें पश्चिमे कडेस यांच्या वसाहतीची एक रांग जाते दुसरी खानदेशामधून येऊन वऱ्हाडाच्या मध्य भागांतून जाते आणि तिसरी इंग्रेजी राज्याच्या सरहद्दीपासून जवळच निजाम सरकारचे राज्यांतही जाते. एखादी ह्मैस होळकर सरकारचे राज्यांत चोरली ह्मणजे ती लागलीच खानदेशांतून वऱ्हाडांत येणाऱ्या वसाहतीच्या रांगेंत पाठविली जाते आणि त्याच प्रमाणें निजाम सरकारचे राज्यांत चोरी केली तर ती खानदेशांत आथवा सातपुड्याचे पायथ्याशीं असलेल्या वसाहतीचे रांगेंत पाठविली जाते. एका वसाहती पासून दुसऱ्या वसाहतींत फारच थोड्या वेळांत पोंचवितात. ह्मैस ज्या ठिकाणीं पाठविली तेथें पोहोंचल्यावर लागलीच हत्याचे बजारांत होईल तितक्या जलदीनें विकली जाते. ज्या ठिकाणीं चोरी होते त्या ठिकाणचें व ज्या ठिकाणीं ती विकली जाते त्यामध्यें अंतर पुष्कळ असल्यामुळें चोरीचा पत्ता लावणें फार कठीण पडतें. जितक्या जनावरांच्या चोऱ्या होतात तितक्या बहुशः यांचे लोकांनीं केल्या असतात. विशेषतः ह्मशीच्या चोऱ्यां विषयीं तर विचारणेंच नको. गोपाळ जातीचे

लोकांचा हा विशेष गुण आहे कीं ते आपल्या घराजवळ कधींही चोरी करीत नाहींत. उदाहरणार्थ खानदेशांत राहणारा गोपाळ हैद्राबाद प्रांतांत अथवा वऱ्हाडांत किंवा वसाहतींत जाईल व तेथील स्वजातीय त्यास लपवून ठेवितील. नंतर आपल्या जाती शिवाय इतर कोणी ओळखूं लागण्याचे पूर्वी तो जनावर चोरून चालता होईल. प्रायशः गवळ्याच्या वेशावांचून इतर वेश ते घेत नाहींत. बोरीयावाले नांवाची एक मुसलमानी जात आहे तींतील लोकही डाके घालून व रस्ता लूट करून पोट भरितात. हे बोरिया बफ या नांवानें प्रसिद्ध आहेत. हे हिंदु जातीचे गोपाळ लोकांप्रमाणें जनावरांची चोरी करीत नाहींत. ठगी व डेकाइटी खात्यांतील लोक यांस पूर्णपणें ओळखतात. यामुळें पुष्कळ लोक काळे पाण्यावर पाठविले गेले आहेत. ही जात फिरस्ती आहे व हींतील लोक फकिराचें सोंग घेऊन माहिती मिळवितात. हे गुन्हे करण्याचे कामांत फार अविचारी व धाडस असतात. लाग लागेल तर खेड्यापाड्यांत मशाली लाऊन डाके घालणें हें यांस फार आवडतें. हे कधीं कधीं निजाम सरकारचे राज्यांत व मुंबई इलाक्यांतील कांहीं भागांत फिरतात.

---

## मांग.

मांगलोकांची जात मूळपासून फार हलकी मानली असून व्यवहारांत ते महारा पेक्षांही नीच मानले जातात. या जातीचा नेहमी लोक फार तिरस्कार करीत व हिंदू राज्यांत यांच्यावर फार जुलूम होत असे. या मुळें दक्षिणेंतील मांग लोक अति निकृष्ट स्थितींत होते. परंतु इंग्रजी राज्याचा न्यायी अम्मल सुरू झाल्यापासून मात्र या लोकांच्या स्थितींत पालट पडला. भरवस्तीचे प्रदेश सोडून देऊन हे जंगलांत आणि झाडींत जाऊन राहिले. व पुढें उत्तरोत्तर दक्षिणेंत येऊन राहात गेले. व कांहीं आणखीं पलीकडे उत्तरेस पसरत चालले. त्यामुळें आतां मांगाचें घर नाहीं असें एकहीं गांव नाहीं. आरंभीं या लोकांस पोटभरण्याचें मुळींच कांहीं साधन नसल्या मुळें हे लोक चोरी करूं लागले. अद्यापही कांहीं लोकांचा व मुख्यत्वें करून रखवालदार किंवा घाटोळे मांग लो-

कांचा कल या कामाकडेस आहे. दुसरे लोक या कामांत जात नसून कामधंदा करून आपआपल्या जातीच्या नियमाप्रमाणें निर्वाह करितात. जसें, कांहीं लोक टोपल्या करितात; कांहीं वाखाच्या दोऱ्या व चामड्याच्या वाद्या करितात; कांहीं केरसुण्या (फडे) करितात. व या लोकांच्या बायका सर्व जातीचे लोकांत दाईपणाचीं कामें करितात.

रखवालदार मांग डाके मारतात, रस्तालूट करितात, घर फोडतात व चोऱ्या करितात. हे लोक मोठे धाडस असून जबरीचोरी करणें हा ते आपला स्वभाविक धंदाच समजतात. टोळींत जो मुख्य असतो त्याजला नाईक अशी संज्ञा आहे. व ते एकनिष्टेनें याचे आज्ञेत वागतात. सर्व प्रसंगीं याचा मान मोठा समजतात. आणि कोणतेही प्रकारचे वादांत हा जो निकाल करील तो सर्व मान्य करितात. गुन्हे करण्यासंबंधीं सर्व तजविज करण्याची जबाबदारी याजवर असते. हे लोक जेव्हां केरसुण्या व टोपल्या विकण्याकरितां गांवांत फिरतात त्या वेळेस चोरी करण्यास लागणारी अवश्य माहिती मिळवितात. डाका किंवा जबरीचोरी करण्याच्या जागेविषयीं प्रथम निश्चय झाल्यावर टोळींतील सर्व लोक त्यापैकीं एका इसमाचे घरीं जमतात. तेथें दारूही बरीच उडते; व गुन्ह्याचे संबंधानें सल्ला होऊन प्रत्येकास आपआपलें काम बजावून सांगितलें जातें. नंतर देवीची पूजा करून योजिलेल्या कार्यास यश मिळावें अशी तिची प्रार्थना करितात. ज्या रात्रीं गुन्हा करण्याचा संकेत झाला असेल त्या रात्रीं सर्व एकत्र जमून कोणीं तलवारी, कोणीं चापाच्या बंदुकी, कोणीं दगड व कोणीं सोटे घेऊन निघतात. ते एक लहान सुरिही बरोबर ठेवितात. ज्या घरावर दरवडा घालणें असेल त्या घराचे आसपासचे मोठे रस्ते व बोळ यांत माणसें उभीं करून नंतर बाकीचे इसम मोठ्यानें दीनदीन शब्द करित घराकडेस जातात. दरवाजे फोडून आंत शिरल्यावर, घरांतील मनुष्यांस जीव घेण्याची वगैरे भीति घालून त्यांजला माल दाखवून देण्यास लावतात. बायकांचे अंगास मात्र हे मुळींच हात लावित नाहींत. कार्यसिद्धि झाल्यावर टोळीचे लोक गेलेल्या रस्तानें न येतां दुसऱ्याच वाटेनें आपले ठिकाणीं परत येतात. व या गुन्ह्याबद्दल आपला संशय कोणास येऊं नये, व दुसरेच लोकांनीं डाका घातला असावा

अशी सर्वांची समज व्हावी याकरितां ज्या घरीं डाका घातला असेल त्या घरांत मुदाम दुसऱ्या जातीचे लोकांचे जोडे, फकीर लोकांच्या झोळ्या, किंवा हिरव्या मणक्याच्या माळा टाकून देतात. डाका घातल्या नंतर आपले ठाण्यावर परत आल्यावर पुन्हा आणखी खुप दारू पिऊन आप-आपले घरीं परत जातात. माल एखादे शेतांत पुरून त्या जागेवर ओळ-खीसाठीं कांहीं खूण करितात. व त्या गुन्ह्याबद्दलचा बोभाट अगदीं मिट-ल्यावर माल उकरून काढून हिसे करून घेतात. नाईकास सर्वापेक्षां हिसा अधिक देतात. लूट करते वेळेस बोलण्याचें काम पडल्यास ते एक प्रका-रची चमत्कारिक भाषा बोलतात. ती त्यांच्या खेरीज दुसऱ्याला कधीं समजत नाहीं. घरफोडी करण्याकरितां बहुतकरून एकच इसम जातो. परंतु क्वचित प्रसंगीं दोन किंवा तीन इसम मिळूनही जातात. यांचे घरफोडण्याचें हत्यार लोखंडाचें असून तें सुमारें एक फूट लांब असतें. टोंकास त्याचा आकार सुताराचे किकऱ्यासारखा असतो. छिद्र केल्या ठिकाणीं हत्याराची निशाणी पाहिल्यावर घरफोडी या जातीचे लोकांनीं केली किंवा दुसऱ्यांनीं केली हें सहज समजतें. लूट करतांना जर त्यांस कोणी आडवा झाला तर ते त्यास ठार मारण्यास मागें पुढें पाहत नाहींत. परंतु त्यांचे लोक फार जखमी झाले तर, किंवा त्यांचा परत जाण्याचा मार्ग बंद केला तरच मात्र या थराम गोष्ट येते; नाहीं तर ते सहसा असें करित नाहींत. अंगावरील डागिना जर लवकर निघत नसेल तर बेलाशक शरिराचा तो भाग तोडून डागिना काढून घेतात.

बांगड्या विकणारे कासार व माळी या दोन जातीचे लोकांस मात्र मांग बिल्कूल उपद्रव देत नाहींत. कारण कासार लोक कांचेच्या व लाखेच्या बांगड्या करितात. त्याजवरून सौभाग्यवती कोण व विधवा कोण हें ओळखतां येतें. तसेंच माळी लोक यांचा जन्मापासूनच जमि-नीची सेवा करून उपजीविका करण्याचा धंदा असल्यामुळें व जमिनीस ते "धरणी माता" समजतात यामुळें तिजपासून उत्पन्न केलेले पदार्थां-विषयीं ही त्यांची पूज्यबुद्धि आहे सबब ते माळी लोकांस कधीं त्रास देत नाहींत. ही गोष्ट दुसरे जे जमिनीची किस्तकारी करणारे लोक आहेत, त्यांस लागू नाहीं. कारण ते जें करतात, तें केवळ आपल्या गरजेसाठीं

करितात. कासार व माळी हेही मांग लोकांशीं नेहमीं स्नेहभावानें वागतात व संकटाचे प्रसंगीं त्यांस मदत करितात. आणि कित्येक वेळ त्यांनीं चोरून आणलेल्या मालाचीही व्यवस्था करून देतात. दक्षिणेंत जितके मांग आहेत त्या सर्वांच्या चार निरनिराळ्या जाति आहेत. त्यांचें वर्णन पुढें दिलें आहे. परंतु आश्चर्य हें कीं या चार जातींशिवायही प्रत्येक हिंदु जातीचे लोकांत मांगाची जात निराळी आहेच. जसे बंजारी लोकांचे मांग निराळेच आहेत. त्या जातीस "धालिया" ह्मणतात. त्याचप्रमाणें कोरकु, तेलंगे, बेडर, वगैरे लोकांच्या मांगाच्या जाति स्वतंत्रच आहेत.

वर चार जातींविषयीं लिहिलें त्या जातिः—

१. रखवालदार मांग– यास कोठें मांग रामोशी व कोठें घाटोळे मांग असें ह्मणतात. हे लोक गांवचे जागलीवर राहातात, व सिंदीच्या पानाचे बोरे व टोपलीं वगैरे करितात.

२. होलद मांग– हे लोक चौघडे व सनई वगैरे वाजवितात. व आनंदाच्या कार्यांत तुतारी (सिंगाडा) वाजवितात. सरकारचे हुकुमानें कोणास फांशीची शिक्षा झाल्यास याच जातीचे लोक गळ्यास तांत लावतात. या जातीचे लोक जोडे व दुसरेंही चामड्याचें काम करितात.

३. नदा मांग– या जातीस कोठें वराडु मांग असेंही ह्मणतात. हे लोक चामडीं रंगवितात. वारत्या करितात. बासांच्या टोपल्या व खराटे करितात. ते सिंदीच्या पानाचें कांहीं सामान करीत नाहींत; याजवरून या जातींत आणि रखवालदार मांग या जातींत काय फरक आहे हें तेव्हांच समजतें.

४. दुकलवड मांग– हे सर्व जातीच्या मांग लोकांचे भाट आहेत. या जातीचे लोक नेहेमी भटकत फिरतात. आणि फक्त मांग जातीचे लोकांपाशींच भीक मागून पोट भरतात. ते पालांत राहतात; आणि हीं पालें ते गाढवावर घालून नेतात. प्रत्येक टोळी बरोबर पुष्कळ कुत्रे असतात. ज्या गावांत मांगाचें घर आहे अशा गावांत येऊन पोहोचल्यावर दुकलवड मांग हा आपलें पाल त्याचे घराचे समोर उभें करितो; मग त्याचा स्वतःचा, बरोबरचे माणसांचा व जनावरांचा

सर्वांचा खर्च त्यानें चालविला पाहिजे. जर तो याप्रमाणें करणार नाहीं, आणि त्याचा अपमान करील तर तो एक चिरगुटाची बाहुली करितो आणि ती एका लांब बासास उलटी बांधून त्या मांगाचे नावानें फिरवितो. सर्व लोक त्यास जातीबाहेर टाकतात असें झाल्यावर त्यास कांहीं एक विकण्याची परवानगी नाहीं; त्यानें एक केरसुणी देखील विकूं नये. व पुन्हा जातींत येणें झाल्यास त्यास फार खर्च लागतो.

या वरील चार जातीचा, लोक विटाळ मानितात. व त्यांच्यांशीं कोणतेही प्रकारचा व्यवहार ठेवीत नाहींत. परंतु साधारणतः मांग लोक हे फार आनंदी असतात. व लोक त्यांच्याशीं असे रीतीनें वागतात याजबद्दल ते किंचितही दिलगिरी मानीत नाहींत.

---

## मांग गारोडी.

हिंदुजातीचे दुसरे जे गुन्हे करणारे लोक आहेत, त्या लोकांप्रमाणेंच हेही लोक मुळचे गुजराथेंतील असावे, असें दिसतें. कारण त्या लोकांप्रमाणें हेही गुजराथी भाषाच बोलतात. ते अगदीं शुद्धभाषा बोलत नाहींत; कारण फार दिवस दक्षिणेंत राहिल्यामुळें त्यांचे बोलण्यांत पुष्कळ महाराष्ट्रभाषेचे शब्द येतात. हे लोक केवळ गुन्हे करून पोट भरतात व या जातीचे लोक जबरीचोरी करण्याचे व जनावरें चोरण्याचे कामांत फार वस्ताद आहेत. या जातीच्या बायकांस व मुलांस देखील चोऱ्या करण्याची सवय असते. या लोकांची टोळी कोठें उतरली असल्यास ती यांच्या लहान लहान पालावरून तेव्हांच ओळखतां येते. फिरस्ते लोकांच्या दुसऱ्या जातीप्रमाणें यांचीं पालें बंद नसून खालीं चहूंबाजूनें मोकळीं असतात व पालांच्या बाजू जमिनीशीं टेंकून न बांधतां काठ्या पुरून त्यास कांहीं अंतरावर ऊंच बांधतात. हे लोक पालाला दोऱ्या लावित नाहींत. जेव्हां पुष्कळ लोक एका ठिकाणीं उतरतात तेव्हां आपआपलीं पालें एका ओळीनें देतात. यांच्या टोळी बरोबर पुष्कळ म्हशी व कुत्रे असतात. यांच्या बायका व मुलेंही बरोबरच असतात. ज्या वेळेस हे कुच करितात. तेव्हां आपलीं पालें व दुसरें सामान

हेल्यावर किंवा गाढ्वांवर लादतात. दुसरे जनावरावर सामान नेणें वगैरे यांच्या जातींत वर्ज आहे. प्रत्येक टोळींत एक मुख्य असतो; त्यास नाईक ह्मणतात. या त्याच्या हुद्याचे संबंधानें त्याच्या खांद्यावर लाल बनात किंवा शाल असते व त्यावरून तो ओळखतां येतो. हा टोळीचा राजवस्त्या असतो व कोणी नवीन मनुष्य भेटल्यास त्याच्याशीं सवाल जबाब बहुत करून हाच करितो. या जातीचे लोकांचा बांधा चांगला असून ते उंच असतात. त्यांचा पेहेराव साधारण पहिलवान लोकांसारखा असतो. ह्मणजे ते भगव्या रंगाच्या घट्ट चड्डया घालतात, कंबरेस काच्या बांधितात, व त्याचे दोन्ही टोंकांस झालर असते; अंगावर एक दुपेटा घेतात व डोक्यास आवड धोवड बांधलेलें मोठें पागोटें असतें. परंतु ते नेहेमी पागोटें न घालतां एक मळकट चिरगूट डोक्यांस गुंडाळतात. ते कानांत पितळेच्या बाळ्या घालतात, व गळ्यांत मणक्यांची माळ असते. या लोकांच्या बायका आंखूड लुगडीं तेलंगे लोकांच्या बायकांसारखीं नेसतात. व त्यांस मुख्यत्वेंकरून निळा रंग फार आवडतो. त्यांचे डागिने म्हटले ह्मणजे हातांत बांगड्या, कानांत पितळेच्या बाळ्या, गळ्यांत मण्यांच्या माळा व फार झालें तर हातांत पितळेचीं किंवा जस्ताचीं कडीं हे होत. त्या कधीं न्हात नाहींत. व केसांस कधीं कांहीं लावित नाहींत. ते कधीं विंचरीतही नाहींत. यांचे केस आंखूड असून नेहेमी मोकळे असतात. या जातीचे पुरूष व स्त्रिया दोन्ही फार गलिच्छ असतात. जवळ गेल्यास त्यांच्या अंगाची दुर्गंधी येते व बहुतकरून सर्वांच्या अंगावर व कपड्यांवर उवा असतात. या लोकांचे उतरण्याचे ठिकाणीं जाऊन झाडा घेण्याचें काम पडल्यास यांच्या बायका भांडण्याला उभ्या राहतात. व मुख्यत्वें करून जर खरोखरच चोरीचा माल त्यांचे टोळींत असला, मग तर फारच चवताळतात. केव्हां केव्हां असेंही घडलें आहे कीं यांच्या टोळींत कोणी पोलीस अंमलदार गेल्यास त्या आपल्या मुलांचे पाय धरून त्या विच्याऱ्यास आपल्या डोक्याभोंवती गरगर फिरवितात आणि तोंडानें ह्मणतात कीं जर पोलिसवाला येथून जाणार नाहीं तर मुलाचा जीव जाई तोंपर्यंत आह्मीं असेंच फिरवीत राहूं. व केव्हां केव्हां असेंही घडलें आहे कीं

पोलीस अंमलदार यांच्या टोळींत जातांच त्या एकदम आपलीं वस्त्रें फेंकून देतात आणि नागव्या पुढें येऊन ह्मणतात कीं पोलिसांनीं आमची इजत घेतली अशी आह्मी फिर्याद करूं. मांग गारोडी लोकांत वेळेचा प्रतिबंध नाहीं ते दिवसा चोरी करितात; व रात्रीसही करितात. ते घरफोडी करीत नाहींत. परंतु रस्तालूट करितात किंवा डाका मारतात. जनावरें चोरण्याचे कामांत हे फारच चालाख आहेत. व जनावरांच्या चोऱ्या ते फार करितात. हे मुख्यत्वेंकरून ह्मशी चोरून नेतात; व जनावरें जंगलांत चरण्यास जातात तेव्हां ते आपला डाव साधितात. आणि चोरलेलें जनावर पुन्हा त्याचे मालकास ओळखतां येऊं नये ह्मणून त्याचीं शिंगें कापतात. व अंगावर डागण्या देतात. चोरीच्या ह्मशी हे फार दूर नेऊन विकतात. या जातीचे पुरुष व बायका खिशे कातरतात; व उचलेपणा करितात. हंगामाचे दिवसांत ते धान्य व कापुसही चोरतात, व हा चोरलेला माल उतरण्याचे जागे जवळच कडब्याचे गुडांत छपवून ठेवतात. दुसरा चोरीचा माल, सोन्या चांदीचे डागिने कपडे किंवा नगदी रूपये बरेच दिवसांपासून त्यांचे जवळ असल्यास तो माल बायका आपले अंगाभोंवती लपवितात. किंवा ह्मशीवर घालण्याच्या ज्या मुठी असतात त्यांत शिवून टाकतात परंतु तो माल जर नुकताच चोरलेला असेल तर मुकामाचे जागेपासून जवळ जमिनींत पुरून ठेवतात. मांग गारोडी लोक दारू फार पितात. याजमुळें कलाल लोकच बहुतकरून यांचा चोरीचा माल घेतात. चोरीचे मालांत कांहीं मौल्यवान जिनसा असल्यास त्या बहुतकरून दुसरे जिल्ह्यांत सर्वांत जवळ जी टोळी असेल त्या टोळी कडेस पाठवितात. या लोकांच्या मेळांतील पाटील लोकांचीही मालाची व्यवस्था करण्यास मदत घेतात. बकऱ्या आणि मेंढ्या चोरणें या लोकांस मनापासून आवडतें. एक तर ते मेंढवाड्यांतून रात्रीं बकऱ्या जिवंत चोरून नेतात; नाहीं तर दिवसा जंगलांत चरत असतां ठार मारून घेऊन जातात. व ती मारण्याची तजवीज पुढें लिहिल्याप्रमाणें करतात.

कळपांतील एक बकरी किंवा मेंढी जी सर्वांत दूर चरतचरत गेली असेल तिच्यावर नजर ठेऊन धनगर पाठमोरा होतांच झटकन तिला

धरतात. आणि तिच्या मानेवर डोक्याजवळ एक पाय ठेऊन उजव्या हातानें तिच्या हनवटी खालीं धरून एकदम झटका देतांच त्या बिच्यारीची मान मोडून जाते. नंतर तिचा मुरदा एखाद्या झुडपांत किंवा खाड्यांत दुसऱ्यास न दिसे अशा बेतानें टाकून देऊन आपण दूर जाऊन त्या जागेवर नजर ठेवून उभे राहतात. आपल्या मेंढ्यांतील एक बकरी कमी झाली याज बद्दल मुळींच धनगरास कांहीं माहिती न होतां, तो हळू हळू पुढें हाकित चालतो, व तो बराच दूर जाऊन दिसेनासा झाला म्हणजे हे लोक ती मेलेली बकरी आपल्या उतरण्याचे जागेवर आणतात. परंतु या गोष्टीचा पत्ता लागूंनये म्हणून लागलीच तिचें कातडें, शिंगें, व खूर जाळून टाकतात. मांग गारोडी जातीचे पुरुष व त्यांच्या बायका अलीकडेस रेलवेंतून प्रवास करून भामटे लोकांप्रमाणेंच चोरी करूं लागल्या आहेत. यांच्या जातींत नवरा मुलगा चोरीचे कामांत चांगला प्रवीण झाल्या खेरीज त्याजला कोणी आपली मुलगी देत नाहीं.

---

## रामोशी.

रामोशी जातीचे लोक लुटारू असून हे मुंबई इलाख्यांत पुणें व सातारा जिल्ह्यांत राहतात. या जातीचे कांहीं लोक नुकताच जो दुष्काळ पडला त्या वेळेस व कित्येक तर त्या पूर्वींही उत्तरेकडील प्रदेशांत येऊन राहिले आहेत. इकडे ते आपल्यास हामाल म्हणवितात. आणि त्या लोकांत मिसळून कपासीचे कारखान्यांत वगैरे काम करितात. दुसरे देशांत जर या लोकांस तुमची जात काय म्हणून विचारलें; तर ते आपण रामोशी आहोंत ही गोष्ट उघडी पडूं न देतां आपली जात मराठी किंवा कुणबी आहे असें सांगतात. परंतु एखाद्या चांगल्या स्वभावाच्या खरें बोलणाऱ्या हमालास जर त्याजबद्दल गुप्त रीतीनें विचार पूस केली तर मात्र याची खरी जात समजते. रामोशी हे जातीचे हिंदु असून ते आपल्या देशांत गांवचे बाहेर वस्ती करून राहतात. परंतु दुसऱ्या देशांत ते हामाल लोकांच्या आळींत घरें करून राहतात. त्यांची रीतीभाती व चोरी करण्याची पद्धत वऱ्हाडांतील टाकणकार लोकांसारखी आहे.

जातीचे पुष्कळ लोक वंशपरंपरनें आपले देशांत जागलीचीं कामें गात. तथापि या जातीचे लोकांनीं कांहीं गांवें वसविलीं असून त्यांत ते न इतर रयत लोकांप्रमाणें राहतात. कपतान म्याकिंटाश साहेब यांनीं या लोकांची सुरस हकीकत मद्रासचे एका मासिक पुस्तकांत सन १८३४ सालीं छापली आहे. तींत ते लिहितात कीं, रामोशी लोक प्रथमतः गांव सोडून फार दूर अंतरावर राहत होते. याजमुळें, रानवासी किंवा जंगलांत राहणारे असें या लोकांचें नांव पडलें असेल; व पुढें रानवासी या दोन शब्दांचा अपभ्रंश होऊन रामोशी हें नांव पडलें. तथापि या जातीच्या कांहीं लोकांचे ह्मणणें असें पडतें कीं आमचें मुळचें नांव रामवंशी असें आहे ह्मणजे ते राम यांचे वंशज असून ही जात राम जेव्हां दक्षिणेंतून सीतेचा शोध करण्याकरितां लंकेकडेस गेले तेव्हां त्यांनीं उत्पन्न केली. रामोशी हे फार हलक्या जातीचे ह्मणजे शूद्र आहेत. यांच्या जातींत दोन शाखा आहेत. एक चव्हाण; व दुसरी जाधव; या दोन मूळ जातीपासून आतां पुष्कळ पोटभेद झाले आहेत. त्यांची जी मूळ भाषा (तिच्यांत तेलंगी भाषेचे पुष्कळ शब्द आहेत.) होती ती आद्याप कांहीं कांहीं कायम आहे परंतु ती भाषा ते नेहमी बोलत नसून लूट करण्याचे वेळेस किंवा दुसरे लोकांसमोर कांहीं गुप्त मजकुर बोलण्याचा असेल तर त्यावेळेस ती भाषा बोलतात. ती भाषा महाराष्ट्र भाषे पेक्षां अगदीं निराळी आहे. ते फार दिवसांपासून महाराष्ट्र देशांत राहत असल्यामुळें ते महाराष्ट्र भाषा चांगली बोलतात. या लोकांचें मुख्य दैवत खंडोबा आहे. त्यांची मूळ भाषा व त्यांचा आचार विचार याजवरून असें दिसतें कीं हे लोक मूळ तेलंगण देशांतून आले असावे. या जातीचे पुरुष व बायकाही मराठे लोकांसारखाच पेहेराव करितात. आणि पुरुषांचा बांधाही मराठे लोकांचे बांध्याशीं फार मिळतो. या जातीचे पुष्कळ लोक आतां शेतवाडी करून उपजीविका करितात. टाकणकार लोकांप्रमाणेंच यांच्यांतही नाईक आणि सर नाईक आहेत. आणि प्रत्येक नाईकाचा इलाखा निरनिराळा वाटला असून आपआपल्या इलाख्याचे बाहेर ते लोक कधीं चोऱ्या करित नव्हते. परंतु हा नियम आतां कोणी

फारसा मानीत नाहींत पूर्वी सारखे हे लोक आपल्या नाइकाच्याही आज्ञेत वागत नाहींत. व पाहिजे त्या ठिकाणीं चोऱ्या करितात. हे लोक चोऱ्या करण्याकरितां फार दूर जात नाहींत. घरापासून पंधरा-पासून पंचवीस कोसांचे आंत असल्यास चोऱ्या करितात. परंतु कामा संबंधानें घर सोडून निघालेले दाहा पांच रामोशी जर दुसरे देशांत आकस्मिक एकत्र जमले तर ते टोळी करून डाका मारतात. किंवा रस्तालूट व घरफोडी करितात. रामोशी लोकांत अशी चाल आहे कीं वरील प्रकारचा गुन्हा एक तरी वर्षांतून केलाच पाहिजे. ते हलके सलके गुन्हे करित नाहींत. चोरी करण्यास निघाल्यावर लुटावी तर अंबारी या न्यायानें हे लोक संधि पाहून चांगलाच डाव साधितात. टोळींत जो मुख्य असतो त्याला नाईक ह्मणतात. जेव्हां डाका मारण्याचा, रस्त्यांत खजिना लुटण्याचा किंवा मुशाफर लोकांचे टोळीवर घाला घालण्याचा इरादा झाला असेल तेव्हां ते घराबद्दल किंवा रस्त्याबद्दल आणि किती मनुष्यांवर घाला घालणें आहे व प्रसंग पडल्यास लढण्या सारखे किती लोक आहेत, वगैरे बद्दल प्रथम तंतोतंत माहिती मिळवून नंतर त्याप्रमाणें सर्व बरोबर तजवीज करून मग बाहेर पडतात. पूर्वी ही माहिती मिळविण्या करितां ते आपले जातीचे लोक गोसाव्याचे वेशानें पाठवीत होते. परंतु आतां तसें करित नाहींत. ज्या गावांत डाका घालण्याचा बेत असेल त्या गावांत राहणारे आपले लोकांमार्फत ही माहिती मिळवितात. याच प्रमाणें ज्या मुशाफराचे मेळ्यावर घाला घालण्याचा असेल त्याजबद्दल ही माहिती ते जेथून निघाले असतील त्या गांवचे रामोशी लोकांकडून मिळवितात. ज्या लोकांकडून ही माहिती मिळवितात त्यांनीं ही गोष्ट फोडूंनये ह्मणून त्याजला लुटीचा हिसा देतात. गुन्हा करण्याकरितां किती लोक जावे याजबद्दल सर्व गोष्टीचा विचार पाहून, नाईक निश्चय करितो. टोळींतील सर्व इसम एकाच गावांतून नेत नाहींत. जितके दिवस बाहेर राहण्याचें असेल तितके दिवस पुरण्या पुरती भाकरीची सामग्री तयार करून घेतात. जुन्या चालीप्रमाणें आपणांतील कोणी एकामेकांविरुद्ध बातमी देणार नाहींत असा त्यांचा परस्परांवर भरवसा

असतो याजबद्दल पूर्वी ते नाइकापुढें बेलभंडार उचलून शपथ घेत होते परंतु आतां तसें करित नाहींत. जर कोठें मोठा डाका घालण्याचा विचार झाला असेल तर ते बरोबर तलवारी नेतात. जरूर वाटल्यास कांहीं लोक बंदुकीही घेतात. आणि बाकीच्या लोकांच्या हातांत फक्त काठ्याच असतात. टोळी पैकीं एका जवळ तांब्याचे भांड्यांत, मडक्यांत, अथवा एका नरवंटींत, डाका सुरू करण्याचे आधीं मशालीवर घालण्याकरितां तूप घेतलेलें असतें. गुन्हा करण्यास जातांना किंवा घरीं परत येतांना होऊं शकेल तेथ पर्यंत रामोशी लोक कोणाच्या द्रिष्टीस पडत नाहींत. ते रात्रीं रस्ता चालतात. आणि दिवसा दऱ्यांत किंवा झाडींत छपून बसतात. गुन्हा करते वेळेस त्यांच्या कंबरा मजबुत कसलेल्या असतात आणि ज्या ठिकाणीं डाका घालण्याचा ती जागा जर त्यांचे घरापासून जवळच असेल तर ते आपलीं तोंडे ओळखलीं जावूं नयेत, यासाठीं धाटे बांधतात. परंतु तें ठिकाण जर घरापासून पुष्कळ दूर असेल तर तसें करित नाहींत. डाका घातलेल्या घरचा कोणी मनुष्य यांस प्रतिबंध करूं लागल्यास लागलीच त्याजवर सोंदे होतात. या लोकांत साधारण असा नियम आहे कीं आपला हेतु अन्य मार्गांनीं सिद्धीस जात नसेल किंवा घरांतून सुटका होऊं शकत नसेल तर मात्र हे लोक दुसऱ्याचा जीव घेतात. नाहींतर हे उगीच खून करित नाहींत. कांहीं विशेष प्रसंगीं हल्ला करिते वेळेस "जेजुराजाई" असा शब्द करीत करीत घरांत शिरतात. वाटसरू लोकांस या जातीचे दोन चार इसम रस्त्याचे मधोमध पानसुपारी खात बसलेले दिसतात. वाटसरू जवळ येतांच हे उठून उभे राहतात. व त्याजपाशीं असलेला सर्व अजबाब मागतात. तो देण्यास त्यांनीं जर आढे वेढे घेतले तर त्याचे सोबती जवळच झुडपाच्या किंवा दगडाच्या आड छपून बसलेले असतात त्यांस बोलावून घेतात. मग त्या बिचाऱ्या प्रवाशांचें कांहीं चालत नाहीं. जर एखाद्या घरावर डाका घालण्याचा असेल तर टोळी पैकीं एक किंवा दोन इसमां जवळ कुऱ्हाडी किंवा लोखंडी आकोडे असतात. आणि यांचे योगानें ते दरवाजा फोडून रस्ता करितात. घरवाल्याचे मदतीस बाहेरून कोणास येतां येऊं नये ह्मणून कैकाडी लोकां

प्रमाणेंच हे लोकही कांहीं अंतरावर कोपऱ्यावरून आपलीं मनुष्यें जवळ दगड देऊन उभीं करितात.

कपतान म्याकींटाश साहेबांनीं या जातिविषयीं सन १८३४ सालांत इतिहास लिहिला, त्यांत हे लोक पूर्वी डाका घालण्याचे आगोदर काय काय विधि करित होते याजबद्दल फार चांगलें वर्णन लिहून ठेविलें आहे तें असें. ज्या घरावर डाका घालण्याचा त्या घरापासून सुमारें एक हजार कदमाचे अंतरावर येऊन पोहोंचल्यावर ते पायांतील जोडे व तलवारींचीं म्यानें काढून जवळ कोठें छपवून ठेवित. परंतु कधीं कधीं असें न करितां जोडे आपले पाठीशींही बांधून घेत, आणि नंतर लुटण्याचें घर जिकडे असेल तिकडे तोंड करून उभे राहून साष्टांग नमस्कार घालीत. आणि पुन्हां पुन्हां हात जोडून तेथील ग्रामदेवतेस यश मिळावें ह्मणून प्रार्थना करित. टोळीं पैकीं एक इसम आपलें पागोटें फाडून त्याचे तीन, पांच, किंवा सात (यापेक्षां कधीं जास्त नाहीं) तुकडे दीड, तीन, किंवा पांच विती लांबीचे करून त्यास पीळ देऊन त्यांचे तितके कांकडे करून बरोबर नेलेल्या तुपांत चांगले भिजवीत. हे कांकडे पेटवल्यावर त्या घरीं जाऊन पोहोंचे पर्यंत फार भडकूं नयेत अशी तजवीज ठेवित. जो मनुष्य आपलें पागोटें देत असे त्याजला मोबदल्यांत लुटींत जें सर्वांत उत्तम पागोटें मिळेल तें बक्षीस देत असत. हा प्रकार सर्व आलीकडेस त्यांनीं अगदीं सोडून दिला. कारण हे कांकडे कदाचित् हातीं लागल्यास त्याजवरून डाकुलोक कोण असावेत हें ओळखतां येईल तसें होऊंनये याजकरितां ते कोणत्याही चिंध्या चिरगुटें घेऊन त्याचे कांकडे करितात. बंदुकीचे लोक घरांत न जातां दगड घेऊन उभे राहिलेल्या लोकांस मदत करण्या करितां बाहेरच उभे राहतात. आणि वरचेवर बंदुकीचे आवाज करून दुसरे कोणास जवळ येऊं देत नाहींत. ते चोरीचा माल जंगलांत किंवा टेकडीच्या बाजूनें गाडून ठेवितात. किंवा लागलीच कोणी विश्वासू मनुष्याच्या हवालीं करितात. चोरीचे मालांतील डागिने वगैरे देण्या करितां त्यांचे सोनार किंवा मारवाडी, बनिये असे ठरीव लोक असतात. डाका किंवा रस्ता लूट करणें झाल्यास ते बहुतकरून अंधारे रात्रीस वद्य ९ च्या पुढें

करितात. पावसाळे दिवसांत ते बहुतकरून दरवडे घालण्यास जात नाहींत. त्यांतून जिकडे जमीन नरम असून माग लागण्या सारखा असेल तिकडे तर मुळींच जात नाहींत. जेथें रामोशाचें घर आहे अशा गांवांत कोणी मुशाफर उतरल्यास त्याजपासून ते जागली बद्दल आपला हक्क उगवितात. जे त्यांस कांहीं देत नाहींत त्यांची रात्रीच्या रात्रीसच चोरी होते किंवा त्या गांवांतून गेल्यावर रस्त्यांत कोठें तरी लुटले जातात. तसेंच पिकाचे दिवसांत शेतावर रखवाली ठेवण्यासाठीं गांवकरी लोकांस ह्मणतात व जो यांस रखवाली ठेवित नाहीं त्याचे शेतांतलें सर्व पीक केव्हां तरी चोरीस जातें. नुकतेंच थोडे दिवसांपर्यंत पुण्यास साहेब लोकांसही बंगल्यावर चोरी होऊं नये ह्मणून रामोशी ठेवावे लागत असत परंतु आतां पोलिसचा बंदोबस्त चांगला झाला याजमुळें हे लोक ठेवण्याची जरूरी राहिली नाहीं.

## मालपुरा बावरी, टाकणकार, लंगोटीपारधी, दक्षिणीकंजर, डुकर कोल्हाटी आणि मांग या जातीच्या लोकांच्या संकेत शब्दांचा कोश.

| | मालपुरा बावरी. | टाकणकार. | लंगोटी पारधी. | दक्षिणी कंजर. | डुकर कोल्हाटी. | मांग. |
|---|---|---|---|---|---|---|
| डाका. | कामी. | कुटो. | कुटो. | गामी. | रोटा. | भुगा. |
| रहाजनी. | दगरूलुट्टू. | वारव्ला. | कुटो. | बोली. | कनल. | वानजी. |
| घरफोडी. | वडु बागली. | चिक्रो. | चिको. | (शब्द नाहीं.) | नदनारमा. | कौडी. |
| चोरी. | कागली, कमाई. | इसाली. | कमाई. | बोली. | गिमरी. | कौडी. |
| चोरीचा माल (डागिने व नगदी.) | भोगी. | पेपडू. | पेपडू. | गामीकामाल. | गिमरीडामाल. | कौडीमाल. |
| चोरीचा कपडा. | चेतुडो. | चेतुडो. | चेतुडो. | रचाडा. | गिमरांडा नापद. | सट्टला. |
| रुपया. | धालिवे. | धालिवे | धालिवे. | तिवा. | तीव. | कुरका. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सोनें. | खोनो. | खोनो. | खोनो. | बोना. | बुना. | सुकला. |
| रुपें. | धोली. | धोली. | धोली. | नानदी. | नानदी. | रुपा. |
| बंदुक. | राकलु. | पोकटी. | पोकटी. | काली. | नंदुक. | पुकनी. |
| तलवार. | पातोडो. | तपली. | वेहुटी. | चिमली. | नरवार. | दारकी. |
| हाती लागलें असतां सुटून जाणें. | नामाजा. | नासीजा. | नासीजा. | नासीजासर. | किनासींगा. | पिसल. |
| साहेब. | वानडु खाहेब. | राथोखाहेब. | राथोखाहेब. | टोप्या. | नुरा. | झुमानी. |
| पोलीसवाला. | लोनडेव-कापी. | कालु. | कालु. | तारा. | जोमर. | झुमानी. |
| आपल्या जातीचा नाहीं असा मनुष्य. | मानको. | माडको. | माडको. | चुपका. | तुनवी. | कोंमटा. |
| आपल्या जातीचा मनुष्य. | बावरी. | वागरी. | बावरी. | बाहू. | बाकु. | चुयेंग. |

| | मालपुरा बावरी. | टाकणकार. | लंगोटी पारधी. | दक्षिणी कंजर. | डुकर कोल्हाटी. | . मांग. |
|---|---|---|---|---|---|---|
| आपल्या जातीची बायको. | बावन. | वागन. | बावन. | चीपकी. | बटानी. | तुलारी. |
| आपल्या जातीचा मुलगा | चिऊ. | चिऊ. | चिऊ. | तावर. | चोरा. | सोलपा. |
| जोडा. | खाकुडू. | खाकुडू. | खाकुडू. | तुरका. | गोनिया. | गावना. |
| बईल. | धांडो | धांडो. | धांडो. | तारी. | नइल. | नाकली. |
| कुत्रा. | लोनडेव. | हडकवे. | जरबुटा. | जोकुल. | रुठा-टुकूल. | काकुड. |